# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार ३ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## स्वातंत्र्यदिनापूर्वी पाकिस्तानाचा मोठा कट उधळला!

## बीकानेर सीमेवर ५० कोटींचे ड्रग्ज अन ११ अत्याधुनिक शस्त्रे जप्त

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राजस्थानमधील भारत-पाकिस्तान सीमेवर सुरक्षा दलांनी आणि पोलिसांनी तस्करीचा एक अत्यंत मोठा आणि आंतरराष्ट्रीय कट उधळून लावला आहे. बीकानेर पोलिसांनी सीमेलगतच्या परिसरात राबवलेल्या विशेष मोहिमेदरम्यान ड्रोनच्या साहाय्याने पाकिस्तानातून भारतात पाठवण्यात आलेले तब्बल ५० कोटी रुपये मूल्याचे १० किलो हेरॉईन, ११ स्वयंचलित शस्त्रे, २२ मॅगझिन आणि १०० हून अधिक जिवंत काडतुसे जप्त केली आहेत.




स्वातंत्र्यदिनापूर्वी घडलेल्या या कारवाईमुळे सीमाभागातील सुरक्षा अधिक कडक करण्यात आली असून, मोठा दहशतवादी किंवा गुन्हेगारी कट उधळल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

बीकानेर जिल्ह्याचे विशेष पथक, सायबर सेल आणि स्थानिक पोलिसांनी शुक्रवारी उशिरा मध्यरात्री सीमावर्ती भागात एक संयुक्त शोधमोहीम राबवली. तपासादरम्यान, पाकिस्तानमधील तस्करांनी सीमेपारवरून ड्रोनचा वापर करून हे ड्रग्ज आणि शस्त्रास्त्रांचा साठा भारतीय हद्दीत पाडला होता. ही खेप ताब्यात घेण्यासाठी आलेल्या एका संशयिताला पोलिसांनी जागेवरच ताब्यात घेतले आहे. वीरेंद्र सिंह असे ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचे नाव असून, तो पाकिस्तानातून ड्रोनद्वारे टाकण्यात आलेला हा माल गोळा करण्यासाठी आला होता. सध्या त्याची कसून चौकशी करत (पान २ वर)

# महाराष्ट्रात मुसळधार पाऊस

## ७ जिल्ह्यांमध्ये पावसाचा येलो अलर्ट

### पुढील २४ तासात धो धो पावसाचा इशारा



**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा हाहाकार बघायला मिळाला. सतत पाऊस सुरू आहे. आता राज्यात पावसाची उघडीप बघायला मिळेल. कोकण आणि घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा अंदाज आहे. विदर्भात भारतीय हवामान विभागाने पावसाचा मोठा इशारा दिला. विदर्भात पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला. मॉन्सूनची आस असलेला कमी दाबाचा पट्टावरील कमी दाब क्षेत्रापासून डेहरी, मालदा, माणिपूरपर्यंत सक्रिय झाला. गुजरातपासून उत्तर केरळ किनारपट्टीला कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला. आज पुणे, रायगड, रत्नागिरी सातारा कोल्हापूर घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. वाशिम, गडचिरोली, गोदिंया, अमरावती, अकोला , वाशिम आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला. उर्वरित राज्यात देखील पाऊस कमी अधिक प्रमाणात असेल.

हवामान विभागाने नुकताच प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, २ ते ४ ऑगस्ट दरम्यान देशातील अनेक राज्यात मुसळधार पाऊस होईल. याव्यतिरिक्त, ३ ते ७ ऑगस्ट दरम्यान हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील अनेक ठिकाणी चांगल्या पावसाचा अंदाज आहे. उत्तर प्रदेशमध्ये २ ते ७ ऑगस्ट दरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आज २ ऑगस्ट रोजी पश्चिम राजस्थानमधील अनेक भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. जळगाव जिल्ह्यात संभाव्य अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथून एनडीआरएफच पथक दाखल झाले आहे. एनडीआरएफच्या पथकामध्ये एक चार अधिकारी व ३० जवानांचा समावेश आहे, यात दोन महिला जवान देखील आहे. दोन दिवसांच्या पावसामुळे निर्माण नद्या नाल्यांना आलेल्या परिस्थितीमुळे झालेल्या जीवित हानी वित्तहानीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाचा निर्णय. जळगाव जिल्ह्यात दोन दिवसांच्या सततच्या पावसामुळे अमळनेर, पारोळा तालुक्यात एकाचा बुडून मृत्यू झाला असून तीन जण पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने बेपत्ता झाले असल्याची जिल्हाधिकाऱ्यांची माहिती. उजनी धरणातून ८० हजार तर वीर धरणातून ६३ हजार इतक्या विसर्गाने भीमा नदी वाहणार असल्याने नदीकाठी असलेल्या व्यास नारायण झोपडपट्टीतील नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले.

## एआयमुळे ७० टक्के नोकऱ्यांचे स्वरूप बदलणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर/प्रतिनिधी :** : कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमिकंडक्टर आणि क्वांटम कम्प्युटिंग ही तंत्रज्ञाने भविष्यातील जगाला आकार देणार असून पुढील एक हजार दिवसांत सुमारे ७० टक्के नोकऱ्यांचे स्वरूप आमुलाग्र बदलणार आहे. नोकऱ्या कमी होणार नाहीत, मात्र त्यासाठी आवश्यक कौशल्ये पूर्णपणे बदलतील. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे हा बदल अटळ आहे. त्यामुळे जग ज्या वेगाने बदलत आहे, त्या वेगाशी सुसंगत राहण्यासाठी आपल्या शिक्षण संस्थांनाही शिक्षणाच्या पद्धतीत बदल करावे लागतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.

रामदेवबाबा विद्यापीठातील 'एआय सेंटर फॉर कॉम्पिटन्सी'च्या उद्घाटन समारंभात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याप्रसंगी श्रीरामदेवबाबा सार्वजनिक समितीचे अध्यक्ष पद्मश्री सत्यनारायण नुवाल, उपाध्यक्ष एस. राठी, पी. पालडीवाल, महासचिव राजेंद्र पुरोहित, सचिव प्रदीप अग्रवाल, कैलाशचंद्र अग्रवाल, कोषाध्यक्ष अशोककुमार पचेरीवाला, विद्यापीठाचे कुलपती डॉ. एस.एस. मंथा, कुलगुरु डॉ. आर.एस. पांडे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, तंत्रज्ञानातील वेगवान बदलांमुळे आज २०२६ मध्ये आपण पाचव्या औद्योगिक क्रांतीची चर्चा करीत आहोत. ही क्रांती कृत्रिम बुद्धिमत्ता, डीप टेक्नॉलॉजी आणि फ्रंटियर टेक्नॉलॉजीवर आधारित आहे. आता जगाने सहाव्या औद्योगिक क्रांतीची चर्चा देखील सुरू केली आहे. याप्रसंगी बोलताना पद्मश्री सत्यनारायण नुवाल यांनी आपल्या मनोगतात हे केंद्र संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. तर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आर.एस. पांडे यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यापीठाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे आरोग्यसेवा क्षेत्रातही व्यापक बदल घडत आहेत. रोगांच्या व्यवस्थापनात आमूलाग्र बदल झाले आहेत. (पान २ वर)



## संजय शिरसाट, बच्चू कडूंना अभिजीत दिपकेंची भेट महागात, एकनाथ शिंदे ॲक्शन मोडमध्ये




**मुंबई/प्रतिनिधी** : कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीच्या जंतर मंतरवर मोठं आंदोलन उभारलं होतं. तब्बल एक महिना हे आंदोलन सुरू होतं. आंदोलकांनी २० जुलै रोजी संसद भवनावर मोर्चा देखील काढला, अखेर त्यानंतर शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. दरम्यान शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये अभिजीत दिपके यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबाची भेट घेतली होती. दरम्यान त्यानंतर जेव्हा अभिजीत दिपके हे त्यांच्या घरी पोहोचले तेव्हा शिवसेनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनी त्यांच्या घरी जाऊन दिपके (पान २ वर)

### बावनकुळेंचा शिंदेंना कारवाईचा इशारा; महायुतीचा धर्म पाळण्याचे आवाहन

भाजप नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या भेटीवर नाराजी व्यक्त करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे. 'एकनाथ शिंदे यांनी अशा लोकांवर कडक कारवाई केली पाहिजे. त्यांच्या नेत्यांनी कसे वागलं पाहिजे हे एकनाथ शिंदे ठरवतात. यावरून एकनाथ शिंदे यांनी काही चर्चा केली आहे असं मला वाटतं. महायुतीमध्ये काम करताना अशा प्रकारचे वर्तन योग्य नाही. मी कोणाला सल्ला देणार नाही पण मला वाटतं की एकनाथ शिंदे यांनी याची दखल घ्यावी,' असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## प्रवाशांनी भरलेल्या बोटीला आग, ५ जणांचा मृत्यू; ४१ बेपत्ता



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** इंडोनेशियातील पूर्व जावा येथील मदुरा बेटाजवळ रविवारी सकाळी एक भीषण सागरी अपघात घडला. सुमारे २७१ प्रवासी आणि कर्मचारी वर्ग असलेल्या 'KMP मटियारा सेंटोसा २' या प्रवासी बोटीला (फेरी) समुद्राच्या मध्यभागी अचानक भीषण आग लागली. या दुर्घटनेत किमान ५ जणांचा मृत्यू झाला असून ४१ जण अद्याप बेपत्ता आहेत.

घटनेची माहिती मिळताच इंडोनेशियाच्या शोध व बचाव पथकांनी व्यापक स्तरावर बचाव मोहीम सुरू केली आहे.मदुरा बेट हे इंडोनेशियाच्या जावा बेटाच्या ईशान्य किनाऱ्याजवळ स्थित आहे. सागरी (पान २ वर)

सर्पदंश झाला.... रस्ता नसल्याने उपचार करण्यासाठी डोलीतून नेले

## वेळेत उपचार न मिळाल्याने ९ वीच्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू



**कसारा /वृत्तसंस्था-**: गावापासून मुख्य रस्त्याला यायला रस्ताच नसल्याने आज डोली करून पायी पायी पाच किलोमीटर अंतर चालत रुग्णालयात घेऊन जाणाऱ्या एका नऊ वर्षाच्या मुलाचा वेळेत उपचार न मिळाल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. वय ९ वर्ष रा शिसवली फाटा असे मयत मुलाचे नाव आहे. शहापूर तालुक्यातील दहिगाव ग्रामपंचायत हद्दीतील शिसवली गावातील जगन्नाथ दापट वय ९ वर्ष हा इयत्ता ४थीत शिकणाऱ्या मुलाला घरात झोपेत असताना सर्पदंश झाला. मुलाला साप चावल्याचे सकाळी पालकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तात्काळ गावातील तरुणांना सोबत घेत मुलाला जवळील प्राथमिक आरोग्य उप केंद्रात घेऊन जाण्याची तयारी केली.

परंतु रस्ता नसल्याने व दरीतून चढ उतार असल्याने गावातील तरुणांनी डोली करून सर्पदंश झालेल्या जगन्नाथ या मुलाला घेऊन निघाले. एकीकडे पाऊस तर दुसरीकडे निसरडा रस्ता पार करीत डोली घेऊन (पान २ वर)

## 'नादाला लागलात तर जागा नीट ठेऊ देणार नाही';

### गणेश नाईकांचा थेट इशारा; महायुतीत वाद

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील महायुती सरकारमधील अंतर्गत मतभेद आणि राजकीय संघर्ष पुन्हा एकदा उघड्यावर आला आहे. उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची अत्यंत महत्त्वाकांक्षी मानली जाणारी 'क्लस्टर विकास योजना' आणि युडीसीआर नियमावलीवरून भाजप नेते तथा वनमंत्री गणेश नाईक यांनी उघडपणे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

गणेश नाईक यांनी क्लस्टर योजनेवर सडकून टीका करत, 'माझ्या नादाला लागला तर त्याची जागा नीट ठेवू देणार नाही,' असा थेट इशारा नाव न घेता एकनाथ शिंदेंना दिला आहे. या वक्तव्यामुळे ठाणे आणि नवी मुंबईच्या राजकीय वर्तुळात शिवसेना (शिंदे गट) विरुद्ध भाजप असा जुना संघर्ष नव्या रुपाने पुन्हा उफाळून आला आहे.



गणेश नाईक यांनी नगर विकास खात्याच्या धोरणांवर आणि क्लस्टर योजनेच्या अंमलबजावणीवर ताशेरे ओढले आहेत. गणेश नाईक म्हणाले की, 'क्लस्टर (पान २ वर)






## पाकिस्तानात भीषण आत्मघाती हल्ला

## पोलिसांना बनवलं लक्ष्य, ७ ठार



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील स्वात खोऱ्यात भीषण आत्मघाती हल्ल्या झाल्याचे वृत्त आहे. महत्वाचे म्हणजे, एका पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारावरच हा भीषण हल्ला झाला. काबल पोलीस ठाण्याच्या गेटवर घडलेल्या या आत्मघाती स्फोटात किमान ७ जणांचा मृत्यू झाला असून १८ जण गंभीर जखमी झाल्याचे समजते.

यासंदर्भात स्वातच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार, 'संशयित आत्मघाती हल्लेखोर पोलीस ठाण्यात शिरण्याचा प्रयत्न करत होता. मात्र सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला मुख्य प्रवेशद्वारावरच रोखले आणि त्याची झडती घेण्याचा प्रयत्न केला. याचवेळी हल्लेखोराने अंगावरील स्फोटकांचा स्फोट घडवून आणला. हा स्फोट एवढा तीव्र होता की, संपूर्ण परिसर हादरून गेला. दहशतवादी हिंसाचाराविरोधात लोक एकत्र आले असतानाच हल्ला - विशेष म्हणजे, स्वात (पान २ वर)

## आर्थिक विवंचनेतून अख्ख्या कुटुंबाने जीवन संपवले





**पुणे/प्रतिनिधी** : पिंपरी-चिंचवड शहरातील मोरवाडी परिसरामध्ये एक अत्यंत वेदनादायक घटना घडली आहे. आर्थिक विवंचनेतून एकाच कुटुंबातील तिघांनी सामूहिकरित्या जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या त्रिकोणी कुटुंबातील विनोद पिल्ले या कर्त्या पुरुषाने जीवन संपवण्याआधी लिहिलेल्या चिठ्ठीत आमच्या मृत्यूला कोणालाही जबाबदार धरु नये असे म्हटले होते. काल विनोद पिल्ले यांचा मृत्यू झाला तर आज त्यांची पत्नी सिरजा पिल्ले यांचा आणि मुलगी पौर्णिमा पिल्ले यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्यांनी सोडियम नायट्रेट सारख्या एखाद्या विषारी औषधाचा धूर घेऊन जीवन संपवल्याचा पोलिसांना संशय आहे.

पिंपरी- चिंचवड शहरातील मोरवाडी येथील करिष्मा ग्लोरी सोसायटीत एक दुर्दैवी घटना घडली आहे. या दुर्दैवी घटनेत पती-पत्नी आणि मुलगी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. विनोद पिल्ले ( ५० ) , सिरजा पिल्ले (४५), आणि पौर्णिमा पिल्ले (१९) अशा त्रिकोणी कुटुंबाने आर्थिक (पान २ वर)

# सेवाकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्या : चंद्रकांत पाटील

## -संत अच्युत महाराज गुरुपौर्णिमा उत्सव -प्रतीकचिन्हाचे व संकेतस्थळाचे विमोचन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील साडेतीन कोटी जनता थेट अध्यात्माशी जुळली आहे. या सर्वांनी मनुष्याची सेवा म्हणजेच परमेश्वराची सेवा समजून प्रत्येक मनुष्यातला परमेश्वर ओळखावा आणि सेवा कार्याला प्राधान्य द्यावे. श्री संत अच्युत महाराज सांस्कृतिक प्रतिष्ठानने सुद्धा त्यासाठी पुढाकार घ्यावा. त्या कार्याच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा राहील, अशी ग्वाही राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

श्री संत अच्युत महाराज सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे यांच्या वतीने रविवारी भारतरत्न पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंध येथे आयोजित गुरुपौर्णिमा उत्सवात ते बोलत होते. प्रारंभी दीपप्रज्वलन व श्री संत अच्युत महाराजांच्या प्रतिमेचे, पादुकांचे पूजन संत सचिन देव महाराज,





मंत्री चंद्रकांत पाटील, लोकमान्य मल्टीपर्पज को-ऑप सोसायटीचे क्षेत्रीय अधिकारी सुशील जाधव, श्री संत अच्युत महाराज हॉस्पिटलचे विश्वस्त डॉ. श्रीकांत देशमुख, शुभदा पोतदार यांनी केले. उत्सवात आवर्जून आलेल्या मंत्री चंद्रकांत पाटील यांचा भावपूर्ण सत्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष मनोज वाडेकर यांनी केला. अनंत खासबारदार यांनी तयार केलेल्या प्रतिष्ठानच्या प्रतीकचिन्हाचे विमोचन व प्रतिष्ठानचे सचिव अभिलाष बेंडे यांनी तयार केलेल्या संकेतस्थळाचा शुभारंभ मान्यवरांच्याहस्ते झाला. याचवेळी श्री संत अच्युत महाराज सांस्कृतिक प्रतिष्ठानची पहिली कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

आशीर्वाचनात संत सचिन देव महाराज म्हणाले, वैदर्भीय संतांचा नावलौकिक जगात आहे. घराघरातला जिव्हाळा कायम ठेवायचा असेल तर संतांचे उपदेश आत्मसात करा. आजच्या तरुणांचा प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वैज्ञानिक आहे. पण, त्यांनी अंतःकरण आध्यात्मिकच ठेवले पाहिजे.

तत्पूर्वी भाजयुमो प्रदेश सचिव सौरभ कुंडलिक, डेक्कन एज्युकेशन सोसायटी कार्यकारिणी सदस्य उमा गाडगीळ यांच्यासह अन्य मान्यवर मंडळीचा सत्कार प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आला. अंजली व यश खेर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भक्तीगीतांचे गायन केले.

प्रास्ताविक दीप्ती पोतदार, संचालन ज्योती चांदुरे, आभार नीता पोखर्णीकर यांनी मानले. अनिरुद्ध गडकरी, अमेय वडोदकर, मुकेश पायघन, दीपक मालखेडे, अर्चना देशपांडे, रागिणी मोकासदार, माधुरी शहाणे यांनी उत्सवाचे नियोजन केले. उत्सवात भक्त मंडळी मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सवाने चांदूर रेल्वे शहर दुमदुमले

## भव्य शोभायात्रेत समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त चांदूर रेल्वे शहरात शनिवारी उत्साह, जल्लोष आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. मिलिंद नगर येथून निघालेल्या भव्य शोभायात्रेत समाजबांधवांसह महिला, युवक-युवती आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. ढोल-ताशे, बँजोच्या दणदणाटात आणि घोषणांनी संपूर्ण शहर उत्सवमय झाले.

कार्यक्रमाची सुरुवात मिलिंद नगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर निघालेल्या शोभायात्रेचे शहरातील विविध ठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. सरदार चौक, क्रांती चौक, सिनेमा चौक, मेन मार्केट रोड, जुना बसस्टँड चौक येथून मार्गक्रमण करत शोभायात्रा नगर परिषद परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ पोहोचली. येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर अमरावती रोडमार्गे शोभायात्रेची सांगता मिलिंद नगर येथे झाली. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार प्रताप अडसड, भाजपा नेते रावसाहेब रोठे, युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस परीक्षित जगताप, नगराध्यक्षा प्रा. प्रियंका विश्वकर्मा, वंचित बहुजन आघाडीचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक निलेश विश्वकर्मा, नगरसेवक हाजी अनिस सौदागर, सुमेध सरदार, ॲड. किर्ती इमले, पप्पू भालेराव, गजानन ठाकरे, आचल प्रधान, माजी नगराध्यक्ष शिट्टू सूर्यवंशी, माजी नगरसेवक सतपाल वरठे, प्रफुल्ल कोकाटे, अजय हजारे, नंदा वाधवानी, निवास सूर्यवंशी, सारंग देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शहरासह ग्रामीण भागातील असंख्य समाजबांधवांनीही या शोभायात्रेत सहभाग घेतला. विशेष म्हणजे महिला व युवक-युवतींची लक्षणीय उपस्थिती यावेळी पाहायला मिळाली. संपूर्ण वातावरण घोषणांनी आणि सांस्कृतिक उत्साहाने भारावून गेले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुधाकर वानखडे, नंदू सोरगिवकर, गजानन तायडे, बाळासाहेब सोरगिवकर, गजानन गवई, श्रीकृष्ण तायवाडे, योगेश अंभोरे, कृष्णा कलाने, सागर लोखंडे, पुरूषोत्तम स्वर्गे, सुनिल लोखंडे यांसह अनेक समाजबांधवांनी विशेष परिश्रम घेतले.



शोभायात्रेदरम्यान बँजोच्या तालावर आमदार प्रताप अडसड आणि नगरसेवक निलेश विश्वकर्मा यांनी समाजबांधवांसोबत उत्स्फूर्तपणे ठेका धरला. त्यांच्या सहभागामुळे कार्यकर्ते व युवकांमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला. नगरसेवक निलेश विश्वकर्मा हे शोभायात्रेत शेवटपर्यंत उपस्थित राहून सक्रिय सहभागी झाले होते.

# अमरावती जिल्ह्यातील ३८ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान

## ■ ४० मंडळांमध्ये अतिवृष्टी ■ २१ मंडळात शंभर मिमीपेक्षा जास्त पाऊस

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुसळधार पावसाने संपूर्ण जिल्ह्यालाच तडाखा दिला आहे. अमरावती शहरासह ग्रामीण भागात सर्वत्र जोरदार पाऊस झाला. यात ३८ हजार १८३ हेक्टरवरील शेती पिकांचे नुकसान व १०९२ घरांची पडझड झाली असून सर्वाधिक २०१.८ मिमी पाऊस व नुकसान नांदगाव खंडेश्वर तालुक्यातच झाले आहे. १२८३ पशुधनाचा मृत्यू झाला. ४० महसूली मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असून त्यातील २१ मंडळांमध्ये १०० मिमीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. एक व्यक्ती पुरात वाहून गेली आहे.

चांदूर रेल्वे तालुक्यात १६५ मिमी पाऊस व २३४ हेक्टरवरील पिकांचे तर धामणगाव रेल्वे तालुक्यात १४८ मिमी व २१३८ हेक्टर पिकांचे, भातकुली तालुक्यात ६६ मिमी पाऊस तर ४५२१ हेक्टरवरील पिकांचे, मोर्शी तालुक्यात १९५० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. मका, सोयाबीन, कपाशी, तर याच पिकांना फटका बसला आहे. अमरावती तालुक्यात ९७.१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. अमरावती शहरातील अकोली, नवाथे नगर व राजापेठ येथील रेल्वे भुयारी मार्गात सर्वत्र पाणी साचलेले होते. शहरातील काही दुकानांमध्ये पाणी शिरले होते. जिल्ह्यात सरासरी ७६ मिमी पाऊस झाला आहे. मुसळधार पाऊस कोसळल्याने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माहुली गावात अनेक ठिकाणी पाणी शिरले. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. या मुसळधार पावसामुळे जळू नदीला पूर आला. पुराचे पाणी शेतांमध्ये घुसल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. याशिवाय मंगरूळ चव्हाळा



विभागासह हरणी गावात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

हरणी गावाचा दुपारी ४ वाजल्यापासून रात्री सुमारे ११ वाजेपर्यंत बाहेरील संपर्क पूर्णपणे तुटला होता. गावाकडे जाणाऱ्या दोन ते तीन मार्गांवरील नदीच्या पुलांवरून पाणी वाहत असल्याने वाहतूक ठप्प झाली. काही ठिकाणी रस्तेही पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. बेंबळा नदीला आलेल्या महापुरामुळे नदीकाठच्या सर्व गावांचे व शेतीचे माठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड परिसरातील खारवगळ नदीला मोठा पूर आला आहे. नदीच्या पाणीपातळीत झालेल्या झपाट्याने वाढीमुळे नदीकाठावरील मोठ्या प्रमाणातील शेती पाण्याखाली गेली असून सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे परिसरातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. पुरामुळे अडकलेल्या नागरिकांना नाल्यातून जीवघेणा प्रवास करावा लागला. घुईखेड व परिसरातील अनेक शेतांमध्ये पूराचे पाणी शिरल्याने उभे असलेले सोयाबीन पीक पूर्णपणे पाण्याखाली गेले आहे. अनेक ठिकाणी पाण्याचा निचरा न झाल्यामुळे पिके कुजण्याची भीती निर्माण झाली आहे.

# भातकुली तालुक्यात मुसळधार पावसाचा कहर

## ४५२१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान



**टाकरखेडा शंभू/ प्रतिनिधीः-** गुरुवार आणि शुक्रवारी झालेल्या मुसळधार पावसाने भातकुली तालुक्यात मोठे नुकसान झाले आहे. सलग कोसळलेल्या पावसामुळे आठ गावांतील ४२ घरांची पडझड झाली असून, ११५ गावांमधील ४५२१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक नोंद प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, तूर आणि कापूस या प्रमुख खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी शेतांमध्ये पाणी साचल्याने पिके आडवी पडली असून, काही भागात मातीची धूपही झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.

अतिवृष्टीमुळे काही गावांमध्ये कच्च्या घरांचे मोठे नुकसान झाले असून, बाधित कुटुंबांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. महसूल आणि कृषी विभागाच्या पथकांनी नुकसानग्रस्त भागांची पाहणी सुरू केली असून पंचनामे करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

प्राथमिक अहवालानुसार, आठ गावांमधील ४२ घरांचे नुकसान झाले असून ४५२१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान नोंदविण्यात आले आहे. अंतिम पंचनाम्यानंतर नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना शासनाच्या नियमानुसार मदत देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# १ व १० वरील उर्वरित

### स्वातंत्र्यदिनापूर्वी पाकिस्तानाचा

असून, या आंतरराष्ट्रीय तस्करी सिंडिकेटशी जोडलेल्या इतर स्थानिक आणि परदेशी नेटवर्कचा शोध घेतला जात आहे. बीकानेर रेंजचे पोलीस महानिरीक्षक ओम प्रकाश यांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ फेब्रुवारी रोजी केलेल्या कारवाईनंतर सुरक्षा दलांना मिळालेले हे दुसरे सर्वात मोठे यश आहे.

'१५ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई अत्यंत महत्त्वाची आहे. या शस्त्रांचा आणि ड्रग्जचा वापर देशविरोधी किंवा मोठ्या गुन्हेगारी कारवायांसाठी केला जाण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. वेळेवर झालेल्या कारवाईमुळे आम्ही एक मोठा कट उधळून लावला आहे. गुप्तचर यंत्रणा, पोलीस आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्यामुळेच हे यश शक्य झाले,' असे ओम प्रकाश यांनी सांगितले.

### एआयमुळे ७० टक्के नोकऱ्यांचे

डाटा हे नव्या जगाचे आईल आहे. एआयमुळे नवीन डाटा इंडस्ट्रिज तयार होणार असून मानवतेसाठीही उपयुक्त ठरणार आहे. जानेवारीमध्ये डावोस येथे स्वित्झरलँडच्या आरोग्यमंत्र्यांशी भेट झाली. त्यांनी आयएमुळे आरोग्य क्षेत्रात एआयमुळे मोठी क्रांतीकारी बदल झाल्याचे सांगितले. तेथे २००० नंतर जन्म झालेले प्रत्येक मूल १०० वर्षे जगतील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

- कृषी क्षेत्रात एआयचा वापर

आज कृषी क्षेत्रातही राज्य सरकार एआयला प्राधान्य देत आहे. यासाठी एक ?प तयार केले. विविध भाषेत हे ?प तयार करण्यात आले असून आदिवासी भाषेचाही त्यात समावेश आहे. शेतीतील रोपटे फुलावर आल्यानंतर त्याचा फोटो काढून ?पमध्ये टाकल्यास पुढील पंधरा दिवसांचे तापमान, पुढे रोपटे वाढीसाठी काय करावे, हे शेतकऱ्यांना कळणार असल्याचे ते म्हणाले. एकूणच पिक वाढीचे पूर्ण चक्राबाबत माहिती मिळणार असून २५ ते ३० टक्के शेतीचे उत्पादन वाढेल, असा विश्वास त्यांनी केला.

### संजय शिरसाट, बच्चू कडूंना अभिजीत

यांची भेट घेतली. मात्र या भेटीवरून आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चांगलेच नाराज झाले आहेत.

राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, अभिजीत दिपके यांना भेटण्यासाठी परस्पर का गेलात? अशी विचारणा आता एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडू आणि संजय शिरसाट यांच्याकडे केली आहे. महायुतीची भूमिका ठरली नसताना अभिजीत दिपके यांची भेट का घेतली असा सवाल करत एकनाथ शिंदे यांनी संजय शिरसाट आणि बच्चू कडू यांना झापल्याची माहिती समोर येत आहे. महायुतीची भूमिका ठरलेली नसताना अशाप्रकारे न विचारता अभिजीत दिपके यांची भेट घ्यायला नको होती असंही यावेळी एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

दरेकर यांची प्रतिक्रिया

दरम्यान बच्चू कडू आणि संजय शिरसाट यांच्या या भेटीवर भाजप नेते प्रवीण दरेकर यांची प्रतिक्रिया देखील समोर आली आहे. दरेकर यांच्या प्रतिक्रियेवरून या भेटीमुळे भाजप देखील नाराज असल्याचं दिसून येत आहे. महायुतीमध्ये वितुष्ट निर्माण होईल असं वागू नका अशी प्रतिक्रिया या भेटीवर दरेकर यांनी दिली आहे, या भेटीमुळे आता महायुतीत वातावरण तापण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंकडून बच्चू कडू आणि संजय शिरसाट यांची कानउघडणी करण्यात आली आहे.

### प्रवाशांनी भरलेल्या बोटीला आग,

वाहतुकीच्या दृष्टीने हा भाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. येथे सोशल मीडियावर समोर आलेले व्हिडिओ आणि प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, पाहता पाहता संपूर्ण बोटीतून काळा धूर आणि आगीच्या प्रचंड ज्वाला निघू लागल्या. बोटीवरील अनेक प्रवाशांनी लाईफ जॅकेट परिधान केले होते आणि आग पसरल्याने ते बोटीच्या पुढील भागाकडे जमा झाले. आपला जीव वाचवण्यासाठी अनेक प्रवाशांनी थेट समुद्रात उड्या मारल्या.

**बोटीत २७१ प्रवासी-** शोध आणि बचाव यंत्रणेने दिलेल्या माहितीनुसार, बोटीवर एकूण २७१ प्रवासी आणि कर्मचारी उपस्थित होते. यापैकी २२५ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. बेपत्ता लोकांचा शोध घेण्यासाठी मोहीम वेगाने सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ही बोट पूर्व जावा प्रांतातील सुराबाया शहरातून दक्षिण सुलावेसी येथील मकासर शहराकडे जात होती. प्रवासादरम्यान मदुरा बेटाजवळील सागरी क्षेत्रात ही दुर्घटना घडली.

### सर्पदंश झाला.... रस्ता नसल्याने उपचार

निघसलेल्या तरुणांनी व मुलाच्या नातेवाईकांनी ५ किलोमीटर अंतर पार करीत दहिगाव गाठले. तेथे उपकेंद्रात कोणी नसल्याने खासगी गाडी करून जगन्नाथ यास खर्डी ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. परंतु मुलाची प्रकृती गंभीर झाल्याने त्यास ठाणे येथे पाठवण्यात आले मात्र तो पर्यत उशीर झाला जगन्नाथ ला ठाणे सिव्हिल रुग्णालयात घेऊन जाण्या अगोदरच त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान दहिगाव ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात असलेल्या या शिसवली पाड्यात मात्र रस्ता नसल्याने ५ किलोमीटरचा अंतर डोली करुन पायी प्रवास करून दहीगाव येथे मुख्य रस्त्या पर्यंत यावे लागले, व तेथून गाडीने रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले मात्र पाच किलोमीटर अंतर डोलीने प्रवास करण्यासाठी जो वेळ लागला त्यात सर्पदंशाने मुलाची तब्येत खालावल्यामुळे रूग्णालयात उपचाराला प्रतिसाद न मिळाल्याने अखेर मुलाचा मृत्यू झाला. जर रस्ता असता तर वेळेत उपचार मिळाला असता तर आज जगन्नाथ दापट जीवंत असता.

### 'नादाला लागलात तर जागा नीट

डेव्हलपमेंटचे प्याड उभे करण्याचे प्रयत्न चालू आहेत. जर युडीसीआर पूर्ण लावला गेला तर सेक्टर ९ मध्ये गाड्या आणि बाईक सोडा या फुटपाथ वरून जात ना तुम्हाला धक्के मारून जावं लागेल हे आज मी सांगत आहे.' तर गणेश नाईकच्या नादाला लागला तर त्याला त्याची जागा नीट ठेवू देणार नाही हा इशारा आहे, असं म्हणत सज्जड दमच नाईकांनी भरला.ठाणे आणि नवी मुंबईवर कोणाचे वर्चस्व राहणार, यावरून एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्यातील राजकीय वैर जुनेच आहे. दोन्ही नेते महायुती सरकारचा भाग असले तरी स्थानिक पातळीवर त्यांच्यात सातत्याने खटके उडताना दिसतात. काही महिन्यांपूर्वी गणेश नाईक यांनी सिडकोचे भूखंड बिल्डरांच्या घशात घातल्याचा आरोप नगरविकास खात्यावर केला होता. जनतेच्या सोयीसाठी भूखंड मिळत नसतील तर मंत्रिपद काय चाटायचे आहे का? असे विधान करत त्यांनी नगरविकास खात्याला धारेवर धरले होते. तसेच नवी मुंबई महापालिकेच्या निधीचा गैरवापर झाल्याचा आणि प्रभाग रचनेत फेरफार केल्याचा आरोप करत नाईक यांनी शिंदे गटाला थेट लक्ष्य केले होते.

### पाकिस्तानात भीषण आत्मघाती हल्ला

खोऱ्यात सातत्याने वाढणाऱ्या दहशतवादी हिंसाचाराविरोधात काबल चौकात स्थानिक लोक एकत्र आले असतानाच हा हल्ला झाला. दरम्यान, 'स्वात अमन जिरगा'च्या वतीने भव्य शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीदरम्यान नागरिक हातात फलक घेऊन शांततेची मागणी केली.

परिसराला वेढा, शोधमोहीम सुरू -

या हल्ल्यानंतर, सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला असून, शोधमोहीम सुरू केली आहे. जखमींना उपचारासाठी जवळच्या 'सैदू शरीफ टीचिंग हॉस्पिटल'मध्ये दाखल करण्यात आले आहे. तसेच, आपण पूर्णपणे हाय अलर्टवर असून कुठल्याही अप्रिय घटनेचा सामना करण्यासाठी तयार असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

### आर्थिक विवंचनेतून अख्ख्या

विवंचनेतून जीवन संपवल्याचे म्हटले जात आहे. या दुर्दैवी घटनेत पहिल्या दिवशी घरातील कर्ते विनोद पिल्ले यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. तर उपचारदरम्यान आज पत्नी सिरजा पिल्ले आणि मुलगी पौर्णिमा पिल्ले यांचाही मृत्यू झाला आहे.

विनोद पिल्ले यांनी आयआयएम अहमदाबाद येथून कॉम्प्युटर सायन्समध्ये शिक्षण घेतलेले होते. त्यांची पत्नी नामांकित शाळेत कोऑर्डिनेटर होती आणि मुलगी कॉम्प्युटर सायन्सचे शिक्षण घेत होती. त्यामुळे त्यांनी अशा प्रकारे जीवन संपवल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

काल १ ऑगस्ट रोजी या विनोद पिल्ले यांचा मृतदेह त्यांच्या राहत्या घरात आढळून आला होता. तर सिरजा पिल्ले आणि पौर्णिमा पिल्ले हे बेशुद्ध अवस्थेत आढळून आल्याने त्यांना तातडीने वायसीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, काल उपचारादरम्यान सिराज पिल्ले आणि पौर्णिमा पिल्ले यांचा देखील मृत्यू झाल्याने या परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या तिघांनी विषारी औषधाचा धूर घेऊन आत्महत्या केली असावी असा संशय संत तुकाराम नगर पोलिसांना संशय आहे. आत्महत्या करण्यापूर्वी विनोद पिल्ले यांनी सुसाईड नोट लिहून ठेवली होती. त्यात आमच्या मृत्यूला कोणालाही जबाबदार धरण्यात येऊ नये असे त्यांनी लिहून ठेवले आहे.

### अमरावती-नागपूर महामार्गावर अपघात

कारणीभूत ठरलेल्या वाहनाचा शोध घेण्यासह प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे,' अशी माहिती नांदगाव पेठ पोलिस ठाण्याचे ठाणेदार पुनीत कुलट यांनी दिली.

या प्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे.

### बापट चौकात वाइन शॉपसमोर

त्यांना तातडीने जिल्हा सामान्य रूग्णालय इर्विनमध्ये हलविण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच सिटी कोतवाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला आहे. एसीपी, डीसीपी पथकासह घटनास्थळी आणि इर्विन रुग्णालयात पोहोचले. संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी रुग्णालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. ही हत्या सिटी कोतवाली पोलीस ठाण्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर घडल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके रवाना केली आहेत. लवकरच या प्रकरणाचा उलगडा होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### 'स्वराज सेवा प्रतिष्ठान'ला 'स्व. सोमेश्वर

लोक त्यांना देतात, तर काही वस्तू हे तरुण स्वतःच्या खर्चाने विकत घेऊन संग्रहित करतात.

पुरस्कार स्वीकारताना प्रतिष्ठानचे शिवा काळे म्हणाले, 'पुरस्कारात मिळालेली ही १ लाख रुपयांची रक्कम ऐतिहासिक वास्तूंची देखभाल आणि संवर्धन करण्यासाठीच वापरली जाईल.'

या पुरस्कार सोहळ्याला विविध क्षेत्रांतील दिग्गजांची उपस्थिती लाभली. मंचावर गिरीश गांधी (समाजसेवक, नागपूर) बाळासाहेब कुलकर्णी (ज्येष्ठ पत्रकार व दैनिक लोकमतचे माजी संपादक)डॉ. अविनाश आवलगावकर (कुलगुरू, मराठी विद्यापीठ, रिद्धपूर), विलास इंगोले (माजी महापौर, अमरावती) या सर्व मान्यवरांनी आपल्या भाषणातून तरुणांच्या या कार्याचे मनापासून कौतुक केले आणि संस्कृती जतन करण्याचा संदेश दिला.

गेल्या ६ वर्षांपासून स्व. सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळ अशा सेवाभावी संस्था शोधून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या पुरस्काराचे यशस्वी आयोजन करत आहे. या संपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात ज्येष्ठ पत्रकार, लेखक आणि समाजसेवक अविनाश दुधे यांचा सिंहाचा वाटा राहिला असून उपस्थित नागरिकांनी त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचेही कौतुक केले.

### अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने

शेती साहित्य वाहून गेले. आधिच बोगस बियाणांमुळे शेतकरी संकटात असताना नैसर्गिक आपत्तीने शेतकऱ्यांवरील संकट वाढले आहे. शेतकऱ्यांना तात्काळ सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली.

यावेळी प्रकाश मारोटकर, नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर, सभापती कांता लोमटे ,वासुदेव लोखंडे, निलेश इखार, सुनिल गुरमुळे ,गुणवंत चांदुरकर, जयश्री सुहागपुरे ,भावेष भांबुरकर ,श्रीकृष्ण सोळंके ,गोपाळ बनकर, सुधाकर गभने ,रितेश पकडे ,उकांडराव नितनवरे ,अनिकेत गटूले ,सावदे काका, प्रकाश सुने, सुर्यकांत ब्राम्हणवाडे ,सुरज लोमटे इत्यादि उपस्थित होते.

### दीक्षाभूमीच्या नूतन इमारतीवर

आली. या घटनेप्रकरणी नगर परिषदेचे उपअभियंता मनीष रा. शर्मा यांनी सरमसपुरा पोलिस ठाण्याला अधिकृत पत्र देऊन सरकारी मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या अज्ञात इसमांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सार्वजनिक पैशातून उभारण्यात आलेल्या इमारतीची अशा प्रकारे तोडफोड होणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात असून, यामागील नेमका हेतू काय, याचा तपास करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणात सरमसपुरा पोलिसांचा तपास कोणत्या दिशेने पुढे सरकतो आणि दोषींवर प्रत्यक्षात कोणती कारवाई केली जाते, याकडे अचलपूरकरांचे लक्ष लागले आहे.

### तिवसा हायवेवरील बंद स्ट्रीटलाईट

वाट काढावी लागत होती.ही बाब लक्षात घेता तिवसा नगरपंचायतचे नगरसेवक अनिल थुल यांनी एनएचआय व आयआरबी कंपनीकडे तातडीने महामार्गावरील स्ट्रीट लाईट उभारण्याची मागणी केली.याच मागणीची दखल घेत आयआरबी कंपनीकडून नुकतेच नवीन स्ट्रीट लाईट बसविण्यात आले. यासाठी सम्यक हगवणे यांनी सुद्धा पाठपुरावा केला.

### टाकरखेडा शंभूतील जिल्हा परिषद

गेल्या अनेक वर्षांपासून प्रत्येक पावसाळ्यात याच ठिकाणी पाणी साचून मार्ग बंद होतो. नागरिकांनी वारंवार प्रशासनाकडे तक्रारी करूनही कायमस्वरूपी निचऱ्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गावकऱ्यांनी संबंधित प्रशासन, लोकप्रतिनिधी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने पाहणी करून प्रभावी जलनिचरा व्यवस्था करावी आणि कायमस्वरूपी समस्येवर तोडगा काढावा, अशी मागणी केली आहे. अन्यथा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि नागरिकांचा त्रास यापुढेही कायम राहणार असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### पिसाळलेल्या गाईचा मृत्यू

युवकांनी व नगरपंचायत प्रशासनाच्या टीमने पुढाकार घेत एका बँकेच्या गेटजवळ शिताफीने गाई ला जेरबंद केले व पशुवैद्यकीय डॉक्टरच्या साहाय्याने खबरदारीच्या दृष्टीने काही इंजेक्शन दिले.त्यानंतर तिला सारसी जंगला लगत असलेल्या डम्पिंग ग्राउंड परिसरामागे अधिवासात सोडून नजरकैदेत ठेवले असता तिचा मृत्यू झाल्याची खात्री होताच कंत्राटदार पिंटू राऊत यांनी जेसीबीच्या साहाय्याने खड्डा करून गाईला दफन केले.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## जनतेच्या विश्वासाला विकासाची साथ ; प्रत्यक्ष कार्यातून नेतृत्वाची अमोघ छाप

■ प्रतिनिधी | कारंजा ■

२कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वाबाबत मतदारसंघात सकारात्मक वातावरण असल्याची प्रतिक्रिया अनेक नागरिक व कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधीच्या कार्याचे खरे मूल्यमापन हे मतदारसंघातील जनताच करत असते. त्यामुळे दूरस्थ ठिकाणाहून एकतर्फी भाष्य करण्यापेक्षा विकासकामे, जनसंपर्क आणि निवडणुकांमधून व्यक्त होणारे जनमत हेच नेतृत्वाचे खरे मापदंड असल्याचे मत स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आमदार सईताई डहाके यांनी आमदारपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाची प्रथमच कसोटी लागली. कारंजा नगरपरिषदेच्या राजकीय इतिहासात भारतीय जनता पक्षाला यापूर्वी दोनपेक्षा अधिक नगरसेवक निवडून आणण्यात सातत्याने मर्यादित यश मिळत होते. मात्र, आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच भारतीय जनता पक्षाने दुहेरी आकडा गाठत तब्बल १३ नगरसेवक विजयी करून ऐतिहासिक यश संपादन केले, असे नागरिक आवर्जून नमूद करतात.



याचबरोबर सहकार क्षेत्रातही पक्षाला महत्त्वपूर्ण यश मिळाले. आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वाखाली प्रथमच मध्यवर्ती सहकारी बँकेवर भारतीय जनता पक्षाचा संचालक निवडून आला आणि पक्षाचा झेंडा फडकला. स्थानिक राजकीय जाणकारांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकार क्षेत्रातील ही सलग यशस्वी कामगिरी नेतृत्वावरील जनविश्वास अधिक दृढ करणारी ठरली आहे.

मतदारसंघातील नागरिकांच्या मते, आमदार सईताई डहाके या सातत्याने गावागावात जाऊन नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेतात. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, वीज तसेच इतर विकासकामांसाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करीत असल्याने त्या सर्वसामान्य नागरिकांना सहज उपलब्ध असलेल्या लोकप्रतिनिधी म्हणून ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरल्या आहेत.

नागरिकांच्या प्रतिक्रिया लक्षात घेतल्या तर आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वातील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांची सहज उपलब्धता, कार्याप्रती तत्परता, मानवी समाजाप्रती असलेली संवेदनशीलता, नागरिकांच्या अडचणींची जाण, प्रत्येक समस्या निकाली काढण्याचे कौशल्य आणि सर्वांना समान न्याय देण्याची भूमिका. या गुणांमुळे त्या आज मतदारसंघातील नागरिकांच्या गळ्यातील 'ताईत' बनल्या असल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करीत आहेत.

राजकीय विश्लेषकांच्या मते, कोणत्याही लोकप्रतिनिधीबाबत मत व्यक्त करताना प्रत्यक्ष विकासकामे, नागरिकांचा प्रतिसाद आणि निवडणुकांमधून मिळालेला जनादेश यांचा वस्तुनिष्ठ विचार होणे आवश्यक आहे. केवळ दूरस्थ ठिकाणाहून केलेल्या टीकेपेक्षा जनतेने दिलेला कौल अधिक महत्त्वाचा असतो, असे मतही व्यक्त केले जात आहे.

राजकीय टीका ही लोकशाहीचा अविभाज्य भाग असला तरी ती वस्तुनिष्ठ आणि तथ्याधारित असावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. कारंजा नगरपरिषद निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाचे ऐतिहासिक यश, सहकार क्षेत्रातील वाढते प्रतिनिधित्व आणि मतदारसंघात सातत्याने सुरू असलेली विकासाभिमुख कामे ही आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वावरील जनतेच्या विश्वासाची ठळक उदाहरणे असल्याची भावना मतदारसंघात व्यक्त होत आहे.

## आधुनिक गाडगेबाबा पुंजाजी खंदारे काळाच्या पडद्याआड

### अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता व शिक्षणासाठी आयुष्यभर झटलेल्या प्रबोधनकाराला अखेरचा निरोप

■ प्रतिनिधी | वाशिम ■

संत गाडगेबाबांच्या वेशभूषेतून समाजप्रबोधनाची अखंड ज्योत तेवत ठेवणारे, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा पूर्णवेळ सामाजिक कार्यकर्ते पुंजाजी सदाशिव खंदारे उर्फ पी. एस. खंदारे यांचे शनिवार दि. १ ऑगस्ट रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने वाशिम जिल्ह्यासह राज्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि प्रबोधन क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

वाशिम शहरातील पंचशील नगर येथे वास्तव्यास असलेले पी. एस. खंदारे हे केवळ जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावी प्रबोधनकार म्हणून परिचित होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून त्यांनी अनेक वर्षे समाजातील अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि अवैज्ञानिक समजुतींविरुद्ध जनजागृती केली. प्रत्यक्ष प्रयोग, व्याख्याने आणि लोकसंवादाच्या माध्यमातून त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे कार्य सातत्याने केले.

संत गाडगेबाबांची वेशभूषा परिधान करून किर्तनाच्या माध्यमातून स्वच्छता, शिक्षण, व्यसनमुक्ती, सामाजिक समता आणि मानवतेचा संदेश देणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य होते. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत त्यांनी असंख्य प्रबोधनपर कार्यक्रम सादर करून समाजमनावर ठसा उमटविला.





पी. एस. खंदारे हे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे वाशिम जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत होते. तसेच शिक्षण बचाव समन्वय समितीमध्ये ते सक्रिय होते. राज्यातील सुमारे १५ हजार जिल्हा परिषद शाळा बंद होण्यापासून वाचविण्याच्या आंदोलनात त्यांचे मोलाचे योगदान राहिले. याशिवाय एन. डी. एम. जे. या संघटनेचे राज्य सचिव म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.

सकाळपासून सायंकाळपर्यंत समाजप्रबोधन हेच त्यांचे जीवनध्येय होते. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, सामाजिक विषमता आणि अशिक्षणाविरोधात त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत अविरत जनजागृती केली. त्यांच्या कार्यामुळे असंख्य युवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळाली.

काही महिन्यांपूर्वी पोटाच्या गंभीर आजारामुळे त्यांच्यावर मुंबईतील जे. जे. रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी प्रकृतीवर मात केली होती. मात्र, काही दिवसांपूर्वी प्रकृती पुन्हा खालावल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. नागपूर येथे उपचार सुरू असतानाच शनिवार दि. १ ऑगस्ट रोजी त्यांची प्राणज्योत मालवली.

शनिवारी सायंकाळी वाशिम येथील पद्मतीर्थ मोक्षधाम येथे शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुली, नातू तसेच मोठा आप्तपरिवार आहे.

त्यांच्या निधनाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक आणि प्रबोधन क्षेत्रातील मान्यवरांनी तीव्र शोक व्यक्त केला असून, 'समाजप्रबोधनाच्या चळवळीतील एक झुंजार, निःस्वार्थ आणि अभ्यासू कार्यकर्ता हरपला,' अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

## रोज मरे त्याला कोण रडे .... मेडशी टोल नाक्यची परिस्थिती

### प्रवाशांची तासन तास ताटकळत ठेवून दादागिरी; प्रशासनाने तातडीने चौकशी करावी



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

म्मालेगाव तालुक्यातील मेडशी येथे उभारण्यात आलेल्या टोल नाक्यावरील परिस्थिती रोज मरे त्याला कोण रडे अशी झाली आहे.तेथील कारभाराबाबत वाहनचालकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे टोल नाक्यावर दहा लेन उपलब्ध असतानाही केवळ दोनच लेन सुरू ठेवण्यात येत असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात.वाहनांची नंबर प्लेट मशीनद्वारे वेळेवर स्कॅन होत नसल्याने चालकांना अनेक मिनिटे ताटकळत उभे राहावे लागते काही ठिकाणी अनावश्यक बॅरिकेड्स लावून वाहतूक आणखी संथ करण्यात आल्याचा आरोप वाहनचालकांकडून केला जात आहे विशेष म्हणजे, मालेगाव ते मेडशी हे अवघे १५ ते १८ किलोमीटर अंतर असतानाही या मार्गावर टोल आकारला जात असल्याबाबत नागरिक प्रश्न उपस्थित करत आहेत. 'हा टोल नेमका कोणत्या नियमांनुसार आकारला जातो?' असा सवाल वाहनधारकांकडून केला जात असून, संबंधित यंत्रणेने याबाबत स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी होत आहे टोल वसुलीच्या नावाखाली प्रवाशांना विनाकारण अडवणे, मनमानी कारभार करणे आणि उद्धट वागणूक देणे, व टोल वसुली की खंडणी वसुली अशीही तक्रार वारंवार समोर येत आहे

दिनांक २९ जुलै रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या दरम्यान अकोल्याहून मालेगावकडे काही नागरिक व कर्मचारी यांच्या कारला फास्टट्रॅक असून यांनाही टोल कर्मचाऱ्यांकडून अर्धा तासाहून अधिक वेळ अडवून ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे यावेळी टोल व्यवस्थापकाचा संपर्क क्रमांक मागितला असता तो देण्यास नकार देण्यात आला उलट 'आमच्याकडे नंबर नाही, तुमच्याकडून जे होत असेल ते करा,' व दोन ऑफिस वर गेले असता तेथे सर्व कर्मचारी ड्रिंकच्या अवस्थेत आढळून आले व त्यांना बोलण्याचे सूत सुद्धा नव्हते असे प्रकार त्या टोल नाक्यावर सुरू आहे अशा अरेरावीच्या भाषेत उत्तर देण्यात आल्याचा आरोप संबंधितांनी केला आहे स्थानिकांच्या म्हणण्यानुसार,

या टोल नाक्यावर यापूर्वीही चार ते पाच वेळा वादाचे प्रकार घडले असून, वाहनचालकांना वारंवार मानसिक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे मेडशी टोल नाक्यावरील सीसीटीव्ही फुटेज, कर्मचारी वर्तन, लेन व्यवस्थापन आणि टोल वसुलीची संपूर्ण चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच प्रवाशांना सन्मानाची वागणूक मिळेल यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## रोटरीचे फिरते नेत्र तपासणी अभियान संपन्न

**अकोला :** रोटरी फिरते नेत्र रुग्णालय, रोटरी नॉर्थ व आनंदीलाल चिरानिया ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने सन २०१० पासून जिल्ह्यात अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्जीत फिरत्या वाहनाद्वारे नेत्र तपासणी करणाऱ्या रोटरीच्या फिरत्या नेत्र तपासणी पथकाच्या वतीने गत जुलै महिन्यात अनेक गावांत नेत्र तपासणी अभियान राबविले.या जुलै महिन्यात काजलेश्वर, कारंजा, महागाव, झाडेगाव, खामगाव, चिंचोली, सांगवा, दर्यापूर, बनोसा, पातुर, नंदापूर, घुंगशी, मुंगशी, घोडेगाव, बाळापुर, शिरपूर, खरप, चिखलपुरा, आपातापा, घोटा, चोहट्टा बाजार, मैसपूर, राजंदा, कान्हेरी गवळी, आसोला, म्हैसांग, पारस आदी गावात रुग्णांचे मोफत नेत्र तपासणी अभियान राबविण्यात आले.

## तिसऱ्या अपत्य प्रकरणात कारवाई टाळून फाईल मंत्रालयाकडे ढकलली

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तिसरे अपत्य असलेल्या कर्मचाऱ्याविरुद्ध कायद्याने आवश्यक कारवाई न करता प्रकरण थेट मंत्रालयाकडे 'मार्गदर्शन घेण्यासाठी' पाठवून शासकीय कर्तव्यात जाणीवपूर्वक कसूर केल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते श्री कैलास आत्माराम कराडे यांनी पोलीस अधीक्षकांकडे ३१ जुलै २०२६ रोजी लेखी तक्रार दिली आहे.

**नेमके प्रकरण काय?**

प्रीतम गोपालराव या कर्मचाऱ्याला तिसरे अपत्य आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार संपूर्ण अधिकार अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करणे चे मुख्यकार्यकारी यांना आहे, लहान कुटुंबाचे प्रतिक्ज्यपन २००५ कलम ३ नुसार ज्याच्याही कुटुंबात वाढझळी २००६ मंतर त्याची सेवा ब्राखास्त कार्यवाही करणे बंधनकारक आहे. परंतु जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजित कुडाळ, शिक्षण अधिकारी संजय ससाणे आणि उपशिक्षण अधिकारी डाबेराव यांनी नियमानुसार कारवाई न करता हे प्रकरण शासनाकडे पाठवून कायद्याला बगल दिली, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

**IPC 166, 217, 120B नुसार FIR ची मागणी**

कराडे यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक कायद्याचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर घ्झ्ण कलम १६६ - लोकसेवकाने कायद्याचे उल्लंघन, कलम २१७ - शिक्षा टाळण्यासाठी कसूर आणि कलम १२०ँ - गुन्हेगारी कट या अंतर्गत गुन्हा नोंद करून तात्काळ चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

**सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे:**

'कायदा सगळ्यांसाठी समान आहे. जर सामान्य कर्मचाऱ्यावर कारवाई होते तर अधिकाऱ्यांनी नियम धाब्यावर बसवून फाईल पुढे ढकलणे चुकीचे आहे. कायद्याचे रक्षण करण्यासाठी इ्ँ नोंद होणे गरजेचे आहे' असे सांगितले. पोलीस अधीक्षक कार्यालयाने तक्रार स्वीकारल्याची पोचपावती दिली आहे. आता पोलीस या प्रकरणात काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे जयंती शहरात उत्साहात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगांव येथे १ ऑगस्टला रोजी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती असताना त्यांची जयंती ही मालेगाव शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या निमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली शोभायात्रेत मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी झाले होते तर अनेक मान्यवर मंडळींनी शोभायात्रेत सहभाग घेतला होता शहरातून काढण्यात आलेल्या या शोभायात्रेला उस्फुर्त प्रतिसाद लाभला.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे आज १ ऑगस्ट रोजी १०६ जयंती असताना त्यांची जयंती साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे उत्सव समितीच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली या निमित्त लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या भव्यप्रतिमीची शहरातून शोभायात्रा काढण्यात



आली गांधीनगर येथून या शोभा यात्रेला सकाळी ११ वाजता शोभा यात्रेस सुरुवात झाली. या शोभायात्रेत समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते तर महिलांनी पिवळ्या रंगाची साडी परिधान केली होती तर शोभायात्रेत पिवळे ध्वज घेऊन युवक सहभागी झाले होते ढोल - ताशाच्या निदनात ही शोभायात्रा गांधीनगर तहसील कार्यालय समोरून वीर लहुजी पुतळा येथे आली असता या ठिकाणी वीर लहुजी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले शोभायात्री दरम्यान नविन बस स्टँड चौकात नास्ता ,पाण्याची , चहाची व्यवस्था ठेवण्यात आली होती तर ठीक ठिकाणी पाण्याची व नास्ता , चहाची व्यवस्था ठेवण्यात आली होती. वीर लहुजी चौक येथून ही शोभायात्रा नगरपंचायत समोरून ,शिव चौक , गांधी चौक मार्गे शहराच्या प्रमुख मार्गाने निघाली असता शोभायात्रेत मोठ्या संख्येने समाज बांधवांसह इतर नागरिक सहभागी झाले होते तर यावेळी ढोल - ताशाच्या निदनात युवक हातात पिवळे ध्वज घेऊन मनसोक्त काल धरून नाचत होते शहरातून निघालेल्या शोभा यात्रेने नागरिकेचे लक्ष वेधून घेतले

शोभायात्रेत समाज बांधवाचा मोठा सहभाग

शोभायात्रा शहराच्या प्रमुख मार्गाने निघून सराफा गल्ली येथे आली असता या ठिकाणी मातंग गल्लीत या शोभा यात्रेची सांगता उत्साहात करण्यात आली १०६ व्या जयंती दिनानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेत युवक युवती महिला या मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या अतिशय शांततेने ही शोभायात्रा उत्साहात पार पडली शोभा यात्रे मध्ये मालेगांव पोलीस स्टेशन चे ठाणेदार राजेश खेरडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला

## 'गुरु हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचा शिल्पकार' - प्रा. मंजुषा देशमुख

**रिसोड :** तालुक्यातील एकमेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थिनींनी या कार्यक्रमाचे नियोजन करून शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या मंजुषा सु. देशमुख, पर्यवेक्षक सुनील डहाळके, सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे व्यासपीठावर आगमन होत असताना विद्यार्थिनींनी दोन्ही बाजूंनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. प्रत्येक शिक्षकाला पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक व्यासपीठावर विराजमान करण्यात आले. त्यानंतर प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थिनी सोफिया शेख हिने सुमधुर स्वागतगीत सादर केले. प्रास्ताविक रजनी नखवाल यांनी केले. यावेळी स्नेहल बाजड, रूपाली मोरे, नंदिनी नेव्हल, ईश्वरी खोडे, ईश्वरी भोपाळे, प्राजक्ता भोसले, आशीफा शेख, ज्ञानेश्वरी काळे, वैष्णवी सरदार, आरती बिल्लारी व शितल पवार यांनी गुरु-शिष्य नात्याबद्दल आपले विचार व्यक्त केले.

## अनसिंग येथे काटेकर विद्यालयाची वृक्षदिंडी

### विद्यार्थ्यांनी केला वृक्षारोपणाचा जागर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील अनसिंग येथील हौसाजी काटेकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वृक्षदिंडी काढून नागरिकांना वृक्षारोपणाचे महत्व पटवून दिले.

वाढते तापमान, जमीनीची धूप आणि प्रदुषणावर मात करण्यासाठी अनसिंग येथील हौसाजी काटेकर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची नुकतीच गावामध्ये वृक्षदिंडी काढण्यात आली.या वृक्षदिंडीचा प्रारंभ काटेकर विद्यालया पासून करण्यात आला.विद्यालया पासून निघालेली वृक्षदिंडी गजानन महाराज मंदिर, नागनाथ चौक, गांधी चौकातून मुख्य मार्गाने मार्गस्थ होवून जुने बस स्थानक, सरकारी दवाखाना, खडसिंग चौफुली ,बाजार समिती परिसरातून काढण्यात आली. धर्मवीर संभाजी महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामेश्वर काटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले.

## संततधार पावसामुळे घराची भिंत कोसळली

### कुटुंबाचे सुमारे ६० हजारांचे नुकसान

■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील रिठद येथे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे एका घराची भिंत कोसळून मोठे आर्थिक नुकसान झाल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने संबंधित कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रिठद येथील रहिवासी वैजनाथ गणपत ढेंगळे यांच्या घराची भिंत गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ रोजी सकाळी तसेच रात्री झालेल्या मुसळधार आणि सततच्या पावसामुळे अचानक कोसळली.



भिंत कोसळल्याने घरातील बांधकामाचे नुकसान होऊन सुमारे ६० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. सुदैवाने भिंत कोसळली त्यावेळी घरातील सदस्य सुरक्षित असल्याने मोठी दुर्घटना टळली.

मात्र, घराच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने ढेंगळे कुटुंब चिंतेत आहे. घटनेची तातडीने दखल घेऊन ग्राम विकास अधिकारी तसेच ग्राम महसूल अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करावा आणि शासनाच्या नैसर्गिक आपत्ती मदत निधीतून आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी वैजनाथ गणपत ढेंगळे यांनी केली आहे. दरम्यान, सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे ग्रामीण भागातील अनेक कच्ची व जुन्या बांधकामांची घरे धोकादायक बनली असून अशा घरांची प्रशासनाने तातडीने पाहणी करून आवश्यक ती उपाययोजना करावी, तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना त्वरित आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही ग्रामस्थांकडून होत आहे.

# केंद्र सरकारच्या चार कामगार संहितांवर कामगार संघटनांचा आक्षेप

**राज्यभरातून प्राप्त झाल्या ५९३ सूचना आणि हरकती, विधी व न्याय विभागाकडे जाणार प्रस्ताव आर्टिफिशियल इंटेलिजन्स**

**मुंबई**-केंद्र सरकारच्या चार कामगार संहितांच्या अंमल बजावणीच्या दिशेने राज्य सरकारने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. सरकारने या चार कामगार संहितांबरोबरच राज्यातील आठ कामगार नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी कामगार संघटना, उद्योग संघटना आणि कामगारां कडून सूचना व हरकती मागवि ल्या होत्या. राज्यभरातून एकूण ५९३ सूचना आणि हरकती प्राप्त झाल्याची माहिती कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली.

औद्योगिक संबंध संहिता संदर्भात १०३, वेतन संहिता ११९, सामाजिक सुरक्षा संहिता ७०, व्यावसायिक सुरक्षितता, आरोग्य व कामकाजाच्या अटी संहिता संदर्भात ६९, आरोग्य व सुरक्षिततेशी संबंधित १९६, सर्वसाधारण दोन आणि इतर ३६ अशा एकूण ५९३ सूचना व हरकती प्राप्त झाल्या आहेत.

या हरकती मध्ये काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर कामगार संघटनांनी आक्षेप नोंदविले आहेत. औद्योगिक संबंध संहितेतील कामगार कपात, सेवामुक्ती आणि उद्योग बंद करण्यासंबंधीच्या तरतुदींवर संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. विद्यमान कामगार संहितानुसार १०० किंवा त्यापेक्षा कमी कामगार असलेल्या उद्योगांना काही प्रकरणांत पूर्वपरवानगीशिवाय उद्योग बंद करण्याची मुभा देण्याच्या



तरतुदीवर संघटनांनी आक्षेप घेतला आहे. ही मर्यादा वाढवून किमान ३०० कामगार असलेल्या उद्योगांनाच अशी सवलत देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

कामाचे तास, कामगारांची सुरक्षितता, सामाजिक सुरक्षा, वेतन, बोनस, समान वेतन, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ), कर्मचारी राज्य विमा (ईएसआय), ग्रॅच्युइटी, मातृत्व लाभ तसेच गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांच्या संरक्षणासंदर्भातही अनेक सूचना देण्यात आल्या आहेत.

व्यावसायिक सुरक्षितता आणि आरोग्यविषयक नियम अधिक कडक करण्याची मागणीही अनेक संघटनांनी केली आहे. या सर्व सूचना व हरकतींचे परीक्षण करून त्या राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात येणार आहेत.

विधी विभागाच्या सूचनांनुसार आवश्यक सुधारणा करून चारही कामगार संहितांअंतर्गत राज्याचे नियम अंतिम करण्यात येतील. त्यानंतर सुधारित नियमांचा प्रस्ताव आगामी हिवाळी अधिवेशनात मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे. अधिवेशनात मंजुरी मिळाल्यानंतर महाराष्ट्रात केंद्र सरकारच्या चारही कामगार संहितांची अंमलबजावणी करण्याचा मार्ग मोकळा होईल, असे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी स्पष्ट केले..

# शिंदे गट एक नंबर ढोंगी आणि भंपक

**पुणे** - केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या स्वागतासाठी पुण्यात लावण्यात आलेल्या बॅनरवरून शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे आणि त्यांच्या गटावर निशाणा साधला आहे. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पक्षातील नेते स्वतःला हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे खरे वारसदार आणि धर्मवीर आनंद दिघे यांचे शिष्य मानत असले, तरी प्रत्यक्षात त्यांच्या कृतीत आणि भूमिकेत विरोधाभास दिसून येत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

'एकनाथ शिंदे आणि त्यांची लोकं ही एक नंबरची ढोंगी आणि भंपक आहेत. स्वतःला हिंदुहृदयसम्राटांचे खरे वारसदार म्हणतात, आणि आनंद दिघे माझे गुरू असल्याचे सांगतात; पण बाळासाहेब ठाकरे आणि तुमचा काय संबंध? काल हे लोक घाबरले. अमित शहा इथे काळोखात, रात्री दोन वाजता




## पुण्यातील पोस्टवरून संजय राऊत यांची टीका

आले', असे संजय राऊत म्हणाले. शिंदे गटाला सवाल करत संजय राऊत म्हणाले की, 'अमित शहा यांच्या कृपेने स्वतःला शिवसेनेचा प्रमुख मानणारे हे लोक जनतेला काय सांगणार? मात्र, त्या स्वागताच्या फलकावर बाळासाहेब ठाकरेंचा फोटो नाही आणि स्वतःचे गुरू मानणारे श्री आनंद दिघे यांचाही फोटो नाही. ही कसली भीती? मालकाने सांगितले आहे का की, बाळासाहेब ठाकरेंचा फोटो लावायचा नाही?'

'हे काल पुण्यातल्या एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या होर्डिंगवर स्पष्ट दिसले. बाळासाहेब ठाकरेंचा फोटो नाही आणि स्वतःचे गुरू म्हणून मिरवणारे दिघे साहेब यांचाही फोटो नाही. हे ढोंगी आणि डरपोक लोक आहेत, जे अमित शाह यांना घाबरतात', अशा कडक शब्दात संजय राऊत यांनी शिंदे गटावर टीकेची झोड उठवली.

# एमपीएससी पूर्व परीक्षा आता बदल

**नागपूर**-महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या लाखो उमेदवारांसाठी अत्यंत मोठी आणि दिलासादायक बातमी आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षा पद्धतीत सर्वात क्रांतीकारी आणि ऐतिहासिक बदल जाहीर केले होते. यात ऑनलाईन परीक्षेसह सन २०२७ पासून 'राज्य सेवा, गट-ब आणि गट-क' या महत्त्वाच्या पूर्व परीक्षा वर्षातून दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा आयोजित केल्या जाणार होत्या. मात्र आयोगाने आता ऑनलाइन परीक्षा तूर्तास रद्द करण्यास वर्षातून दोनदा परीक्षा घेण्याच्या निर्णयामध्येही मोठा बदल केला आहे.

सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा आणि महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या तिन्ही परीक्षा वर्षातून केवळ एकदाच घेतल्या जातात.

या परीक्षांना दरवर्षी लाखो उमेदवार बसतात. मात्र, जागांच्या मर्यादित संख्येमुळे बहुतांश उमेदवारांना मुख्य परीक्षेची पात्रता मिळवता येत नाही. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवरील अनावश्यक ताण कमी करण्यासाठी आणि त्यांना यशाच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आयोगाने पूर्व परीक्षा वर्षातून एक पेक्षा अधिक वेळा घेण्याचा निर्णय घेतला होता. या नव्या रचनेनुसार, आता पारंपरिक ओएमआर शीट म्हणजेच पेन-पेपर पद्धतीऐवजी संगणकावर आधारित ऑनलाईन परीक्षा घेतली जाणार होती.

आयोगाने संदर्भ क्रमांक १ येथे नमूद दिनांक २५ जून, २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे सन २०२७ पासून महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने आयोजित करण्याबाबत जाहीर केले होते. दरम्यान, विविध उमेदवारांकडून प्रस्तुत परीक्षा प्रचलित पद्धतीने आधारीत घेण्यासंदर्भात प्राप्त झालेली निवेदने विचारात घेऊन महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा तसेच महाराष्ट्र गट-क सेवा पूर्व परीक्षा या वर्षातून दोन किंवा अधिक वेळा संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने आयोजित करण्याबाबतचा निर्णय जुलै, २०२७ पर्यंत स्थगित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

# राज्यात जुलैत सरासरीहून अधिक पाऊस

**मुंबई**-राज्यात जूनमध्ये पावसाने ओढ दिली होती. मात्र, जुलैमध्ये सरासरीहून अधिक पाऊस नोंदला गेल्याने बहुतांश भागांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, भारतीय हवामानशास्त्र विभागाने जूनअखेरीस दीर्घकालीन अंदाजात राज्यात विदर्भ वगळून इतरत्र सरासरीहून कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. मात्र, प्रत्यक्षात राज्यात जुलै महिन्याच्या सरासरीहून ४० टक्के अधिक पावसाची नोंद झाली. त्यामुळे दुष्काळाचे सावट असलेल्या बहुतांश प्रदेशांना दिलासा मिळाला आहे.

राज्यात यंदा मोसमी पाऊस विलंबाने दाखल झाला. मात्र, हंगामाच्या सुरुवातीपासूनच राज्यात पावसाचे प्रमाण असमान होते. तसेच सर्वदूर पावसाचाही अभाव होता. त्यामुळे जून



अखेरीस राज्यातील बहुतांश भागात सरासरीहून कमी पाऊस नोंदला गेला. दरम्यान, जुलैच्या पहिल्या आणि शेवटच्या आठवड्यात मोमसी पावसाला बळ देणाऱ्या हवामान प्रणालींच्या सक्रियतेमुळे राज्यात चांगल्या पावसाची नोंद झाली.

बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्राच्या प्रभावामुळे मागील काही दिवसांत जूनच्या तुलनेत विदर्भ आणि मराठवाड्यात समाधानकारक पावसाची नोंद झाली. त्यामुळे या प्रदेशात असणारी पावसाची तूट काहीशी भरून निघाली. राज्यात आतापर्यंत मोसमी पावसाच्या हंगामात ६ टक्के अधिक पावसाची नोंद झाली. तसेच कोकण प्रदेशात २ टक्के अधिक, मध्य महाराष्ट्रात २० टक्के अधिक, तर मराठवाड्यात ८ टक्के आणि विदर्भात १ टक्का कमी पाऊस नोंदला गेला. तसेच नंदुरबार, सोलापूर, सिंधुदुर्ग, बीड आणि हिंगोली आदी भागात पावसाची तूट २० टक्क्यांहून अधिक आहे.

नैऋत्य मोसमी पावसाच्या हंगामादरम्यान प्रशांत महासागरातील 'एल निनो' स्थिती अधिक तीव्र होण्याचा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मध्य आणि पूर्व विषुववृत्तीय प्रशांत भागातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीहून जास्त आहे, अशी माहिती हवामान विभागाने प्रसिद्ध केलेल्या माहितीपत्रकात देण्यात आली आहे.

तसेच हिंदी महासागरातील इंडियन ओशन डायपोल (आयोडी) तटस्थ स्थितीत असून मोसमी पावसाच्या हंगामात ही तटस्थ स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. मात्र, काही आंतरराष्ट्रीय हवामान अंदाज केंद्रांच्या अंदाजानुसार सप्टेंबरमध्ये ही सकारात्मक स्थिती निर्माण होण्याचा अंदाज आहे, असे हवामान विभागाने नमूद केले आहे.

# महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी

**मुंबई**-सक्तीने किंवा फसवून केल्या जाणाऱ्या धर्मांतराला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे. यामुळे महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा राज्यात लागू होणार आहे. या कायद्यानुसार राज्यात बळजबरीने किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल.

नव्या कायद्यानुसार राज्यात कोणत्याही व्यक्तीचे बळजबरीने, धमकावून, फसवून किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणे हा गंभीर आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. दोषी आढळल्यास सात वर्षांपर्यंतच्या कठोर कारावासाची शिक्षा आणि एक लाखापर्यंतच्या दंडाची तरतूद कायद्यात आहे. जर



## आंतरधर्मीय विवाह झाल्यास अपत्याला आईचा धर्म मिळणार

एखाद्याला स्वेच्छेने धर्मांतर करायचे असेल तर त्यासाठी कायद्यात विशेष नियमाची तरतूद आहे. स्वेच्छेने धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला ६० दिवस (२ महिने) आधी सक्षम प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करावा लागणार आहे. प्राधिकरणाकडून कायदेशीर पडताळणी आणि मंजुरी मिळाल्या नंतरच संबंधित व्यक्तीला धर्मांतर करता येईल.

# आषाढी यात्रेत लालपरी ठरली लाखो भाविकांची विश्वासाची सोबती!

**महामंडळाला ४१ कोटी १८ लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न, ५५०० बसेसद्वारे ९ लाखांहून अधिक भाविक-प्रवास सुखरूप**

**मुंबई** -'पंढरीची वारी'ही महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेचा आत्मा आहे. विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे निघालेल्या लाखो भाविकांच्या प्रवासात यंदाही महाराष्ट्राची 'लालपरी' विश्वासाची सोबती ठरली. आषाढी यात्रेनिमित्त एसटी महामंडळाने सुमारे ५,५०० बसेसच्या माध्यमातून ९ लाखांहून अधिक भाविक-प्रवाशांना सुखरूप आणि सुरक्षित प्रवास घडविला. लाखो वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य एसटी परिवाराला लाभले, ही आमच्यासाठी विठुरायाची कृपाच असल्याची भावनिक प्रतिक्रिया परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

आषाढी यात्रेसाठी एसटी महामंडळाने राज्याच्या विविध भागांतून पंढरपूरसाठी विशेष वाहतुकीचे नियोजन केले होते. यात्रेच्या कालावधीत एसटीने २१ हजार ५२७ फेऱ्यांद्वारे ९ लाख २४ हजार ७३८ भाविक-प्रवाशांनी प्रवास केला. विशेष म्हणजे, यात्रेच्या वाहतुकीतून एसटी महामंडळाला ४१ कोटी १८ लाख रुपयांपेक्षा अधिक




उत्पन्न मिळाले. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्नात सुमारे ५ कोटी ३० लाख रुपयांची वाढ झाली आहे. याबाबत सरनाईक म्हणाले, 'गळ्यात तुळशीची माळ, मुखी विठ्ठलाचे नाम आणि मनात पांडुरंगाच्या भेटीची ओढ घेऊन लाखो वारकरी पंढरीच्या दिशेने निघतात. त्यांच्या या भक्तिमय प्रवासाचा एक छोटासा भाग होण्याचे भाग्य आपल्या लालपरीला दरवर्षी लाभते. एखाद्या भाविकाला विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला सुखरूप पोहोचवणे आणि दर्शनानंतर त्याला सुरक्षितपणे आपल्या कुटुंबापर्यंत पोहोचवणे, ही केवळ प्रवासी वाहतूक नाही; ती एसटीच्या माध्यमातून घडणारी विठ्ठलसेवाच आहे.'

राज्यातील विविध विभागांतून आलेल्या बसेस, चालक-वाहक तसेच यांत्रिक, सुरक्षा आणि प्रशासकीय विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या यात्रेसाठी अहोरात्र मेहनत घेतली. भाविक - प्रवाशांना विविध सवलतींचा लाभ देत प्रचंड गर्दी, वाहतुकीचा ताण आणि हजारो फेऱ्यांचे नियोजन केले. अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीतही भाविकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटीच्या कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडली. अशाच प्रकारे संपूर्ण राज्यातील प्रवासी हा आपला 'विठुराया' आहे, असे मानून प्रवासी देवो भव: या भावनेतून एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातत्याने आपली सेवा बजावावी असे आवाहन या निमित्ताने मंत्री सरनाईक यांनी केली आहे.

# संक्षिप्त

## जीएसटी संकलन २.११ लाख कोटी

**मुंबई**-जुलै २०२६ या महिन्यात देशाचे एपूण वस्तू आणि सेवा कर म्हणजेच जीएसटी संकलन २.११ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यामध्ये १५.४ टक्क्यांची मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त जीएसटी जमा होण्याची ही दुसरी वेळ ठरली आहे.




## अमरनाथ यात्रामार्ग पुन्हा खुला

**जम्मू**-मुसळधार पावसामुळे दोन दिवस बंद असलेला जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग अंशतः पुन्हा सुरू करण्यात आला आहे, त्यानंतर रविवारी सकाळी भगवती नगर बेस कॅम्पवरून ३ हजार ८८६ यात्रेकरूंची नवीन तुकडी अमरनाथ यात्रेसाठी रवाना झाली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, एका दिवसाच्या विश्रांतीनंतर, २५ वी तुकडी कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत १७७ वाहनांच्या ताफ्यासह पहाटे २:५२ वाजता जम्मू बेस कॅम्पवरून मध्य काश्मीरमधील गांदरबल येथील बाल्टालसाठी रवाना झाली. अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू झाली. आतापर्यंत साडेचार लाखांहून अधिक यात्रेकरूंनी अमरनाथ गुहेला भेट दिली आहे. ५७ दिवसांची ही यात्रा २८ ऑगस्टला संपणार आहे.



## तस्लिमा नसरीन यांच्या कोलकातामधील कार्यक्रमात गदारोळ

**मुंबई**-बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांचा बहुचर्चित कोलकाता दौरा शनिवारी चर्चेत राहिला. येथील एका कार्यक्रमादरम्यान प्रसिद्ध बंगाली कवी जॉय गोस्वामी यांना मंचावर येण्याचे निमंत्रण दिल्यानंतर सभागृहात एकच गदारोळ उडाला. प्रेक्षकांच्या एका गटाने कवी गोस्वामी यांच्या उपस्थितीला तीव्र विरोध दर्शवत घोषणाबाजी केली. या अचानक झालेल्या गदारोळामुळे तस्लिमा नसरीन यांचे भाषण काही काळ थांबवावे लागले. नोव्हेंबर २००७ मध्ये झालेल्या हिंसक आंदोलनांनंतर तस्लिमा नसरीन यांना कोलकाता सोडावे लागले होते. सुरुवातीला त्यांना जयपूर आणि नंतर केंद्र सरकारच्या सुरक्षेत नवी दिल्लीत हलवण्यात आले होते, ज्यानंतर त्यांनी भारत सोडला होता. या सर्व घडामोडींनंतर शनिवारी तब्बल दोन दशकांनंतरच्या कोलकाता पुनरागमन प्रसंगी एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाषणासाठी निमंत्रित करण्यात आल्यानंतर, नसरीन यांनी समोर प्रेक्षकांमध्ये बसलेले आधुनिक बंगाली साहित्यातील नामवंत कवी जॉय गोस्वामी यांना मंचावर येण्याची विनंती केली.



## गुलवीर सिंगची अभूतपूर्व कामगिरी

**नवा दिल्ली**-हिंदुस्थानचा धावपटू गुलवीर सिंगने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये इतिहास रचला आहे. पुरुषांच्या ५००० मीटर शर्यतीच्या अंतिम फेरीत कांस्यपदक पटकावून या प्रकारात राष्ट्रकुल पदक जिंकणारा तो पहिलाच भारतीय ॲथलीट ठरला आहे. याआधी त्याने १०००० मीटर शर्यतीत रौप्यपदक जिंकले होते. एकाच राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ५००० मीटर आणि १०००० मीटर या दोन्ही प्रकारांत पदके जिंकणारा तसेच ॲथलेटिक्समध्ये एकाच प्रकारात दोन पदकांची कमाई करणारा तो पहिला हिंदुस्थानी खेळाडू बनला आहे. ५००० मीटर शर्यतीचा अंतिम सामना अत्यंत अटीतटीचा झाला. गुलवीरने १३ मिनिटे २४.९५ सेकंद वेळ नोंदवत केनियाच्या कॉर्नेलियस केमबोईला सेकंदाच्या अवघ्या चार शंभरांश फरकाने मागे टाकले आणि कांस्यपदकावर आपले नाव कोरले. या शर्यतीत केनियाच्या मॅथ्यू किपसांगने १३ मिनिटे २३.६१ सेकंद वेळेसह सुवर्णपदक, तर ऑस्ट्रेलियाच्या काय रॉबिन्सनने १३ मिनिटे २४.७० सेकंद वेळेसह रौप्यपदक मिळवले.



## केरळमध्ये भूस्खलन, महिलेसह तिघे ठार



**केरळ**-केरळमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूर आणि भूस्खलनाच्या घटना घडत असून परिस्थिती गंभीर बनली आहे. इडुक्की जिल्ह्यात शनिवारी झालेल्या भूस्खलनात एका महिलेसह तिघांचा मृत्यू झाला. अनेक जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

## चिप्सच्या पाकिटातील चेंडू गिळल्याने चिमुकल्याचा मृत्यू

**म्हैसूर**-कर्नाटकच्या म्हैसूर जिल्ह्यात हृदयद्रावक घटना घडली आहे. चिप्सच्या पाकिटात मिळालेला लहान चेंडू गिळल्याने एका पाच वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला. याप्रकरणी हुन्सूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात शोक व्यक्त करण्यात येत आहे. एनडीटीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, संतोष आणि ऐश्वर्या यांचा पाच वर्षांचा मुलगा मुकुंद मयूर याने कुरकुरेच्या पाकिटात मिळालेला लहान चेंडू गिळला. हा चेंडू घशात अडकल्याने श्वास गुदमरला आणि मुकुंदचा मृत्यू झाला, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २४७ ■ सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## पोलिसांना खुले आव्हान

# गॅस कटरने एटीएम फोडून १२.२२ लाखांची रोकड लंपास

### खरांगणा पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर थरार; सात पोलिस पथके तपासात, सीसीटीव्हीच्या आधारे चोरट्यांचा शोध सुरू

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील सुरक्षा व्यवस्थेला खुले आव्हान देत अज्ञात चोरट्यांनी गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन फोडून तब्बल १२ लाख २२ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची धाडसी घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. वर्धा-आर्वी मार्गावरील खरांगणा (मो.) पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मोरांगणा येथील बँक ऑफ इंडियाच्या एटीएमला लक्ष्य करण्यात आले. विशेष म्हणजे हे एटीएम पोलिस ठाण्यापासून अवघ्या हाकेच्या अंतरावर असल्याने या चोरीने पोलिस व्यवस्थेलाच मोठे आव्हान उभे केले आहे.

मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने एटीएम कक्षात प्रवेश केला. त्यानंतर गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन कापून त्यातील रोकड काढली. चोरीनंतर आरोपींनी घटनास्थळावरून पोबारा केला. रविवारी सकाळी काही नागरिकांच्या निदर्शनास एटीएम फोडल्याचे आल्याने त्यांनी तातडीने खरांगणा पोलिसांना माहिती दिली.




माहिती मिळताच ठाणेदार चंद्रकांत पाटील यांच्यासह पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी वंदना कारखेले यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. चोरीचा तपास युद्धपातळीवर सुरू करण्यात आला असून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनास्थळी स्थानिक गुन्हे शाखा, श्वान पथक आणि ठसेतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. चोरट्यांचा माग काढण्यासाठी सात स्वतंत्र पोलिस पथके रवाना करण्यात आली असून परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेऊन त्याचे बारकाईने विश्लेषण सुरू आहे. चोरीपूर्वी आणि चोरीनंतर संशयास्पद हालचाली करणाऱ्या वाहनांचाही पोलिसांकडून शोध घेतला जात आहे.

#### सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह

ज्या एटीएमवर चोरी झाली तेथे रात्री सुरक्षा रक्षक नसल्याचे समोर आले आहे. तसेच एटीएममधून धूर निघत असल्याचे लक्षात येताच महावितरणचा कर्मचारी अनिकेत यांनी धाव घेत आग विझविली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, पोलिस ठाण्याच्या अगदी जवळ असलेल्या एटीएमवर इतक्या नियोजनबद्ध पद्धतीने चोरी झाल्याने एटीएम सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

#### सीसीटीव्हीवर पोलिसांची भिस्त

घटनास्थळ व परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रिकरण पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यातून आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तांत्रिक तपासासोबतच विविध मार्गावरील नाकाबंदी आणि संशयितांची पडताळणीही सुरू असून या धाडसी चोरीचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी सर्व यंत्रणा कामाला लावली आहे.

## गांजा-दारू अड्ड्यावर एलसीबीची धाड; १.९७ लाखांचा मुद्देमाल जप्त

### महिला, अल्पवयीन मुलीसह चौघांवर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील अंमली पदार्थ व अवैध दारूविक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत सेवाग्राम पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मदनी वॉर्ड येथे गांजा व दारूची विक्री करणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत ५५१ ग्रॅम गांजा, देशी-विदेशी व मोहाची दारू, एक सुझुकी बर्गमन दुचाकी, नगदी व दोन मोबाईल असा एकूण १ लाख ९७ हजार २७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या अँटी नार्कोटिक्स पथकाने १ ऑगस्ट रोजी गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली.

मदनी वॉर्ड क्रमांक २ येथील प्राथमिक शाळेमागे सराईत गुन्हेगार शंकर गुलाब पवार यांच्या घरी छापा टाकला असता तेथे त्यांची पत्नी चंदा शंकर पवार, अल्पवयीन मुलगी आणि भाऊ राजू गुलाब पवार हे संगनमताने गांजा व दारूची विक्री करताना आढळून आले. झडतीदरम्यान घरातून ५५१ ग्रॅम गांजा, देशी-विदेशी व मोहाची दारू, मालाच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी सुझुकी बर्गमन (एमएच-३२-बीए-७६६०), अवैध मार्गाने मिळालेली रोकड तसेच दोन मोबाईल जप्त करण्यात आले.

या प्रकरणी चार आरोपींविरुद्ध सेवाग्राम पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सिनुकुमार बानोत तसेच अँटी नार्कोटिक्स पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

### ३५ वर्षीय युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील जयपूर येथील पिंटू श्रावण वानखेडे (वय ३५) यांनी रविवारी दुपारी चार वाजताच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ते अविवाहित होते. प्राथमिक माहितीनुसार, त्यांना दारूचे व्यसन होते. त्यातून उद्भवलेल्या आजारपणामुळे त्रस्त होऊन त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

## नेरी येथे गोठ्याला भीषण आग; ५ जनावरांचा होरपळून मृत्यू

### शॉर्टसर्किटचा प्राथमिक अंदाज; शेतकऱ्याचे ५ लाखांपर्यंत नुकसान

**अल्लीपूर जनमाध्यम :** वर्धा-हिंगणघाट मार्गावरील नेरी येथे शेतकरी अभिजित जोगे यांच्या गोठ्याला भीषण आग लागून पाच जनावरांचा होरपळून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शनिवारी (१ ऑगस्ट) सायंकाळी घडली. या आगीत गोठ्यातील दोन बैल, तीन गाई दगावल्या, तर दोन वासरे गंभीररीत्या भाजल्याची माहिती मिळाली. आग इतकी भीषण होती की, गोठ्यातील शेतीसाठी लागणारे साहित्य, खत, गुरांचा चारा, पाईप, पंप आदी साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले.

प्राथमिक माहितीनुसार, महावितरणच्या वीज खांबावरील तारांमध्ये झालेल्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आगीचे लोळ पाहून ग्रामस्थांनी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.



या दुर्घटनेत शेतकऱ्याचे सुमारे ४ ते ५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. खरीप हंगामाच्या तोंडावरच शेतीची मुख्य ताकद असलेले बैल दगावल्याने पुढील शेतीची कामे कशी करायची, असा गंभीर प्रश्न शेतकरी अभिजित जोगे यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

घटनेचा पंचनामा महसूल विभागाच्या तलाठ्यांनी केला असून, शासनाने तातडीने आर्थिक मदत देऊन नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी जोगे यांनी केली आहे.

## पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील १४ स्थळांना तीर्थक्षेत्रांना 'क' वर्ग दर्जा

### वर्ध्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक उभारणार

**वर्धा जनमाध्यम :** पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्ह्याच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामीण भागातील १४ देवस्थाने, यात्रास्थळे आणि तीर्थक्षेत्रांना 'क' वर्गाचा दर्जा मंजूर करण्यात आला. तसेच वर्धा शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीस खासदार अमर काळे, आमदार अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, अरुण लखानी, समीर कुणावार, राजेश बकाने, सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



बैठकीच्या प्रारंभी पालकमंत्री डॉ. भोयर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून त्यांच्या साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक योगदानाचा गौरव केला. मुंबईतील त्यांच्या निवासस्थानाचे स्मारक म्हणून जतन करण्याचा तसेच सुमारे ३०० कोटी रुपयांच्या विकास आराखड्याचा शुभारंभ केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही त्यांनी अभिनंदन केले.

'क' वर्गाचा दर्जा मिळालेल्या १४ तीर्थक्षेत्रांमध्ये समुद्रपूर, वर्धा, देवळी, तळेगाव, सावंगी (मेघे), बोरगाव (मेघे), शिरपूर, आलोडी, सेलू, महाकाळ, म्हसाळा आणि नाचणगाव येथील विविध देवस्थाने, मंदिरे व संतांच्या संस्थानांचा समावेश आहे.

या निर्णयामुळे संबंधित तीर्थक्षेत्रांमध्ये रस्ते, पाणी, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, भाविकांसाठी निवारा, पार्किंग यांसारख्या मूलभूत सुविधा विकसित करण्यास गती मिळणार आहे. धार्मिक पर्यटनाला चालना मिळून स्थानिक रोजगाराच्या संधी वाढतील, तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळेल, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला. वर्धा शहरातील अण्णाभाऊ साठे यांच्या प्रस्तावित स्मारकामुळे त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होणार असून जिल्ह्याच्या सांस्कृतिक वैभवातही मोलाची भर पडणार आहे.

## पिसाळलेल्या गाईचा मृत्य

### सारसी जंगल परिसरात केले दफन

**तिवसा/प्रतिनिधीः-** गेल्या तीन दिवसांपूर्वी पिसाळलेल्या एका गाई ने तिवसा येथील शिक्षक कॉलनी,रतनगिर नगर परिसरात चांगलाच हैदोस घातला होता.अनेक जण गाईच्या हल्ल्यात जखमी झाले असता नगरपंचायत टीम व काही धाडसी प्राणीमित्र एकत्रित येऊन गाईला जेरबंद करून सारसी जंगल परिसरात सोडले असता तेथेच गाईने शुक्रवारी प्राण सोडला.त्यानंतर गाईला खड्डा करून दफन करण्यात आल्याने नागरिकांनी सुटकेचा स्वास सोडला आहे.

तिवसा शहरात पिसाळलेली गाय समोर दिसेल त्याच्या अंगावर धावून हल्ला चढवित होती.या हल्ल्यात ५ ते ६ जण जखमी झाले होते.त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असता त्या गाईला पकडणे हे सुद्धा नगरपंचायत प्रशासनासमोर एक आव्हान होते.अश्यात गाईच्या हल्ल्यात जीवितहानीची घटना घडू नये,याकरिता तिवसा येथील प्राणीमित्र अविनाश पांडे,सामाजिक कार्यकर्ते पिंटू राऊत,प्रणव गौरखेडे यांच्यासह काही धाडसी युवकांनी व नगरपंचायत प्रशासनाच्या टीमने पुढाकार घेत एका बँकेच्या गेटजवळ शिताफीने गाई ला जेरबंद केले व पशुवैद्यकीय डॉक्टरच्या साहाय्याने खबरदारीच्या दृष्टीने काही इंजेक्शन दिले.त्यानंतर तिला सारसी जंगला लगत असलेल्या डम्पिंग ग्राउंड परिसरामागे अधिवासात सोडून नजरकैदेत ठेवले असता तिचा मृत्यू झाल्याची खात्री होताच कंत्राटदार पिंटू राऊत यांनी जेसीबीच्या साहाय्याने खड्डा करून गाईला दफन केले.

### लाडक्या बहिणींनंतर आता एसटी सवलतींची तपासणी;

## आर्थिक शिस्तीसाठी सरकारचा मोठा निर्णय

### तिकीट सवलत प्रतिपूर्तीची पडताळणी सुरू

**वर्धा जनमाध्यम :** 'लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थ्यांच्या छाननीनंतर आता राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळातील विविध तिकीट सवलतींच्या लाभार्थ्यांचीही झडती घेण्याचा निर्णय घेतला आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर सवलतीच्या प्रवर्गातील प्रवाशांची माहिती तपासून तिकीट सवलत प्रतिपूर्तीच्या दाव्यांची अचूकता पडताळण्याचे निर्देश परिवहन विभागाने दिले आहेत.

एसटी महामंडळाची दिवसेंदिवस खालावत चाललेली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वित्तीय शिस्त, काटेकोर लेखापरीक्षण आणि महसूलवाढीवर सरकारने भर दिला आहे.

परिवहन विभागात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत उपसचिव, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महामंडळावरील वाढते कर्ज, देणी, उत्पन्नाचे स्रोत, पुढील पाच वर्षांचे आर्थिक नियोजन तसेच कर्मचारी स्थितीचा सविस्तर आढावा घेतला.

बैठकीत सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) प्रकल्पांचे पुनर्मूल्यांकन, महामंडळाच्या मालमत्तेचा व्यावसायिक वापर, महसूलवाढीसाठी तातडीच्या उपाययोजना आणि सवलत प्रतिपूर्तीतील संभाव्य गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर पडताळणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सरकारच्या या निर्णयामुळे एसटीच्या सवलत योजनांतील अपात्र लाभार्थी आणि बनावट दाव्यांवर लगाम बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सरकारचा हा निर्णय एसटी महामंडळाची आर्थिक घडी पुन्हा मजबूत करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानला जात आहे.

## अतिदृष्टी मुळे मंगरूळ व हरणी गावात हाहाकार

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर तालुक्यात ३० जुलै रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य अतिवृष्टीमुळे मंगरूळ चवाळा व हरणी या दोन गावातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला असून रात्र त्यांना जागून काढावी लागली. या गावात अतिवृष्टीमुळे हाहाकार उडाला. दोन्ही गावातील नागरिकांच्या घरात नदीच्या पुराचे पाणी घुसले असून पूर इतका भयंकर होता की जीव वाचविणे कठीण झाले होते. पुराच्या पाण्याने मोठ्या प्रमाणात घराची पडझड झाली असल्याने अनेक नागरिकांचे संसार उघड्यावर आले. मंगरूळ आणि हरणी या गावाला लागूनच दोन धरणे असल्यामुळे भीतीचे वातावरण तयार झाले होते. मोठ्या प्रमाणात आलेल्या पुराने नागरिकांची जनावरे सुद्धा दगावली. गावकऱ्यांनी याप्रसंगी सावधान राहून आपतग्रस्त लोकांना इतरत्र हलविले.





मंगरूळ आणि हरणी दोन्ही गावाला पुराच्या पाण्याने नदी नाल्याकाठची जमीन पूर्णपणे खरडून गेली. प्रशासनाने ज्यांची घरे पडली त्यांना तात्काळ मदत केली. खर्डून गेलेल्या शेतीचे पंचनामे करण्यात यावे व आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. आमदार प्रताप अडसड यांनी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. माजी आमदार वीरेंद्र जगताप, अभिजीत ढेपे ,बाळासाहेब राणे, सरपंच राजू पारधी ,अतुल ठाकूर, पंकज पिंपळकर, मोहित झोपाटे ,दीपक पीपलकर पोलीस पाटील यांनी घराची आणि शेतीचे झालेले नुकसान भरपाई देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे विनंती केली.

### ३,१९५ रुग्णवाहिकांना मिळणार सुविधा

## आरोग्य सेवेत तंत्रज्ञानाची नवी क्रांती; १०२ रुग्णवाहिकांसाठी 'कॅशलेस पेट्रोकार्ड' सुविधेचा शुभारंभ

### सर्व रुग्णांसाठी १०२ सेवा उपलब्ध करण्याचे आरोग्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक तंत्रस्नेही, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत १०२ रुग्णवाहिका सेवेसाठी 'कॅशलेस पेट्रोकार्ड' या अभिनव सुविधेचा शुभारंभ सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आला. मुंबई येथील आरोग्य सेवा आयुक्तालयात आयोजित कार्यक्रमात या उपक्रमाचे उद्घाटन झाले.

यावेळी आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त जगन्नाथ विरकर, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक सुनिता गोलाईत, प्रकल्प संचालक (ईएमएस) रवींद्र सावंत, उपसंचालक जयंत मुळे तसेच राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि एचपीसीएलचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी बोलताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, आरोग्य सेवा ही सर्वसामान्य नागरिकांसाठी जीवनदायी व्यवस्था असून त्यात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे काळाची गरज आहे. 'कॅशलेस पेट्रोकार्ड'मुळे रुग्णवाहिकांच्या इंधन खरेदीत आर्थिक पारदर्शकता येईल, कामकाजातील विलंब कमी होईल आणि संपूर्ण यंत्रणा अधिक उत्तरदायी बनेल.



राज्यातील शासकीय वाहनांना वेळेत इंधन उपलब्ध होण्याबाबत येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या माध्यमातून राज्यातील ३,१९५ रुग्णवाहिकांना एचपीसीएलचे कॅशलेस पेट्रोकार्ड उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यापूर्वी १०२ रुग्णवाहिका सेवा प्रामुख्याने माता व बालकांसाठी मर्यादित होती. आता ही सेवा सर्व रुग्णांसाठी उपलब्ध करून अधिक प्रभावी करण्याचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी दिले. तसेच १०८ रुग्णवाहिका सेवेला सक्षम पर्याय म्हणून १०२ सेवेचा विस्तार करण्यावरही भर देण्यात आला. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रभावी मॉनिटरिंगच्या माध्यमातून नागरिकांना अधिक जलद, दर्जेदार व विश्वासार्ह आपत्कालीन आरोग्य सेवा देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगत, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने सेवाभावाने कार्य करावे, असे आवाहनही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.


### कोर्ट विद्यमान श्री समर्थ क्षिरसागर तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी यांचे न्यायालय देवळी

जन्म - मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये ज.मू.नो.र.प्र.क्र.- /२०२५-२६

## जाहीरनामा

याअर्थी अर्जदार श्रीमती रेखा मारोती कैकाडे रा. देवळी ता. देवळी जि. वर्धा यांचे वडीलांची आई श्रीमती कुसुम वसंतराव कैकाडे यांचा मृत्यु ०१/०५/२०२१ रोजी देवळी येथे झालेला असून त्यांचे मृत्युचो नोंद घेणेबाबत जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १३(३) आणि महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम व फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २० चे पोटकलम (१) अंतर्गत मृत्युची नोंद नगर परिषद कार्यालय, देवळी येथे उपलब्ध नसल्याने नगर परिषद, देवळी यांचे कार्यालयातोल अधिकृत नोंदणी पुस्तिकेमध्ये नोंद घेण्याचा आदेश होणेबाबत या कार्यालयास नगर परिषद, वर्धा याचेव्दारे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी सदर व्यक्तीच्या जन्माच्या नोंदीबाबत हितसंबंधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनो निश्चित केलेल्या तारखेस स्वतः अथवा विधी व्यवसायोमार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्त्यामार्फत हजर राहून १५ दिवसाचे आत सादर करावे उक्त तारखेनंतर व ठिकाणी अशा रीतीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यास कसूर केल्यास त्यानंतर प्राप्त कोणत्याही हरकती व आक्षेप विचारात देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी,

दिनांक:- /५/२०२६

**तहसिलदार देवळी**

## संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

# विकसित अर्थव्यवस्था

भारतातील बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांची पद्धत गेल्या दशकात आमूलाग्र बदलली आहे. एके काळी बँकेच्या शाखेत जाऊन पैसे काढण्यासाठी तासनतास रांगेत उभे रहावे लागायचे. त्यानंतर एटीएम यंत्रणा आली आणि ग्राहकांच्या आयुष्यात मोठी सोय निर्माण झाली. मात्र तंत्रज्ञानाची वाटचाल येथेच थांबली नाही. भारताने आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. आता एटीएममधून पैसे काढण्यासाठी प्लास्टिक कार्डची गरज उरलेली नाही. मोबाईल आणि यूपीआयच्या साहाय्याने कार्डशिवाय थेट एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. ही सुविधा म्हणजे केवळ तांत्रिक सुधारणा नसून भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने जगाला यूपीआयच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचे एक अद्वितीय मॉडेल दिले. यूपीआयने अगदी चहाच्या टपरीपासून मोठ्या शॉपिंग मॉलपर्यंत सर्वत्र व्यवहारांची पद्धत बदलून टाकली. आता त्याच यूपीआयचा वापर करून एटीएममधून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक सुरक्षित, सुलभ आणि सर्वसमावेशक बनले आहे. कार्डलेस एटीएम म्हणजे अशी यंत्रणा ज्यामध्ये ग्राहकाला पैसे काढण्यासाठी एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकावे लागत नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरील यूपीआय अनुप्रयोगाचा वापर करून एटीएमशी संवाद साधतो आणि काही सेकंदांमध्ये रोख रक्कम प्राप्त करतो. या प्रक्रियेमुळे कार्ड बाळगण्याची गरज संपते आणि अनेक प्रकारच्या फसवणुकीपासून संरक्षण मिळते.या सुविधेची कार्यपद्धती अत्यंत सोपी आहे. ग्राहक एटीएमच्या पडद्यावर रोख रक्कम काढण्याचा पर्याय निवडतो. त्यानंतर आवश्यक रक्कम नमूद करतो. एटीएम मशीन लगेच एक विशेष क्यूआर कोड तयार करते. ग्राहक आपल्या मोबाईलमधील यूपीआय ॲप्स उघडून हा कोड स्कॅन करतो. त्यानंतर यूपीआय पासवर्ड टाकून व्यवहाराला मंजुरी देतो. काही क्षणांमध्ये एटीएममधून रोख रक्कम बाहेर येते. संपूर्ण प्रक्रियेत कार्डचा वापर होत नाही आणि कोणत्याही अतिरिक्त उपकरणाची आवश्यकता रहात नाही. सामान्य नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अनेकदा आपण एटीएम कार्ड घरी विसरतो किंवा ते पाकिटासह हरवते. अशा वेळी अचानक पैशांची गरज भासल्यास मोठी अडचण निर्माण होते. कार्डलेस एटीएममुळे ही समस्या पूर्णपणे दूर होते. आज बहुतांश लोकांकडे स्मार्टफोन असतो आणि त्यावर यूपीआय ॲप्स सक्रिय असतो. त्यामुळे केवळ मोबाईलच्या सहाय्याने पैसे काढणे शक्य होते. सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ही सुविधा अधिक महत्त्वाची ठरते. गेल्या काही वर्षांमध्ये एटीएम स्किमिंग, कार्ड क्लोनिंग आणि डेटा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. काही गुन्हेगार एटीएममध्ये गुप्त उपकरणे बसवून कार्डची माहिती चोरत आणि त्याद्वारे बनावट कार्ड तयार करत. परिणामी ग्राहकांच्या खात्यातील पैसे लुटले जात. कार्डलेस व्यवहारांमध्ये कार्डच वापरले जात नसल्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांना मोठ्या प्रमाणात आळा बसतो. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढतो आणि बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित बनतात.आज देशातील लाखो नागरिक यूपीआयचा वापर करतात; परंतु अनेकांकडे एटीएम कार्ड नसते किंवा त्याचा वापर करण्याची सवय नसते. मोबाईलच्या माध्यमातून पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे डिजिटल व्यवहार आणि पारंपरिक रोख व्यवहार यांच्यातील दरी कमी होते. ग्रामीण भागातील नागरिक अधिक आत्मविश्वासाने बँकिंग सेवांचा वापर करू शकतात. ज्येष्ठ नागरिकांसाठीही कार्डलेस एटीएम वरदान ठरू शकते. अनेकदा वयोमानानुसार एटीएम कार्ड हाताळणे, कार्डचा पासवर्ड लक्षात ठेवणे किंवा मशीनमध्ये कार्ड योग्य प्रकारे वापरणे कठीण जाते. मोबाईलवरील परिचित यूपीआय ॲप्स वापरून व्यवहार करणे तुलनेने सोपे वाटू शकते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ज्येष्ठ नागरिकांना या सुविधेचा मोठा लाभ होऊ शकतो. एकापेक्षा जास्त बँक खाती असलेल्या ग्राहकांसाठी ही सुविधा आणखी उपयुक्त आहे. पूर्वी वेगवेगळ्या खात्यांसाठी अनेक कार्ड सांभाळावी लागत. आता एकाच यूपीआय अनुप्रयोगामध्ये विविध खाती जोडलेली असल्यास आवश्यक त्या खात्यातून थेट पैसे काढता येतात.विशेष म्हणजे भारताने या क्षेत्रात जगासमोर एक वेगळे उदाहरण निर्माण केले आहे. अनेक विकसित देशांमध्ये कार्डशिवाय पैसे काढण्याच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्या बहुधा विशिष्ट बँकेपुरत्या मर्यादित असतात. भारताने मात्र सर्व बँका, सर्व यूपीआय ॲप्स आणि सर्वसामान्य नागरिक यांना जोडणारी एक सार्वत्रिक आणि परस्परसंवादी व्यवस्था विकसित केली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकेचा ग्राहक कोणत्याही सक्षम एटीएमवर जाऊन यूपीआयच्या साहाय्याने पैसे काढू शकतो. ही संकल्पना जागतिक स्तरावर अत्यंत अभिनव मानली जाते. डिजिटल भारत मोहिमेला या सुविधेमुळे मोठी चालना मिळाली आहे. डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने आधीच जागतिक नेतृत्व प्राप्त केले आहे. यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्याचा व्यापक वापर पाहता अनेक देश भारताच्या अनुभवातून शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. कार्डलेस एटीएम ही त्याच यशस्वी प्रवासातील पुढची पायरी आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीनेही या सुविधेचे महत्त्व मोठे आहे. बँकिंग सेवा प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे कोणत्याही विकसित अर्थव्यवस्थेचे ध्येय असते. डिजिटल साधनांच्या मदतीने नागरिकांना अधिक सक्षम करणे आणि त्यांना वित्तीय प्रणालीशी जोडणे हे या तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ झाले आहे. गावातील शेतकरी, छोटा व्यापारी, विद्यार्थी, गृहिणी किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला याचा थेट लाभ होऊ शकतो. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, आवाजावर आधारित सेवा आणि प्रादेशिक भाषांमधील संवाद यांचा वापर वाढल्यास कार्डलेस एटीएम आणखी लोकाभिमुख होतील.

# इथेनॉल धोरणात हवा ग्राहककेंद्री समतोल

**भारताचा इथेनॉल-मिश्रण कार्यक्रम यशस्वी व्हावा, अशी सर्वांचीच इच्छा आहे. कारण त्यातून ऊर्जा-सुरक्षा, परकीय चलन-बचत आणि पर्यावरण-रक्षण या तिन्ही आघाड्यांवर फायदा होणार आहे. मात्र हे उद्दिष्ट गाठताना ग्राहकांना पर्याय नाकारून, घाईघाईत निर्णय लादून आणि सदोष आर्थिक तर्कावर आधारित फीडस्टॉक-निवड करून चालणार नाही. जुन्या वाहनधारकांना दिलासा देणारे इंधन-पर्याय, वाहन-उद्योगाला पुरेसा संक्रमण-काळ आणि मक्यासारख्या अधिक कार्यक्षम पिकाकडे वळणारे शहाणे फीडस्टॉक-धोरण या तीन आधारस्तंभांवरच भारताच्या इथेनॉल-प्रवासाची यशस्वी वाटचाल उभी राहू शकते.**

भारताचा इथेनॉल मिश्रण कार्यक्रम गेल्या काही आठवड्यांपासून एका अनपेक्षित वादाच्या केंद्रस्थानी आला आहे. या कार्यक्रमाच्या मूळ उद्दिष्टाबाबत फारसे दुमत नाही. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण वाढवल्याने आयातीत खनिज तेलावरील अवलंबित्व कमी होते, परकीय चलनाची मोठी बचत होते आणि देशाच्या स्वच्छ इंधन उद्दिष्टांनाही हातभार लागतो; मात्र सध्याचा वाद हा इथेनॉल मिश्रणाच्या तत्त्वाबद्दल नसून, ई-२० (पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण) हे धोरण ज्या पद्धतीने आणि ज्या वेगाने अंमलात आणले गेले, त्याबद्दल आहे. हा फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. कारण, उद्दिष्ट योग्य असले, तरी अंमलबजावणीतील त्रुटी सामान्य ग्राहकाच्या खिशावर आणि वाहनांच्या आयुष्यावर थेट परिणाम करत आहेत.

सरकारकडून ई-२० च्या समर्थनार्थ अनेक तांत्रिक अभ्यास पुढे केले जात आहेत. ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (एआरएआय), इंडियन ऑईल आणि विविध वाहन उत्पादक कंपन्यांनी केलेल्या अभ्यासांमध्ये उच्च इथेनॉल मिश्रणामुळे इंजिनाचे गंभीर नुकसान होते किंवा मोठ्या प्रमाणात गंज लागतो, असे निष्पन्न झालेले नाही. हा दिलासा देणारा निष्कर्ष असला, तरी त्याचबरोबर याच अभ्यासांनी वाहनचालकांच्या तक्रारींनाही पूर्णपणे फेटाळलेले नाही, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. इथेनॉलचे उष्मांक मूल्य (कॅलरिफिक व्हॅल्यू) पेट्रोलपेक्षा कमी असल्याने इंधन कार्यक्षमता घटते आणि परिणामी मायलेजमध्ये लक्षणीय घट होते, हे वास्तव आहे. शिवाय जुन्या वाहनांमधील इंधन प्रणालीतील रबरी सुटे भाग ई-२० च्या संपर्कात लवकर झिजतात, हेही अभ्यासांनी मान्य केले आहे. याचा अर्थ असा की, केवळ 'इंजिन खराब होत नाही' एवढ्यावर समाधान होणे पुरेसे नाही. ग्राहकाला प्रत्यक्षात सोसाव्या लागणाऱ्या खर्चाचा आणि गैरसोयीचा विचार तितकाच महत्त्वाचा आहे.

देशाच्या रस्त्यांवर आजही जी ई-२० सुसंगत इंजिन आणि इंधन प्रणाली अस्तित्वात .ण्यापूर्वीच तयार झालेली कोट्यवधी वाहने धावत आहेत. या वाहनांच्या मालकांसमोर आज दुसरा कोणताही पर्याय शिल्लक नाही. त्यांना नाइलाजाने असे इंधन वापरावे लागत आहे, जे मुळात त्यांच्या वाहनांसाठी बनवलेलेच नव्हते. ऊर्जा संक्रमणाचा हा भार जुन्या वाहनांच्या मालकांवर एकतर्फी लादला गेला आहे आणि त्यांना त्याबदल्यात कोणताही अर्थपूर्ण पर्याय दिला गेलेला नाही. जर ई-२० सोबतच ई-१० इंधनही पंपांवर उपलब्ध राहिले असते, तर नव्या मानकापूर्वी तयार झालेल्या वाहनांच्या मालकांवर पडणारा अतिरिक्त बोजा बऱ्याच अंशी टाळता आला असता. हा मुद्दा केवळ तांत्रिक नाही, तर तो ग्राहक-हक्कांशी आणि निष्पक्ष धोरण अंमलबजावणीशी निगडित आहे. भविष्यात इथेनॉलचे प्रमाण आणखी




वाढवायचे असल्यास वाहन उत्पादकांना आवश्यक ते तांत्रिक बदल करण्यासाठी पुरेसा कालावधी दिला जाणे अत्यावश्यक आहे. घाईघाईत घेतलेले निर्णय आणि अपुरा संक्रमण काळ यामुळेच आजचा असंतोष निर्माण झाला आहे.

**✍ प्रसाद पाटील**

### ब्राझीलचा धडा

इथेनॉल वापराबाबत प्रगल्भ बाजारपेठ मानल्या जाणाऱ्या ब्राझीलचे उदाहरण यासंदर्भात बोलके आहे. महत्त्वाकांक्षी मिश्रण उद्दिष्टे आणि ग्राहकांना विविध इंधन पर्याय देणे, या दोन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करता येतात, हे ब्राझीलने दाखवून दिले आहे. १९७५ मध्ये अल्कोहोल समर्थक कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर स्थिर ई-२० परिसंस्था उभी करण्यासाठी त्या देशाला पाच दशकांहून अधिक काळ लागला आणि आज तिथे प्रमाण म्हणून ई-३० मिश्रण वापरले जाते. विशेष म्हणजे, ब्राझीलने 'फ्लेक्स फ्यूल' वाहनांचा स्वीकार वेगाने केला, ज्यामुळे वाहनचालकांना पंपावर जे इंधन स्वस्त असेल, ते निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. भारतासाठी हा धडा स्पष्ट आहे. मिश्रणाचे उद्दिष्ट गाठताना घाई नव्हे, तर टप्प्याटप्प्याने आणि ग्राहक स्वातंत्र्य जपत वाटचाल करणे अधिक शहाणपणाचे ठरते.

या वादाला आणखी एक महत्त्वाचा पदर आहे, ज्याकडे पुरेसे लक्ष दिले गेलेले नाही. अलीकडे तांदळापासून इथेनॉलनिर्मितीचा विस्तार करण्यात आला असून, यात भारतीय अन्न महामंडळाकडील (एफसीआय) अतिरिक्त तांदळाचा वापर केला जात आहे. ही बाब कृषी धोरणातील खोलवरच्या त्रुटी अधोरेखित करते. सरकार तांदूळ चढ्या आर्थिक किमतीत खरेदी करते. प्रचंड सार्वजनिक खर्च करून त्याची साठवणूक करते आणि नंतर तोच तांदूळ इथेनॉल उत्पादकांना मोठ्या सवलतीत विकते. हा सगळा व्यवहार आर्थिकदृष्ट्या समर्थनीय ठरवणे कठीण आहे. पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही हा युक्तिवाद तितकाच कमकुवत आहे. तांदूळ हे देशातील सर्वाधिक पाणी शोषणाऱ्या पिकांपैकी एक असून, मिथेन उत्सर्जनाचा एक महत्त्वाचा स्रोतही आहे. अशा स्थितीत अतिरिक्त तांदूळ इथेनॉलकडे वळवणे, हे तात्पुरत्या साठा व्यवस्थापनाच्या दृष्टीने सोयीचे वाटत असले, तरी दीर्घकालीन शाश्वत धोरण म्हणून ते टिकाऊ नाही.

इथेनॉल उत्पादनाच्या अर्थकारणाचा सर्वंकष फेरविचार करण्याची वेळ आता आली आहे. मिश्रणाची उद्दिष्टे जसजशी वाढत जातील, तसतसे भारताने फीडस्टॉकची (कच्च्या मालाची) निवड प्रशासकीय सोयीपेक्षा कार्यक्षमतेच्या निकषांवर आधारित असेल, हे सुनिश्चित करावे लागेल. आघाडीच्या कृषी अर्थतज्ज्ञांच्या मते, तांदूळ किंवा उसाच्या तुलनेत मका हा दीर्घकालीन फीडस्टॉक म्हणून अधिक योग्य ठरतो.

कारण, त्यासाठी सिंचनाची गरज खूपच कमी असते आणि उत्पादकता वाढवण्यास त्यात अधिक वाव आहे. सुधारित बियाणे तंत्रज्ञान आणि आधुनिक शेती पद्धतींच्या साहाय्याने उत्पादन वाढवले, तर मकाआधारित इथेनॉल अधिक स्पर्धात्मक आणि कमी संसाधने वापरणारा पर्याय ठरू शकतो.

थोडक्यात, फीडस्टॉक धोरणाचा भर अतिरिक्त धान्याची विल्हेवाट लावण्यावर कमी आणि कार्यक्षम व शाश्वत इथेनॉल अर्थव्यवस्था उभारण्यावर अधिक असायला हवा. भारताचा इथेनॉल मिश्रण कार्यक्रम यशस्वी व्हावा, अशी सर्वांचीच इच्छा आहे.

कारण, त्यातून ऊर्जा सुरक्षा, परकीय चलन बचत आणि पर्यावरण रक्षण या तिन्ही आघाड्यांवर फायदा होणार आहे; मात्र हे उद्दिष्ट गाठताना ग्राहकांना पर्याय नाकारून, घाईघाईत निर्णय लादून आणि सदोष आर्थिक तर्कावर आधारित फीडस्टॉक निवड करून चालणार नाही. जुन्या वाहनधारकांना दिलासा देणारे इंधन पर्याय, वाहन उद्योगाला पुरेसा संक्रमण काळ आणि मक्यासारख्या अधिक कार्यक्षम पिकाकडे वळणारे शहाणे फीडस्टॉक धोरण या तीन आधारस्तंभांवरच भारताच्या इथेनॉल-प्रवासाची यशस्वी वाटचाल उभी राहू शकते.

अन्यथा, चांगल्या उद्दिष्टाची अंमलबजावणी चुकीच्या पद्धतीने केल्याचे उदाहरण म्हणून हे धोरण इतिहासात नोंदले जाण्याचा धोका आहे.

# मोदींच्या माफीने विरोधक मातले अन् समर्थकात नाराजीचा सूर !!

नीट पेपर फुटीवरून देशातील वातावरण तापले.हा ताप दिल्लीत जंतरमंतरवर धडकला.हजारो आंदोलक दिल्लीत गोळा झाले.विरोधकांनी आगीत तेल ओतले.विधायक आंदोलकात विघातक आंदोलकही घुसले आणि लौकिकाग्नीचे रूपांतर भडाग्नीत झाले.अभद्र टिपण्या सुरू झाल्या.'सिता का पती'सारख्या शब्दांनी हिंदू धर्मावर अश्लाघ्य बोलल्या गेले.देश विघातक तत्वेही या आंदोलनात शिरून हिंसेचा मार्ग वापरू लागली.आंदोलनजीवींनी चंचूप्रवेश केला.तुकडे गँग जंतरमंतर मध्ये घुसून नारेबाजी करू लागली.डफलीवर 'इससे आझादी,उससे आझादी'करीत माथी भडकविण्याचा प्रयास सुरू झाला.त्यात त्यांना यशही आले.

या सर्वात एक वर्ग असाही आला की ज्यांनी पंतप्रधान मोदी यांची पार आई-बहीण काढली,मोदींच्या दिवंगत आईवर अशोभनीय भाषेचा वापर केला.त्यात युवतींचाही समावेश होता.कोणत्याही सभ्य समाजाला शोभणार नाही अशा अर्वाच्च भाषेत बरळणी केल्या गेली.त्यामुळे केवळ मोदी समर्थकच नाही तर सामान्य जनतेत संताप उमटत होता.देशात अनेक जण आंदोलनाच्या मुद्दयाला समर्थन देत होते मात्र तेच लोक मोदींना दिलेल्या अशा अभद्र शिव्यांमुळे संतापही व्यक्त करीत होते.

सरकारने झुरळांशी संवाद आणि चर्चेतून आंदोलन संपुष्टात आणले.जंतर मंतर रीते झाले.त्यानंतर नियमानुसार पोलिसांकडून चौकशीसाठी असामाजिक तत्वांची धरपकड सुरू झाली.अश्लाघ्य बोलणाऱ्यांवर कार्यवाहीचा बडगा सुरू होणार असल्याच्या चर्चा झाल्या.अशा वात्रटांना पोलिसांनी 'बाजीराव'दाखवावा ही बहुतांश देशवासियांची ईच्छा होती.जेंव्हा पोलिसांनी आंदोलनात घुसखोरी केलेल्या असामाजिक लोकांवर कार्यवाही केली,पोलीसी खाक्या दाखवला तेंव्हा मोदी समर्थक खुश असणे साहजिकच होते पण सामान्य नागरिकांनी देखिल आनंद व्यक्त केला.

मोदींवर अश्लाघ्य बोलणाऱ्या विघातकांचेही पार्श्वभाग सुजवावे अशी बहुतेकांची ईच्छा होती.अशा शिवराळ लोकांवर कार्यवाही सुरू होणार या वार्तेने पाच दहा टक्के विरोधक सोडले तर बाकी सर्व जनता आनंदी होती,खुश होती.शिव्या देणाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण होते.त्यातील काहींनी माफीनामेही सुरू केले होते.पुढे कोणी अशी हिम्मत करू नये म्हणून हे जरूरीही होते.या सर्व वातावरणात मोदीजींनी अचानक माध्यमांवर येवून या सर्व शिवीगाळ करणाऱ्या असामाजिक तत्वांना माफ केल्याची घोषणा केली.

खरं म्हणजे या वात्रटांची ही अक्षम्य चूक होती.त्यांच्या चुकीला माफी नको असे बहुतेकांचे मत होते.अचानक मोदीजीनी माफीची घोषणा केली आणि चित्र उलटले.विरोधक अक्षरश: मातले.माफी देणारे तुम्ही कोण ? असा प्रश्न मोदींना विचारत मोदींनीच त्या आंदोलक झुरळांची माफी मागावी अशी भाषा ते वापरू




लागले.दिलेली माफी ही माफी नसून मोदी झुकले,नतमस्तक झाले अशी भाषा सुरू झाली.

होणारी फौजदारी कार्यवाही थांबल्यामुळे विरोधक माज करायला मोकळे झाले.मोदींनी दिलेली माफी ही त्यांची उदारता नसून मोदी भित्रट आहेत म्हणून भिऊन त्यांनी माफीची घोषणा केल्याचे मत ते मांडताहेत.माफीच्या घोषणेने मोदी नकारात्मक ट्रोल होतांना दिसताहेत.थोडक्यात मोदींच्या माफीने कोणताही कृतज्ञता भाव विरोधकांत दिसला नाही उलट विरोधक मातले.जोमात भिडले.

विरोधकांचे जाऊ द्या! मोदींच्या माफीने मोदी समर्थक तरी आनंदी आहेत का? याचे उत्तर अधिकांश समर्थकात नाराजीचा सूर आहे.देशाच्या पंतप्रधानांची सरेआम आई बहीण काढली जाते,अर्वाच्च आणि अशोभनीय बोलले जाते.पोलिसांनी त्यांना टायर मध्ये घालून शेकले पाहिजे ही सर्वांची ईच्छा होती.तिथे त्यांना एकदम माफी मिळाली.

बरं!मिळालेल्या माफीने त्या शिव्या घालणा-यांनी कृतज्ञता,धन्यवाद,त्यांच्या भाषेत मार्दव यायला पाहिजे नं!किती माफक अपेक्षा आहे समर्थकांची.पण माफीमुळे ते मातले आणि अजून पेटून उठले.याचाच मोदी समर्थकांना भयंकर राग आहे.म्हणून त्यांच्यात नाराजीचा सूर आहे.विंचवाला कितीही कोंभाळले तरी तो डंखच मारणार ! सापाला कितीही दूध पाजा तो विषच ओकणार ! तद्वतच ही असामाजिक पिलावळ माफीच्या लायकीची नसून त्यांना पोलिसांचा बाजीराव प्रसादच आवश्यक आहे.असे सर्वांचे मत आहे.

पृथ्वीराज चव्हाणांनी म.घोरीला अशिच सतरा वेळा माफी दिली होती पण काहीच उपयोग झाला नाही.मोदीजींनी तीच चूक करायला नको!असे समर्थकांचे मत आहे.वाघाने वाघासारखेच रहावे.मोदींनी मोदींसारखेच रहावे.देशाने त्या वाघ मोदींना निवडून दिले आहे.आमचा आदर्श छत्रपती आहेत.छत्रपतींनी ज्यांचे हात पाय तोडायचे त्यांचे तोडलेच आणि ज्यांना हत्तीच्या पायी

**✍ प्रा. दिलीप जोशी**

द्यायचे त्यांना दिलेच.

मोदींच्या माफीमुळे विरोधक मातले आणि समर्थक नाराज झाले.लक्षात ठेवा! विळा भोपळ्यावर पडो की भोपळा विळ्यावर? कापला तर भोपळाच जातो!समाजात आधिच सूक्ष्म विचार हळूहळू पसरत आहे तो म्हणजे सर्व सामान्य मोदीसमर्थक योगी समर्थक होत चालला आहे.चायवाला आणि गायवाला ही भाषा समाजात उमटू लागली.तेथे बुलडोझरच पाहिजे ही भाषा उघड बोलल्या जात आहे.त्यात कालची माफी !

संसदेवर चढाई करण्याची तयारी करणारे देशविघातक यांना कसली माफी?खरच जे विधायक आंदोलन करीत होते ते आपलेच सामान्य युवा नागरिक त्यांना माफी दिलीच आहे.पण ते जर देशविघातक कृत्य करीत असतील तर त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही झालीच पाहिजे.अन्यथा पुन्हा मोहम्मद घोरी अनुभवास येईल!

'अव्यवस्थित चित्तांनाम् प्रसादोपी भयंकर:'ज्यांचे चित्त अस्थिर ,अव्यवस्थित त्यांचे सर्वच भयंकर असते.तुम्ही कितीही माफ करा ते आपला रंग दाखवणारच!

विद्यावाचस्पती वाशिम.
मो.९८२२२६२७३५

## एआय निर्मित मिम्सचा वाढता धुमाकूळ

सोशल मीडियावर अधिक व्ह्यूज आणि लाईक्स मिळवण्यासाठी सद्या 'एआय' तंत्रज्ञानाद्वारे तयार केलेले लहान बालकांचे विनोदी व्हिडिओ आणि विनोदी मिम्स मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. एआय निर्मित या काल्पनिक लहान बालकांच्या तोंडी विनोद निर्मितीसाठी विशेषतः नवरा-बायकोचे दुहेरी अर्थाचे, कौटुंबिक वादाचे आणि टोमण्यांचे संवाद देऊन विनोद निर्मिती केली जात आहे. सध्या सोशल मीडियावर अशा रील्स आणि मिम्सचा धुमाकूळ सुरु असून वरवर हे मिम्स गमतीशीर वाटत असले तरी त्याचा बालमनावर अत्यंत अनिष्ट परिणाम होत आहे. लहान बालके ही निष्पापतेचे प्रतीक असतात. मात्र एआयच्या माध्यमातून त्यांच्या चेहऱ्यावर प्रौढांसारखे हावभाव आणून त्यांच्या तोंडून कौटुंबिक वादाचे तसेच इतर थातुरमाथुर विनोद वदवून घेणे ही विकृती आहे. यामुळे बालपणाच्या पवित्र संकल्पनेचा अवमान होत असून सोशल मीडिया वापरणारी वास्तवातील लहान मुलेही हे मिम्स पाहत असल्यामुळे त्यांच्या बालमनावर अनुचित संस्कार होत आहेत. त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी हे अत्यंत धोक्याचे आहे. केवळ मनोरंजनाच्या नावाखाली बालकांच्या माध्यमातून विनोदांचे असे विकृत सादरीकरण करणे अत्यंत घातक आणि चिंताजनक असून एआय तंत्रज्ञानाचा असा गैरवापर रोखणे अत्यंत गरजेचे आहे.

**प्रदीप मोरे**

सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# आदिवासी धर्माला स्वतंत्र कोड द्या..!

## राज्यस्तरीय आदिवासी धर्म चिंतन परिषदेत ठराव जनगणनेत 'आदिवासी धर्म' नोंदविण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २ : आदिवासी समाजाला स्वतंत्र धर्मकोड देऊन जनगणनेत "आदिवासी धर्म" अशी स्वतंत्र नोंद करण्यात यावी, आदिवासींची सांस्कृतिक ओळख, बोलीभाषा आणि परंपरा जतन करण्यासाठी समाजाने संघटित होण्याची गरज आहे, अशी ठाम भूमिका महाराष्ट्र राज्यस्तरीय आदिवासी धर्म चिंतन परिषदेत व्यक्त करण्यात आली.**





आर्णी रोडवरील बलवंत मंगल कार्यालय येथे अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद (नवी दिल्ली) व बिरसा क्रांती दल यांच्या संयुक्त विद्यमाने परिषद पार पडली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड. शिवाजीराव मोघे होते. उद्घाटन माजी शिक्षणमंत्री तथा राष्ट्रीय महिला अध्यक्षा गीताश्री उरांव यांच्या हस्ते झाले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून दशरथ मडावी, प्रा. वसंतराव पुरके आणि ॲड. रामू टेकाम यांनी मार्गदर्शन केले. मध्य प्रदेश आदिवासी काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. रामू टेकाम यांनी, "देशातील विविध धर्मांना स्वतंत्र कोड मिळाला; मात्र आदिवासी समाजाला आजही स्वतंत्र धार्मिक ओळख मिळालेली नाही. विकासाच्या नावाखाली आदिवासींना जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीपासून दूर केले जात आहे," अशी भूमिका मांडत समाजाने एकत्र येऊन विश्व आदिवासी दिवस व्यापक स्वरूपात साजरा करण्याचे आवाहन केले. माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंतराव पुरके यांनी विज्ञाननिष्ठ, अंधश्रद्धामुक्त आणि संपूर्ण सजीव सृष्टीचा सन्मान करणाऱ्या धर्माची संकल्पना मांडली. शिक्षणाशिवाय समाज प्रगल्भ होणार नाही, त्यामुळे धर्मासोबत शिक्षणालाही समान महत्त्व देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. बिरसा क्रांती दलाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष दशरथ मडावी यांनी आगामी जनगणनेत धर्माच्या रकान्यात "आदिवासी धर्म" नमूद करण्यासाठी स्वतंत्र धर्मकोड जाहीर करण्याची मागणी केली. आदिवासींची संस्कृती, परंपरा, बोलीभाषा आणि अस्मिता टिकवण्यासाठी ही लढाई निर्णायक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांनी लडाखचे पर्यावरण अभ्यासक सोनम वांगचुक यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या समर्थनार्थही भूमिका व्यक्त केली. परिषदेला राज्यभरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व आदिवासी समाजातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खर्डा लघु प्रकल्पाला 'संग्रहक तलावा' ची कात्री..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## सात गावांच्या सिंचन स्वप्नांवर पाणी!





**बाभूळगाव, दि. २ :** बाभूळगाव तालुक्यातील खर्डा लघु पाटबंधारे प्रकल्पाचे संग्रहक तलावात रूपांतर केल्याने सात गावांतील शेकडो शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या आशांवर पाणी फिरले आहे. तब्बल १२ वर्षे सुधारित प्रशासकीय मान्यतेची प्रतीक्षा केल्यानंतर प्रकल्पाला हिरवा कंदील मिळाला असला, तरी मूळ सिंचन प्रकल्पाऐवजी संग्रहक तलावाची अंमलबजावणी होत असल्याने बळीराजा मध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सुमारे ३५० कोटी रुपयांचा प्रस्तावित प्रकल्प शासनाने कमी करून १७६ कोटी रुपयांवर आणला आहे. यापैकी ४० कोटी रुपये यापूर्वीच खर्च झाले असून सुमारे ९० कोटी रुपये भूसंपादनासाठी खर्च होणार आहेत. उर्वरित निधीतून कामांची निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.संग्रहक तलावामुळे केवळ पाण्यालगतच्या शेतकऱ्यांनाच स्वतःच्या खर्चाने पाईपलाईन टाकून पाणी उपसा करण्याची मुभा राहणार आहे. परिणामी वीरखेड, वाटखेड, गोंधळी, खर्डा, गवंडी, किन्ही आणि फतियाबाद या गावांतील बहुतांश शेतकरी नियोजित सिंचन सुविधेपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. यापूर्वी सरूळ गावाचे पुनर्वसन करून मूळ लघु पाटबंधारे प्रकल्प कायम ठेवण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली होती. तत्कालीन जलसंपदा राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीतही हीच भूमिका मांडण्यात आली होती. मात्र नियामक मंडळाने प्रकल्पाचे संग्रहक तलावात रूपांतर करण्याचा निर्णय कायम ठेवला. शेतकऱ्यांच्या मते, शासनाने केवळ आर्थिक बचतीचा विचार न करता सामाजिक व कृषी हित लक्षात घेऊन खर्डा प्रकल्पाला पुन्हा मूळ स्वरूपातील लघु पाटबंधारे प्रकल्पाचा दर्जा द्यावा, अशी मागणी आता परिसरातून जोर धरू लागली आहे.

# "पाल्यांवर अपेक्षांचे ओझे नको, त्यांच्या आवडीलाच करिअरची दिशा द्या" — डॉ. संजीव पाटणकर



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २ :** विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या आधारे नव्हे, तर स्वतःची आवड, क्षमता आणि कौशल्यांचा विचार करून करिअरची दिशा निश्चित करावी, तर पालकांनी आपल्या अपेक्षा मुलांवर लादण्याऐवजी त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन द्यावे, असा स्पष्ट संदेश माजी प्राचार्य व करिअर समुपदेशक डॉ. संजीव पाटणकर यांनी दिला. सुसंस्कार विद्या मंदिर, यवतमाळ येथे इयत्ता ७ वी ते १० वीच्या विद्यार्थी व पालकांसाठी `Know Your Child` या संकल्पनेवर आधारित करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

संस्थेचे सचिव संजय कोचे, मुख्याध्यापिका उषा कोचे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पाटणकर यांनी विज्ञान, वाणिज्य, कला, आयटीआय, पॉलिटेक्निक, कृषी, वैद्यकीय, अभियांत्रिकी, संरक्षण दल, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), डेटा सायन्स, सायबर सुरक्षा, चार्टर्ड अकाउंटन्सी, पत्रकारिता, क्रीडा, फॅशन डिझाइन व उद्योजकता यांसह विविध क्षेत्रांतील करिअर संधींचा सविस्तर आढावा घेतला. यशासाठी वेळेचे नियोजन, संवाद कौशल्य, इंग्रजी व संगणकीय ज्ञानाचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थी व पालकांच्या शंका समाधानकारकपणे दूर करण्यात आल्या. मुख्याध्यापिका उषा कोचे यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहून आत्मविश्वास आणि परिश्रमाच्या बळावर यश मिळविण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन वैशाली चौधरी यांनी, तर आभारप्रदर्शन स्नेहा ढोले यांनी केले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त यवतमाळात शिस्तबद्ध भव्य मिरवणूक..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## महापुरुषांच्या तैलचित्रांनी वेधले लक्ष



**यवतमाळ, दि. २ :** साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त यवतमाळ शहरात पाटीपुरा येथून अत्यंत उत्साहात, शिस्तबद्ध आणि शांततेत भव्य मिरवणूक काढण्यात आली.लो.अण्णा भाऊ साठे जयंती मंडळाच्या वतीने आयोजित या मिरवणुकीत विविध क्षेत्रांतील नागरिक, युवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याला अभिवादन केले.

मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे आकर्षक सजावटीसह साकारण्यात आलेली महापुरुषांची तैलचित्रे होती. छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले, क्रांतिगुरू वस्ताद लहुजी साळवे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या तैलचित्रांनी यवतमाळकरांचे विशेष लक्ष वेधून घेतले. मार्गावरील नागरिकांनी पुष्पांजली अर्पण करून महापुरुषांना अभिवादन केले. मोठ्या प्रमाणात गर्दी असूनही आयोजक आणि सहभागी नागरिकांनी कायदा व सुव्यवस्थेचे काटेकोर पालन करत मिरवणूक शांततेत पार पाडली. याबद्दल पोलीस प्रशासनासह नागरिकांनीही आयोजकांचे कौतुक केले.यावेळी उपस्थित नागरिकांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने मराठी साहित्याला नवी दिशा दिली असून त्यांच्या विचारांमधून आजच्या तरुण पिढीने प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. शोषित, वंचित आणि कष्टकरी समाजाच्या संघर्षाला आपल्या लेखणीतून शब्दबद्ध करणाऱ्या अण्णाभाऊंच्या वैचारिक व साहित्यिक वारशाचे जतन करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. लोकशाहीरांच्या गीतांनी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी मिरवणुकीचा प्रेरणादायी वातावरणात समारोप झाला

# महिला सुरक्षेसाठी विद्यार्थिनींना पोलिसांचे थेट मार्गदर्शन..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## सायबर गुन्ह्यांविरोधात सजगतेचा संदेश



**उमरखेड, दि. २ :** महिलांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढविणे, सायबर गुन्ह्यांपासून बचाव आणि विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याच्या उद्देशाने गोपिकाबाई सीताराम गावंडे कनिष्ठ महाविद्यालय, उमरखेड येथे विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात पोलीस अधिकारी लक्ष्मी मलकुवार (API) यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत महिला सुरक्षा, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, ऑनलाइन फसवणूक टाळण्याचे उपाय, स्वसंरक्षणाचे महत्त्व तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांची मदत कशी घ्यावी याविषयी सविस्तर माहिती दिली.

कोणत्याही प्रकारच्या अन्याय, छळ किंवा सायबर गुन्ह्यांविरोधात निर्भयपणे आवाज उठविण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. बालाजी लाभसेटवार होते. प्रास्ताविक प्रा. साधना देशमुख यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. योगिता मैद यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. हिंगोले यांनी केले. प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्री, सखी, सावित्री समितीच्या अध्यक्षा प्रा. दिपाली हरण यांच्या नेतृत्वात सर्व महिला प्राध्यापकांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल तुकाराम जंगवाड, पर्यवेक्षक प्रा. जी. बी. जाधव, विविध विभागांचे प्राध्यापक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपस्थितांनी अशा जनजागृतीपर उपक्रमांचे नियमित आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# अतिवृष्टीने बेलोरा उद्ध्वस्त पंचनामे तातडीने पूर्ण करा

## आमदार मांगुळकरांचे प्रशासनाला आदेश



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २ :** ३० जुलैच्या अतिवृष्टीमुळे रुई–वाई–तीवसा सर्कलमधील बेलोरा परिसरात शेती, घरे व शेती साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. सुमारे १५० मिमी पावसामुळे सोयाबीन, कापूस व तूर पिके पाण्याखाली गेली, तर अनेक घरांची पडझड झाली.

या पार्श्वभूमीवर आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी बाधित भागाची पाहणी करून शेतकरी व नागरिकांशी संवाद साधला. महसूल, कृषी व संबंधित विभागांना पिकांसह घरे, स्प्रिंकलर, ड्रिप संच, मोटार पंप, पाइपलाइन व इतर शेती साहित्याच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी दिले. एकाही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवू नका आणि शासनाची आर्थिक मदत त्वरित मिळवून द्या, अशी स्पष्ट सूचना त्यांनी प्रशासनाला केली. यावेळी संबंधित अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अण्णाभाऊंचे नायक प्रेरणादायी

**मालखेड, दि. २ :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून उपेक्षित व कष्टकरी समाजाला साहित्यविश्वात मानाचे स्थान मिळवून दिले. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील नायक आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन प्रा. डॉ. बाळकृष्ण सरकटे यांनी केले.

मालखेड येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रारंभी महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. अण्णाभाऊंनी सामान्य माणसाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणल्याचे डॉ. सरकटे म्हणाले.

यावेळी गिरीश कनाके, नामदेव भालेराव व सुरेखा हिवराळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक गिरीश कनाके, सूत्रसंचालन प्रिया चांदणे तर आभार भोजराज झोंबाळे यांनी मानले. कार्यक्रमास नागरिक उपस्थित होते.

# दोन वर्षांत शाळेची लक्षणीय प्रगती; पटसंख्या ३३ वरून ७५ पार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २ :** हाजी रफीक अहमद लोहार नगरपरिषद उर्दू उच्च प्राथमिक शाळा क्र. २, लोहार लाईन, पुसद या शाळेने गेल्या दोन वर्षांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये शाळेची पटसंख्या केवळ ३३ इतकी होती. मात्र मुख्याध्यापक मोहम्मद शारिक यांच्या कुशल नेतृत्वाखाली शिक्षकांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शैक्षणिक सत्र २०२६-२७ मध्ये शाळेची पटसंख्या ७५ च्या वर पोहोचली आहे.

शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, पालकांशी सातत्याने ठेवलेला संपर्क तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून पालकांचा शाळेवरील विश्वास वाढला आहे. त्यामुळे परिसरातील अनेक पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश या शाळेत घेतला आहे. मुख्याध्यापक मोहम्मद शारिक यांनी शाळेच्या प्रगतीसाठी विशेष परिश्रम घेतले असून शिक्षक सादिक खान सर, अब्दुल रब सर व बालवाडी शिक्षिका वहिदा रेहमान बाजी या सर्वांचे सहकार्याने शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास यश मिळविले आहे. त्यांच्या उत्कृष्ट कार्याची शैक्षणिक क्षेत्रात प्रशंसा होत आहे. शाळेची वाढती पटसंख्या ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची पावती असून आगामी काळातही विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा मानस शाळा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# झरी-जामणीतच क्रीडा संकुल उभारा..! पाटणला हलविण्याला नगरपंचायतीचा विरोध

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. २ :** झरीजामणी तालुक्याच्या मुख्यालयाऐवजी पाटण येथे प्रस्तावित क्रीडा संकुल उभारण्याच्या निर्णयाला झरी नगरपंचायतीने तीव्र विरोध दर्शवत जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. आदिवासी बहुल झरीजामणी तालुक्याची स्थापना १९९१ मध्ये झाली असून, तीन दशकांहून अधिक काळ उलटूनही तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल नसल्याची खंत निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

नगरपंचायतीने म्हटले आहे की, तालुक्यातील सर्व प्रमुख शासकीय कार्यालये झरीजामणी येथे कार्यरत असल्याने क्रीडा संकुलही मुख्यालयातच उभारणे आवश्यक आहे. सध्या हे संकुल झरीजामणीपासून सुमारे ९ किलोमीटर अंतरावरील पाटण येथे उभारण्याचे नियोजन असल्याने खेळाडू, विद्यार्थी आणि नागरिकांना अनावश्यक प्रवास करून गैरसोय सहन करावी लागणार आहे. त्यामुळे पाटणऐवजी झरीजामणी येथेच क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी ठाम मागणी नगराध्यक्ष शिलाताई पुंडलिक चौधरी यांनी केली असून जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली आहे.

# थोडक्यात



## पहापळ येथे लो.अण्णाभाऊ साठे यांची १०६ जयंती साजरी..!

**पांढरकवडा :** केळापूर तालुक्यातील पहापळ येथे लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती शनिवारी (१ ऑगस्ट २०२६) उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात उत्सव समितीचे अध्यक्ष निखिल मग्गीडवार यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि समतेच्या विचारांचा वारसा उपस्थितांसमोर मांडण्यात आला. यानंतर गावातून ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमात रिषभ मग्गीडवार, ओम चिंटकुठंवार, सागर मग्गीडवार, आर्यन पुणेकर, अमित मग्गीडवार, आरव मग्गीडवार, सिद्धार्थ मग्गीडवार, नेवन मोगरे यांच्यासह समाजबांधव आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.
कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## लो.अण्णाभाऊंच्या विचारांचा जागर..! राळेगावात समता-बंधुत्वाचा संदेश

**राळेगाव :** राळेगाव शहरातील प्रभाग क्रमांक ५ येथील अण्णाभाऊ साठे चौकात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तहसीलदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार, महेश सोनेकर, कुंदन कांबळे, मंगेश राऊत व बाळू धुमाळ यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व क्रांतिगुरू लहुजी साळवे यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊंच्या साहित्य, परिवर्तनवादी विचार आणि सामाजिक समतेचा वारसा जपण्याचे आवाहन करण्यात आले. गोपाल मश्रु यांनी सूत्रसंचालन, तर दिलीप कन्नाके यांनी आभार मानले. विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, महिला, युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आकाश खडसे व पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमातून समता, बंधुता आणि शिक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला.



## लो.अण्णाभाऊंच्या विचारांचा जागर..! महागावात १०६ वी जयंती उत्साहात साजरी

**महागाव :** लोकशाहीर, साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त महागाव येथे त्यांच्या तेलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे उत्सव समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात समाजबांधवांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यावेळी वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य, लोककला आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून वंचित, शोषित व कष्टकरी समाजाला दिलेल्या लढाऊ विचारांचा गौरव केला. सामाजिक समता, बंधुता आणि न्यायाचा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाला नगरपंचायत उपाध्यक्ष प्रमोद भरवाडे, नगरसेविका जयश्री नरवाडे, माजी नगरसेवक राजू राठोड यांच्यासह लक्ष्मी रणखांब, वर्षा गायकवाड, विनायक गायकवाड, साहेबराव रणखांब, विशाल रणखांब, अनिकेत हुपाडे व अन्य मान्यवर उपस्थित होते. शेवटी अण्णाभाऊंचे विचार जनतेपर्यंत पोहोचवून सामाजिक परिवर्तनाची चळवळ अधिक बळकट करण्याचा संकल्प करण्यात आला.


जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आठ तालुक्याला अतिवृष्टीचा फटका

**अमरावती/का.प्र.**

यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर संकटांची मालिका सुरूच आहे. सुरुवातीला पावसाने दडी मारल्याने पेरण्या उशिरा झाल्या. त्यानंतर अनेक भागांत बोगस सोयाबीन बियाण्यांचा फटका बसला. आता गेल्या काही दिवसांतील अतिवृष्टीमुळे उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दोन दिवसांत जिल्ह्यातील ४४१ गावांतील तब्बल ५७,९७१.८९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज प्रशासनाने व्यक्त केला आहे.

जिल्ह्यात चिखलदरा, अंजनगाव सुर्जी, चांदूर रेल्वे, धारणी, धामणगाव रेल्वे, मोर्शी, नांदगाव खंडेश्वर आणि भातकुली या पाच तालुक्यात पिकांचे नुकसान झाल आहे. अतिमुसळधार पावसाचा सर्वाधिक फटका नांदगाव खंडेश्वर तालुक्याला बसला असून तेथे १०१ गावांतील ३१,१५१ हेक्टर पिके बाधित झाली आहे. मोर्शी तालुक्यात ८५ गावांतील १९,५०६ हेक्टर, तर भातकुली तालुक्यात ११५ गावांतील ४,५२१ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. याशिवाय धामणगाव रेल्वे येथे २,१३८. ०९ हेक्टर, चांदूर रेल्वे येथे २३४ हेक्टर, धारणी येथे १३५.४० हेक्टर, चिखलदरा येथे ३ हेक्टर आणि



अंजनगाव सुर्जी येथे १.४० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे.

अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर, मका, धान आणि ज्वारी या पिकांना मोठा फटका बसला आहे. सध्या ही आकडेवारी प्राथमिक असून अंतिम पंचनाम्यानंतर नुकसान वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आधी पावसाचा खंड, त्यानंतर निकृष्ट व बोगस सोयाबीन बियाण्यांचा फटका आणि आता अतिवृष्टीमुळे उभ्या पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शुक्रवारी दुपारपर्यंत झालेल्या पावसामुळे ४१९ गावांतील ५७,६८९ हेक्टर क्षेत्रावरीत पिके तर शनिवारी सकाळपर्यंत पडलेल्या पावसामुळे २२ गावांतील २८२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते.

## अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या विद्युत विभागात अनागोंदी कारभार

### खाजगी कंपनीकडून ३ मजुरांवर पूर्ण शहराचा भार

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

ब.दर्जा असलेल्या अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत विद्युत देखभाल व दुरुस्तीचे काम एका खाजगी कंपनीला देण्यात आले आहे. विद्युत सेवा ही अत्यावश्यक सेवेत मोडत असताना देखील शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकडे कंपनीकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे भयंकर वास्तव समोर आले आहे.शहराच्या प्रभाग क्रमांक १४ मधील साईधाम परिसरातील पथदिवे गेल्या १५ दिवसांपासून चालू-बंद होत आहेत. रात्रीच्या वेळी अंधारामुळे नागरिकांना, विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरून ये-जा करावी लागत आहे.

या संदर्भात एका जागरूक नागरिकाने संबंधित कंपनीचे सुपरवायझर शुभम बोरोडे यांच्याशी संपर्क साधून तक्रार केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.नागरिकांनी विचारणा केली असता सुपरवायझर शुभम बोरोडे यांनी सांगितले की, 'संपूर्ण शहरासाठी केवळ ३ मजूर मंजूर आहेत, त्यामुळे कामाचा ताण पडतो.' तसेच 'पावसात कोणतेही काम करता येत नाही, असे आम्ही नगरपरिषदेला कळविले आहे' असेही त्यांनी सांगितले.

हा दावा अत्यंत धक्कादायक




आहे. वास्तविक पाहता ब दर्जाच्या नगरपरिषद क्षेत्रात जिथे किमान १० मजूर आवश्यक असताना केवळ ३ मजुरांवर एवढ्या मोठ्या शहराचा कारभार कसा चालवला जातो?हा प्रश्न उपस्थित होत आहे. नगरपरिषद प्रशासनाने कंत्राट देताना किती मनुष्यबळ बंधनकारक केले होते? जर १० मजूर लागत असतील तर ३ मजुरांवर शहराचा गाडा चालवण्यास प्रशासनाने परवानगी कशी दिली? याची चौकशी होणे गरजेचे आहे.या तीन मजुरांचा विमा काढण्यात आला आहे का? त्यांचा पीएफ (भविष्य निर्वाह निधी) नियमित जमा होतो का? त्यांना सुरक्षा साधने दिली जातात का? हे तपासणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असताना प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसते. अत्यावश्यक सेवेत २४ तास काम करणाऱ्या मजुरांच्या जीवाशी खेळ सुरु आहे.अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत गेल्या सहा महिन्यांपासून सत्ता स्थापन झाली आहे. मात्र सहा महिन्यांपासून शहरात नेमके किती मजूर काम करतात, काम कसे चालते याबाबत लोकप्रतिनिधी अनभिज्ञ असल्याचे चित्र आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधेकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.तक्रार केल्यानंतर नागरिकांसोबत उद्धटपणे वागून दिशाभूल करणारी उत्तरे दिल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. पावसाचे कारण सांगून अत्यावश्यक सेवा बंद ठेवता येत नाही.नागरिकांशी खोटे बोलून दिशाभूल करणाऱ्या कंपनीच्या सुपरवायझर शुभम बोरोडे यांच्यावर फौजदारी कारवाई करावी आणि संबंधित कंत्राटदार कंपनीचा कंत्राट रद्द करून काळ्या यादीत टाकावे, अशी जोरदार मागणी साईधाम परिसरातील नागरिकांमधून होत आहे. या प्रकरणात मुख्याधिकारी, सत्ताधारी काय भूमिका घेतात याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## अंजनगाव शहरात मोकाट जनावरांचा उच्छाद

### राज्य महामार्गावर अपघाताचा धोका

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

शहरात सध्या महत्वाच्या चौकात आणि रस्त्यांवर मोकाट जनावरांनी ठाण मांडले आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ, बसस्थानक परिसरासह अंजनगाव-दर्यापूर, अंजनगाव-परतवाडा आणि अंजनगाव-अकोट या तीनही महत्त्वाच्या राज्य महामार्गावर गाई-बैलांचे थवेच्या थवे बसलेले दिसत आहेत. यामुळे वाहतूक विस्कळीत होत असून गंभीर अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रस्त्यावर बसलेल्या जनावरांमुळे वाहनचालकांना अचानक ब्रेक लावावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्यावर बसलेली काळ्या रंगाची जनावरे दिसत नसल्याने दुचाकीस्वारांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. आतापर्यंत अनेक किरकोळ अपघात घडले असून मोठ्या जीवितहानीची वाट नगरपरिषद प्रशासन पाहत आहे का? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.या गंभीर समस्येकडे नगरपरिषद प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. शहरात मोकाट जनावरे सोडणाऱ्या मालकांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने त्यांचे धाडस वाढले आहे.या पार्श्वभूमीवर शिवसेना शहरप्रमुख योगेश इसोकार यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे तीव्र





मागणी केली आहे.अंजनगाव शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. तीनही राज्य महामार्गावर जनावरांनी अक्षरशः कब्जा केला आहे. शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ मोहीम राबवून ही सर्व मोकाट जनावरे पकडून कोंडवाड्यात बंद करावीत. जर मालक सोडवायला आला नाही तर ही जनावरे जप्त करून त्यांचा लिलाव करावा आणि यातून मिळणारा पैसा शहराच्या विकासकामांसाठी वापरावा,' अशी मागणी इसोकार यांनी केली आहे.जर येत्या २-३ दिवसात नगरपरिषदेने यावर ठोस कारवाई केली नाही तर शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे.या मागणीमुळे आता नगरपरिषद प्रशासन जागे होऊन कारवाई करते का, याकडे सर्व अंजनगावकरांचे लक्ष लागले आहे.

## सराईत गुन्हेगारांकडून घरफोडीचे ३ गुन्हे उघड

### राजापेठ पोलीसाची कारवाई



**अमरावती/का.प्र.**

राजापेठ अमरावती शहर येथे अपराध क. ५१६/२०२६ कलम ३०५(अ) भान्यास नुसार दाखल असून,सदर गुन्हाचे तपासात राजापेठ पोलीसांनी आरोपी नामे १.तेजस गणवीर पंडीत वय २२ वर्ष रा. नगीना मस्जीद जवळ फ्रेजरपुरा अमरावती, क ०२ संकेत रामदास धोटे वय १९ वर्ष रा. झाडीपुरा नेरपरसोपंत जि. यवतमाळ यांना ताब्यात घेवुन विचारपूस केली असता गुन्हा केल्याची कबुली दिली.

आरोपी तेजस गणवीर पंडीत यांने काही दिवसापुर्वी राजापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील मनभरी फुड मार्ट बडनेरा रोड जय दुर्गा किरणा राजापेठ कॉसिंग जवळ अमरावती घरफोडी केल्याची कबुली दिली.पोलीस स्टेशन राजापेठ अभिलेखावरील अपराध क. २०३/२६ कलम ३०५(अ), ३३१(३)३३१(४) भान्यास नुसार नमुद घरफोडी तसेच अपराध क. ४३०/२०२६ कलम ३०५(अ), ३३१(४) भान्यास नुसार नमुद घरफोडी केल्याची कबुली आरोपी याने दिली आहे.१. तेजस गणवीर पंडीत वय २२ वर्ष रा. नगीना मस्जीद जवळ फेजरपुरा अमरावती २. संकेत रामदास धोटे वय १९ वर्ष रा. झाडीपुरा नेरपरसोपंत जि. यवतमाळ.नमुद ०३ गुन्हातील घटनास्थळावरुन चोरी केलेले २०,००० रुपये रोख जप्त करण्यात आले.सदर कार्यवाही ही राकेश ओला पोलीस आयुक्त अमरावती शहर,श्याम घुगे पोलीस उपायुक्त परि.०२ अमरावती शहर तसेच श्री संजय खताळे सा. सहायक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग अम.श. याचे मार्गदर्शनाखाली पोस्टे राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात पोनि उमेश मुंढे (गुन्हे) सपोनी नितीन शिंदे, पोलीस अंमलदार, मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवि लिखीतकर, शशीकांत शेळके, अंकुश काळे, प्रशांत बेलोकर, आकाश यादव, अंकुश काळे, अमोल खंडेझोड रफीक खान, पंकज गाठे, अमोल देशमुख, अर्जुन कदम कामगिरी केली आहे.

## संक्षिप्त

### माजी विद्यार्थ्यांकडून वॉटर कुलरची भेट



**मोर्शी-** श्री. शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी येथे आयोजित सत्कार व निरोप समारंभात शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांचा शाळेच्या माजी विद्यार्थी संघ (२००९ बॅच) तर्फे भावपूर्ण सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाला शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, आजीवन सभासद, शाळेचे उपमुख्याध्यापक, आजी व माजी शिक्षक, पत्रकार बंधू-भगिनी, महादेव कॉलनी परिसरातील नागरिक, आप्तेष्ट, सरांच्या परिवारातील सदस्य, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, गणमान्य नागरिक, एन.सी.सी. कॅडेट्स तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी माजी विद्यार्थी बॅचतर्फे शाळेला ब्लू स्टार कंपनीचे १५० लिटर क्षमतेचे स्टेनलेस स्टील पाणी शीतकरण यंत्र (वॉटर कुलर) भेट देण्यात आले. या वॉटर कुलरचे लोकार्पण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. माजी विद्यार्थी संघाच्या वतीने व्यासपीठावर चंद्रशेखर चिखले यांनी प्रतिनिधित्व केले, तर रुपेश मलवार आणि क्षितिज गाडवे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी शाळेने दिलेल्या संस्कारांमुळेच आज विविध क्षेत्रांत कार्यरत असल्याचे सांगत, भविष्यातही शाळा व विद्यार्थ्यांच्या हितासाठी अशाच समाजोपयोगी उपक्रमांमध्ये माजी विद्यार्थी संघ सदैव पुढाकार घेईल, अशी ग्वाही दिली.कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघ (२००९ बॅच) व माजी एन.सी.सी. कॅडेट्स म्हणून प्रतिक कोंडे, विपुल लेकुरवाडे, राम पानडे, चंद्रशेखर चिखले, रुपेश मलवार, सागर धोटे, उज्वल टेंभुर्णे, निखिल हिवसे आणि क्षितिज गाडवे उपस्थित होते.

### सैन्य दलातील जवानाने सहपत्नीसह केली गोपूजा

**खल्लार**-भारतीय सैन्य दलात पुणे येथे कार्यरत असणारे खल्लार नजिकच्या बेलोरा येथिल जवान मंगेश भारसाकळे याने स्वतःचा विवाह सोहळा समारंभ संपन्न झाल्यानंतर घरी जातांना प्रथम गोरक्षण स्थळी सहपत्नी गोपूजन करून नविन सुसंस्कृत रुढीचा शुभारंभ केला.विज्ञान व अध्यात्म या दोन्ही वातावरणात शालेय जिवनापासून ग्रामिण भागात व शेती व्यवसायात वास्तव्य असणाऱ्या मंगेश याने पत्नी समिक्षासह गोपूजन करून या पवित्र कार्याने तथा विवाह निमित्याने आपले वडील स्व . बाबुराव जानरावजी भारसाकळे यांचे स्मरण करून पितृआठवणीचे अश्रू गोचरणी अर्पण केले .कार्याबाबत माहुली ( धांडे) येथिल गाडगेबाबा गोरक्षण संस्थेचे संख्यापक संचालक प्रा गजानन भारसाकळे यांनी उभयतांना भरभरून आशिर्वाद दिले .गोपूजन कार्यासाठी संस्था व्यवस्थापक बाळासाहेब भारसाकळे,गोसेवक आशिष ठाकरे, श्रीकृष्ण पोटे, स्वराज इंगळे यांनी सहकार्य केले याप्रसंगी नवरी -नवरदेवा सोबत परिवारातील प्रगती भारसाकळे,साई अविनाश भारसाकळे, भारतीय सैन्य जवान अमोल दादाराव भारसाकळे, प्रणाली सचिन भारसाकळे,समृद्धी सांगोले, बाळा जानरावजी भारसाकळे, अवधूत दहिहांडेकर,विनोद श्रीरामी भारसाकळे व गजानन भारसाकळे ही सर्व जेष्ठ व श्रेष्ठ मंडळी उपस्थित होती.



अचलपूर - परतवाडा मार्गावरील तहसील कार्यालयासमोर बाभळीच झाड मुसळधार पावसामुळे पडल्याने वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली होती.सुदैवाने कोणतीही अनुचित घटना घडली नाही.यानंतर ते झाड बाजूला करून वाहतूक व्यवस्था सुरळीत झाली.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी महात्म्यांना अभिवादन



### जनता विद्यालय अभिवादनाच कार्यक्रम

**अंजनगाव बारी-** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गजेंद्र अवघड होते,तर पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर प्रमुख उपस्थित म्हणून लाभल्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर यांनी केले. यानंतर विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे सादर केली. अध्यक्षीय मनोगतात मुख्याध्यापक गजेंद्र अवघड यांनी लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाबरोबरच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सामाजिक न्याय, समता आणि तळागाळातील जनतेच्या प्रश्नांना आपल्या साहित्याच्या माध्यमातून दिलेला आवाज याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संचालन महेंद्र उराडे यांनी केले, तर कार्यक्रमाचे नियोजन सरिता राणे यांनी केले.

### आसेगाव पूर्णा येथे आदरांजली कार्यक्रम

#### जयघोषाने परिसर दुमदुमला; महापुरुषांना अभिवादन करून फराळ वाटपाने कार्यक्रमाची सांगता

**आसेगाव पूर्णा-** साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या



१०६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिक व मान्यवरांनी साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कृतज्ञ अभिवादन केले.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचा जोरदार जयघोष केला.त्यामुळे संपूर्ण परिसर अण्णाभाऊंच्या घोषणांनी दुमदुमून गेला आणि वातावरण उत्साहपूर्ण झाले.याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.अंभोरे तसेच महाराष्ट्र शासनाचा अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त मोहन खंडारे यांच्या हस्ते साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ रामटेके,दिलीपभाऊ अंभोरे, करण तायडे,अरविंद अंभोरे,अतुल फुलझेले,गजाननभाऊ ठाकरे, अनिल साबळे, योगेश खडसे, कोमल खडसे, सुधाकरराव स्वर्गे,शिवा स्वर्गे,लक्ष्मी अंभोरे,कल्पना अंभोरे,रंजना तायडे,उशिला अंभोरे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बऱ्हाणपूर येथे विविध कार्यक्रम

**टाकरखेडा संभू-** चांदूरबाजार तालुक्यातील बऱ्हाणपूर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार



अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व लोकजागृतीच्या कार्याचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देविदास वानखडे होते. कार्यक्रमात शंकर वानखडे, विजु वानखडे, संतोष वानखडे, नदुं वानखडे यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमास पोलीस पाटील सुषमाताई वानखडे यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच अशोक खंडारे, भाऊराव सोनवणे यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन प्रमोद हिवराळे यांनी केले. शेवटी उपस्थितांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

### भारतीय महाविद्यालय



**मोर्शी-** भारतीय महाविद्यालयात लेखन प्रेरणा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोषजी आगरकर होते, तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभागप्रमुख डॉ. भगवान साबळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. प्रा. गोपाल भलावी यांनी प्रभावी सूत्रसंचालन करताना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा परिचय करून दिला.प्रमुख वक्ते डॉ. भगवान साबळे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे सामाजिक आणि वैचारिक महत्त्व स्पष्ट केले.अध्यक्षीय भाषणात डॉ. संतोष आगरकर यांनी विद्यार्थ्यांना लेखनाची प्रेरणा देत,'लेखणी ही विचार व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने लेखनकौशल्य विकसित करून समाजाप्रती आपली भूमिका जबाबदारीने मांडली पाहिजे,' असे प्रतिपादन केले.कार्यक्रमास प्रा. खाटगडे,प्रा. तट्टे,डॉ. रजनीश बांबोडे,प्रा. देशपांडे, प्रा. खोब्रागडे, प्रा. पत्रे, भूगोल विभागप्रमुख डॉ. सावंत देशमुख यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी कार्यालय

**अमरावती-** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल विवेक जाधव, अधिक्षक निलेश खटके यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

### जि.प.पूर्व माध्यमिक शाळा सावरखेड

**लेहेगाव-** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा सावरखेड पिंगळाई येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमापूजनाने झाली.शाळेतील विषय शिक्षक जयंत पोहरे यांनी दोन्ही व्यक्तिमत्वामधील महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकत त्यांच्या जीवन चरित्रातील महत्त्वाच्या घटना विशद केल्या आणि विद्यार्थी जीवनामध्ये त्या कशा उपयोगी पडू शकतील यावर विचार मांडले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून शाळेचे मुख्याध्यापक राजीव चव्हाण यांनी या दोन्ही व्यक्तिमत्त्वांचे चरित्र, त्यांचे गुणविशेष आणि त्यातून मिळणारी प्रेरणा याबाबतीत मार्गदर्शन केले. तसेच शाळेतील विद्यार्थिनी तृप्ती आठवले हिचा वाढदिवसही साजरा करण्यात आला.संचालन इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी कु.पायल धाकडे,तनुश्री टेकाडे यांनी तर आभार प्रदर्शन माही पांडे हिने केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका सविता महल्ले, वंदना पुसदेकर ,संगीता पोहरे , सुषमा इसड यांनी सहकार्य केले.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



**दूध म्हटले की शुभ्रसे दाट असे दूध डोळ्यांसमोर उभे राहते. पूर्णान्न मानल्या जाणाऱ्या दुधाला जीवघेणे करणाऱ्यांवर एफडीएने कारवायांचा धडाका लावला आहे. या कारवायांत भेसळखोरांची झाडाझडती घेताना जुनी, खोलवर रुजलेली पाळेमुळेही उपटून काढायला हवीत.**

# शुभ्र काही जीवघेणे...



**दु**धाला पूर्णान्न म्हणतात. बाळाला वाढीच्या टप्प्यात आईच्या दुधानंतर गायीच्या दूधाची ओळख होते. पुढे ती आयुष्यभर सोबतही राहते. मात्र या पूर्णान्नात भेसळ होत असल्याची चर्चा गेली कित्येक वर्षे होती. त्याबाबत कारवाई देखील होत होती. मात्र अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी हाती घेतलेल्या धडक कारवायांमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातील दूधभेसळखोरांचा प्रताप उघड होत आहे. ही विषवल्ली किती दूरवर न खोलवर पसरली आहे, ते यावरून कळावे.

एफडीएच्या धडाक्यामुळे भेसळखोरांच्या तोंडाला फेस आला आहे. तर दुसरीकडे, अशा भेसळयुक्त दुधातून आजवर आपण कायकाय रिचवले असेल, या धास्तीने सर्वसामान्यांच्या पोटात गोळाही आला. दुधात होणारी भेसळ ही फक्त 'पाणीज्यादा' इतकीच मर्यादित नाही. मागील काही वर्षांत या भेसळीमध्ये रासायनिक पदार्थांचाही वापर प्रचंड वेगाने वाढला आहे. आर्थिक फायदा ओरबाडण्यासाठी लहान मुलांपासून गर्भवती मातांपर्यंत, रुग्णांपासून वयोवृद्धांपर्यंत सगळ्यांच्या जीवाशी खेळ करतोय याचेही भान या भेसळखोरांना राहिलेले नाही.

दुधात पाणी, खायचा सोडा, युरिया घातला म्हणजे भेसळ होते, अशी आजवरची सर्वसाधारण समजूत होती. एफडीएच्या कारवायांनी ती खोटी ठरवली! शंभर लीटर दुधाचे पाचशे लीटर करून ते विकण्याचे कसब या भेसळखोरांनी एका रात्रीत कमावलेले नाही. दूधउत्पादकांपासून ते वितरणापर्यंतच्या साखळीतल्या अनेक कड्या त्यात जोडलेल्या आहेत. भेसळ करणाऱ्यांना सर्वसामान्यांच्या आरोग्याशी काहीएक देणेघेणे नसते.

अशा भेसळखोरांना धडा शिकवण्यासाठी मुंबई, पुणे, नाशिक, लातूर, संभाजीनगर, जळगाव अशा विविध ठिकाणी एफडीएने कारवाई करत हजारो लीटर कृत्रिम भेसळयुक्त दूध नष्ट केले. पाणी, तेल, रसायनांचा वापर करून तयार होणारे विषारी दूधही नष्ट करण्यात आले. राज्यभर कृत्रिम दुधाचा पुरवठा करणारी रॅकेटस् एफडीएने पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेसोत धडक कारवाई करत पकडली.

पुणे, अहिल्यानगर, सोलापूर, जालना आणि ठाणे या पाच जिल्ह्यात एकाचवेळी टाकलेल्या छाप्यांमध्ये तब्बल १ कोटी ४७ लाख ९३ हजार ९४५ रुपयांचे भेसळयुक्त घटक जप्त करण्यात आले; तर २० हजार लीटर संशयित दुधाची विल्हेवाट लावण्यात आली. या दुधामध्ये इमल्सिफायर, डेअरी परमीएट पावडर, पामतेल याचा वापर करण्यात आला होता. मंचरमधील सुशांत हिंगे हा याचा प्रमुख सूत्रधार होता. शेतकरी, दूध संकलन, पॅकिंग केंद्रांनाही हे भेसळीचे घटक पुरवले जात असल्याची धक्कादायक माहिती या तपासामध्ये पुढे आली. दूधभेसळीचा हा बदलता 'पॅटर्न' पाहून अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनाही धक्का बसला. भेसळ करणाऱ्यांकडून मूळ दुधात पाणी आणि इतर घटक मिसळून दुधाचे प्रमाण कृत्रिमरीत्या वाढवले जात होते. दोन हजार लीटर शुद्ध दुधात भेसळ करुन ते अडीच ते तीन हजार लिटरपर्यंत वाढवल्याचे असंख्य प्रकार या कारवायांदरम्यान उघड झाले.

दूध भेसळीसोबत, कृत्रिम दुधाचे आव्हानही मोठे आहे. अशा दुधाचा पर्दाफाश करणे हे मोठे आव्हान आहे. दुधात पाणी, खाद्यतेल आणि दूध पावडर हे घटक नैसर्गिकरीत्या एकरूप होत नाहीत. त्यामुळे हे मिश्रण एकजीव करून दुधासारखे दिसावे यासाठी त्यात इमल्सिफायर या रासायनिक पदार्थाचा वापर केला जातो. इमल्सिफायरमुळे पाणी आणि तेल यांचे मिश्रण स्थिर राहते. त्यातून दूधसदृश्य द्रव्याचा भास निर्माण होतो. त्याला दुधासारखाच पांढरा रंग, एकसंध पोत अन् किंचित फेसाळ स्वरूप प्राप्त होते. साहजिकच ग्राहकांना ते खरे दूधच वाटते.

दुधातील भेसळ लक्षात का येत नाही, असा प्रश्नही साहजिकपणे मनात येतो. त्याचे कारण म्हणजे, दुधातील घटकद्रव्यांचा अभ्यास करून उघडकीस आले आहे. फॉर्मेलिन या रसायनाचाही त्यासाठी वापर करण्यात येतो.

दूधसंकलन केल्यानंतर ते शीतकेंद्रापर्यंत एका ठराविक वेळेत येणे आवश्यक असते. शक्य तितक्या लवकर दूध शितकेंद्रावर येऊन ते चार अंश सेल्सिअस तापमानाच्या शीतसाखळीमध्ये ठेवणे गरजेचे असते. तसे न झाल्यास त्यात जंतुसंसर्ग वाढीस लागल्याची शक्यता असते. तो नियमही अनेक शेतकरी, दुग्धउत्पादक धाब्यावर बसवतात. केंद्रावर जमा होणारे आणि वितरीत होणारे दूध यांतील तफावत किती आहे, हे पाहून यातूनही दूधचोरीच्या छुप्या वाटा पकडण्यात आल्या.

राज्यात लाखो लीटर दूध सुट्या स्वरूपामध्ये सर्वसामान्यांपर्यंत येते. त्याच्या विक्रीवर कोणतेच निर्बंध नव्हते. फॅट, टोन्ड दुधाची भेसळ करून हे सुटे दूधही अनेक ठिकाणी खुलेआम विकले जातं. सुट्या दुधाच्या गुणवत्तेशी तडजोड करणाऱ्यांवरही एफडीएने कारवाईचा बडगा उगारला. यापुढे पाश्चराइज्ड, प्रमाणित किंवा कोणत्याही प्रकारचे उष्णताप्रक्रिया केलेले दूध केवळ सीलबंद पिशव्यांतूनच विकता येणार आहे. वितरकांकडून दुधाचे कॅन, ड्रम किंवा भांड्यात विक्री झाल्यास त्याची जबाबदारी थेट उत्पादक किंवा प्रक्रिया उद्योगावर असेल.

कच्च्या दुधाच्या सुट्या विक्रीवर बंदी घालण्यात आलेली नाही. मात्र ती केवळ वैध परवाना किंवा नोंदणी असलेल्या विक्रेत्यांमार्फतच करता येईल. विक्री करताना 'कच्चे दूध' असा स्पष्ट उल्लेख त्यावर असावा. दूध संकलनापासून ग्राहकांपर्यंत संपूर्ण पुरवठा साखळीमध्ये चार अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा कमी तापमान राखणे बंधनकारक केले आहे. दूध काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर शीतकरण करणे, तापमानाच्या नोंदी ठेवणे, प्रत्येक बॅचमधील दुधामधील फॅट, एसएनएफ, क्लॉट-ऑन-बॉइलिंग आणि भेसळ तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

दुधाच्या पिशवीवरील लेबलवर एसएनएफ मानके, उत्पादन तसेच वापराची अंतिम तारीख, उत्पादकाची माहिती, उष्णताप्रक्रियेचा प्रकार, बॅच क्रमांक द्यायचा आहे. ए१, ए२, नैसर्गिक, ऑर्गेनिक यासारखे कोणतेही दावे दुधाबाबत करता येणार नाहीत. या सूचनांचे पालन न झाल्यास दंडात्मक कारवाईपासून कडक कायदेशीर शिक्षेची तरतूदही करण्यात आली आहे. या निकषांची काटेकोर अंमलबजावणी झाल्यास घराघरांमध्ये दर्जेदार दूध आणि दुग्धजन्य पदार्थ येतील याबद्दल शंका राहणार नाही.

अशा भेसळयुक्त दुधाच्या सेवनामुळे सर्वसामान्यांच्या, मुलांच्या आरोग्यावर होणाऱ्या घातक परिणामांचा विचार करून एफडीएने राज्यातील दुधव्यवसायाशी संबधित सर्व घटकांशी चर्चा केली. दूधउत्पादकांकडून दूध शीतसाखळीपर्यंत येईपर्यंतचा कालावधी कमाल दोन तासांपर्यंत आणण्याच्या सूचना देण्यात आल्या. दूधसंकलन वाहनांना उशीरा का होतो याचीही चाचपणी करण्यात आली. शेतकरी दूध गोळा करून ते पुढे पाठवण्यासाठी वाट पाहत राहतात, हे त्यामागील कारण समोर आले.

दुग्धव्यवसायामध्ये दुग्धउत्पादक ते सर्वसामान्य ग्राहक ही नियोजनबद्ध साखळी आहे. त्यात सहकारी दूध संघ, उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते, वाहतूकदार अशा अनेक घटकांचा समावेश होतो. या व्यवसायामध्ये कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. दुग्धउत्पादक शेतकऱ्याला किरकोळ दाम देऊन नफ्याचे लोणी स्वतःकडे ओढण्याची स्पर्धा अधिकाधिक तीव्र होत चालली आहे, हेही लक्षात येते.

दूधभेसळीतून हळूहळू भिनत जाणारे विष हे दही, पनीर, ताक , खवा या दुग्धजन्य पदार्थांमध्येही उतरत होते. भेसळीचे हे तंत्र या दूधमाफियांनी व्यवस्थित समजून घेतलेले असते. दुधाच्या मूळ नैसर्गिक गुणधर्मांमध्ये बदल केला की त्याचा समतोल साधण्यासाठी भेसळखोर त्यात बाहेरून इतर पदार्थ मिसळतात. साधारणतः दुधातील फॅट व 'एसएनएफ' (सॉलिड नॉट फॅट : दुधातील फॅट आणि पाणी वगळून उरलेले सर्व पोषक व घन घटक.) यांचे प्रमाण अनुक्रमे चार आणि साडेआठ टक्के इतके असते. शंभर लीटर दुधात वीस लीटर पाणी टाकले तर हे प्रमाण ३.३ व ७ टक्के होते. पाणी घातल्यामुळे त्याची तीव्रता कमी होते. डेअरीला दूध देताना दुधातले फॅट किमान साडेतीन तर एसएनएफ हे साडेआठ टक्के असायला हवेत, अशी अट असते.

पाणी घातल्यामुळे या घटकांचे प्रमाण कमी झाल्यास ते दूध नाकारण्याची शक्यताही वाढते. त्यामुळे दुधाचा मूळ गुणधर्म टिकवण्यासाठी त्यात अत्यंत चलाखीने ही भेसळ केली जाते. पाणी घालून दूध वाढवल्यास त्याचा कमी झालेला घट्टपणा टिकावा यासाठी त्यात स्टार्च घातले जाते. त्यामुळे दुधाला कृत्रिम घट्टपणा येतो. साबण पावडर घातल्याने दूध दाट दिसते. त्याला फेस येतो. मात्र यामुळे दूध नासण्याची प्रक्रिया जलदगतीने सुरू होते. हा कालावधी थोडा वाढवण्यासाठी त्यात खाण्याचा सोडाही टाकला जातो. सोड्यामुळे दूध शुभ्र, दाट दिसते. नासण्याची प्रक्रिया लांबणीवर टाकण्यासाठी त्यात किलोकिलोंनी कॉस्टिक सोडा मिसळण्याचे प्रकारही जनावरांना दूधवाढीची इंजेक्शने देण्याचे प्रकारही वाढले होते. त्याचीही झाडाझडती एफडीए घेत आहे. हे सगळे पाहता मुळात ही कीड कुणाच्या जिवावर पोसली गेली, असा प्रश्न साहजिकच पडतो. ही कीड ठेचण्याचे काम एफडीएने धडक कारवायांच्या माध्यमातून हाती घेतले आहे. त्याचे स्वागत करताना हे भेसळखोर इतके मस्तवाल कसे झाले याचाही शोध घ्यायला हवा. अन्न, औषधे, सार्वजनिक आरोग्य हा सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा अन् जीवाशी निगडित असलेला विषय आहे. भेसळखोरांची झाडाझडती घेताना जुनी खोलवर रुजलेली पाळेमुळेही उपटून काढायला हवीत.

**दूध, की विष?**

युरिया, शाम्पू, सिंथेटिक मेद, ग्लुकोज, फॉर्मालिन, हायड्रोजन पेरॉक्साइड, रासायनिक पावडर तसेच इतर विषारी द्रव्य दुधामध्ये किंवा पाण्यामध्येही मिसळून कृत्रिम दूध तयार केले जाते. फॉर्मेलिन हे विषारी रसायन शरीरातल्या अनेक अवयवांवर गंभीर परिणाम करते. युरियामुळे मूत्रपिंड निकामी होण्यासह इतरही दुर्धर आजार होण्याचा धोका असतो. संप्रेरकांचा समतोल बिघडणे, त्वचारोग, कर्करोग, श्वसनविकार, दमा, अवयव निकामी होणे, गर्भाची वाढ खुंटणे अशा अनेक व्याधी भेसळयुक्त दुधामुळे होऊ शकतात.

**-शर्मिला कलगुटकर**

# नग्न राजाची कथा

**बा**लपणी चांदोबा मासिकात मी एक कथा वाचली होती. कितीतरी वर्षांनंतर आता त्या कथेची आठवण झाली. जशी आठवते तशी ती कथा सांगतो.

आटपाट नगरात एक राजा होता. समस्त प्रजाजनांत त्या राजाविषयी आदरयुक्त धाक किंवा भीतीयुक्त आदर होता. राजाचा दराराच तसा होता. त्याच्या चेहऱ्यावर असलेल्या तेजाने दिपून जाऊन दरबारी जन आणि प्रजानन आपापल्या नजरा खाली ठेउनच राजाला सामोरे जायचे. त्यालाही ते आवडायचे. पण त्या राजाला वेगवेगळ्या प्रकारचे पोशाख घालण्याचीही हौस होती.दरबारी आणि प्रजाजनांनी आपला पोशाख पाहून तारीफ करावी असेही त्याला वाटू लागले. पण ते तर नजर उचलून राजाकडे पाहत नव्हते. मग राजाच त्यांना आदेश देऊन आपला पोशाख कसा वाटतो ते सांगण्यास प्रवृत्त करायचा. सर्व दरबारी आणि प्रजाजन आदरयुक्त धाकामुळे राजाच्या पोशाखाची भरमसाट स्तुती करायचे. राजा प्रसन्न व्हायचा.

एकदा राजाला प्रजेची परीक्षा पाहण्याचा मोह झाला. तो नग्नावस्थेतच सिंहासनावर जाऊन बसला आणि दरबारी जनांना म्हणाला की मी खास ढाक्यावरून अत्यंत तलम अश्या मलमलचे वस्त्र मागवून हा पोशाख तयार करून घेतला आहे. बघा,कसा वाटतो. दरबारी जनांनी राजाकडे पाहिले आणि त्या ढाक्याच्या कारागिरांची व राजाची स्तुती केली.खुश झालेल्या राजाने बाहेर पडून सामान्य प्रजाजनांचीही परीक्षा घ्यायचे ठरविले. हत्तीवर बसून दरबारीजनांच्या व शिपायांच्या वेढ्यात तो नगरात फिरू लागला. दवंडी पिटून शिपायांनी सर्व नगरजनांना राजाची मिरवणूक पाहण्यास बोलावले. प्रजानन सवयीप्रमाणे जमिनीवर नजर खिळवून रस्त्यांच्या बाजूला उभे राहिले. एका बापाच्या खांद्यावर त्याची चिमुकली मुलगी बसली होती. ती 'संस्कारित' नव्हती. त्यामुळे तिने थेट राजाकडे पाहिले आणि मोठ्याने हसून 'राजा नंगा आहे' असे ओरडत ती टाळ्या पिटू लागली. दरबारी लोकांना आणि शिपायांना काय करावे कळेना. राजा लज्जित झाला आणि हत्ती वळवून आपल्या अन्तःपुरात निघून गेला. त्याला रात्री झोप येईना. मग त्याने प्रजाजनांच्या नावे मध्यरात्री संदेश जारी केला. 'आपल्या मुलींवर योग्य ते संस्कार करण्यात उणीव राहिली आहे. मी तिला क्षमा करतो, पण तिच्या उद्धटपणामुळे जनतेमध्ये पसरलेला असंतोषही मला जाणवत आहे. त्या मुलीवर व तिच्या माता-पित्यांवर दरबारी जन आणि शिपाई योग्य ते संस्कार करतील अशी आशा बाळगतो.'

# महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेची घसरण

**म**हाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेची मूळ ओळख ही नेहमीच प्रखर हिंदुत्ववादी, आक्रमक संघटना आणि अन्यायाविरुद्ध स्वतःच्या ताकदीवर ठामपणे उभी राहणारी संघटना अशी राहिलेली आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या 'प्रखर हिंदुत्व' आणि 'मराठी अस्मिता' या दोन भक्कम स्तंभांवर शिवसेनेची पायाभरणी केली, त्याच वैचारिक भूमिकेशी आज केवळ राजकीय मजबुरी किंवा तात्कालिक फायद्यासाठी उघडपणे तडजोड केली जात आहे.

एकेकाळी 'मुंबई म्हणजे शिवसेना आणि शिवसेना म्हणजेच मुंबई' असे अतुट नाते होते. कोणत्याही सामाजिक प्रश्नावर आंदोलनाचे नेतृत्व करणे असो वा अन्यायाला वाचा फोडणे, शिवसेनेच्या शाखेचा आणि शिवसैनिकाचाच पहिला आधार असायचा. मात्र,पक्षातील ऐतिहासिक फुटीनंतर अस्तित्वाची लढाई लढताना आणि जनाधार टिकवण्यासाठी धडपडणाऱ्या दोन्ही शिवसेनेची झालेली दयनीय अवस्था आज चिंतेचा विषय ठरत आहे.

एकीकडे, शिवसेना उबाठा कडून स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी पूर्णपणे भिन्न विचारसरणीच्या संघटना व चेहऱ्यांना जवळ केले जात आहे. शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आंदोलनातील अभिजीत दीपके यांची तुलना थेट विष्णूच्या अवताराशी करणे किंवा तरुण आंदोलकांना अशा अवास्तव पौराणिक रूपकांशी जोडणे, ही केवळ एक वक्तृत्वशैली किंवा राजकीय भाषण असू शकत नाही. ही पक्षाच्या मूळ विचारांवर आणि पारंपरिक मूल्यांवर उपस्थित झालेली मोठी प्रश्नचिन्हे आहेत.

दुसरीकडे, सत्ताधारी शिवसेना शिंदे आणि त्यांच्याशी संबंधित नेते तरी यापासून वेगळे कुठे आहेत? शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट असोत वा आमदार बच्चू कडू, हे जेव्हा कॉक्रोच जनता पार्टीच्या अभिजीत दीपके यांची जाऊन सदिच्छा भेट घेतात, तेव्हा दोन्ही शिवसेनेला आपले अस्तित्व दाखवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी दुसऱ्याच्या 'कुबड्यांची' गरज भासत असल्याचे स्पष्ट होते. ज्या पक्षाची स्वतःची लाखो कार्यकर्त्यांची फौज आहे, त्यांना आज नव्या संघटनांच्या दारात जाऊन उभे राहावे लागत आहे, यापेक्षा दुर्दैव ते कोणते? प्रखर हिंदुत्वाला फारसे न मानणाऱ्या किंवा वेगळी विचारसरणी असलेल्या घटकांना सोबत घेण्याच्या या घाईगडबडीत, पक्षाचा पारंपरिक आणि निष्ठावंत मतदार दिवसेंदिवस दुरावत चालला आहे आणि पक्ष डबघाईस आला आहे.

याआधी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील असोत की आता शिक्षण व तरुणांच्या प्रश्नावर पुढे आलेले अभिजीत दीपके असोत हे दोन्ही चेहरे कोणत्याही प्रस्थापित पक्षाच्या मांडवातून किंवा पाठिंब्यातून पुढे आलेले नाहीत. त्यांनी स्वतःच्या बळावर जनमानस आणि तरुणांचा पाठिंबा मिळवला आहे. असे असताना, स्वतःच्या पक्षाची 'कॅडर' मजबूत करून किंवा स्वतःच्या युवा आघाड्यांना रस्त्यावर उतरवून संघर्ष करण्याऐवजी, या स्वतंत्र आंदोलकांच्या लोकप्रियतेवर स्वार होऊन स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रकार आहे.

स्वतःचे संघटन वाढविण्यापेक्षा आणि पक्षांतर्गत नवीन नेतृत्व घडविण्यापेक्षा, 'दुसऱ्याच्या कर्तृत्वावर आपला पक्ष वाढवणे' याला राजकीय आणि वैचारिक परजीवीपणाच म्हणावे लागेल. ज्या पक्षाने दशकानुदशके स्वतःच्या आक्रमक आंदोलनांनी संपूर्ण राजकारण गाजवले, त्या पक्षाच्या दोन्ही धड्यांना आज नवख्या आंदोलकांच्या दारात उभे राहावे लागत आहे, यावरून पक्षाची किती मोठ्या प्रमाणावर संघटनात्मक घसरण झाली आहे हे दिसून येते.

थोडक्यात सांगायचे तर...राजकीय सत्ता, पदे किंवा काही आमदार-खासदार तात्पुरते टिकवता येतील; परंतु स्वतःचा 'मूळ आत्मा', स्वाभिमान आणि निष्ठावंत मतदार गमावून केलेली ही राजकीय तडजोड दीर्घकाळात पक्षाचे मूळ अस्तित्वच संपुष्टात आणणारी ठरेल.

**अविनाश देशपांडे**

## त-ड-का

### ..देख तेरे इन्सानकी ..!

असे कसे चोर
भलतेच झाले शिरजोर
देव ही त्यांच्यापुढं
पडलेत कमजोर..!
सज्जनापेक्षा दुर्जन
ठरतात भारी
सज्जन करेना प्रतिकार
हीच तर आहे बिमारी..
देवानींच दावला हिसका
तरच चोर म्हणतील
नको रे बाप्पा -
चला इथून खिसका..
देवांनीच आता
दावला पाहीजे चमत्कार
तर 'यदा यदा ही धर्मस्यचा'
होईल जगाला साक्षात्कार..



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

जागतिक स्तनपान सप्ताहनिमित्त

# 'आईचे दूध-बाळासाठी सर्वोत्तम आहार, निरोगी आयुष्याचा मजबूत पाया.'



**आई** आणि बाळ यांचे नाते हे जगातील सर्वात पवित्र आणि जिव्हाळ्याचे नाते मानले जाते. या नात्याची सुरुवात आईच्या गर्भात होत असली तरी जन्मानंतर आईच्या दुधामुळे हे नाते अधिक दृढ होते आईचे दूध हे केवळ बाळाचे अन्न नसून त्याच्या निरोगी, सुदृढ आणि सुरक्षित आयुष्याचा पाया आहे.नवजात बाळासाठी आईचे दूध हे संपूर्ण संतुलित,स्वच्छ, सुरक्षित आणि सहज उपलब्ध असलेले नैसर्गिक अन्न आहे. म्हणूनच संपूर्ण जगात स्तनपानाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी १ते ७ ऑगस्ट या कालावधीत जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो. या सप्ताहाचा उद्देश्य स्तनपनाचे महत्त्व प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवणे, मातांना योग्य मार्गदर्शन करणे, बालमृत्यू आणि कुपोषण कमी करणे तसेच माता व बाल आरोग्य सुधारण्यासाठी समाजामध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करणे हा आहे.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत वाढते शहरीकरण, व्यस्त - दिनचर्या, कृत्रिम दुधाच्या वाढत्या जाहिराती आणि स्तनपान विषयीचे गैरसमज यामुळे अनेक माता स्तनपानापासून दूर जात आहेत. अशा परिस्थितीत जागतिक स्तनपान सप्ताह अधिक महत्त्वाचा ठरतो. जागतिक आरोग्य संघटना आणि संयुक्त राष्ट्र बाल निधी यांच्या संयुक्त पुढाकारातून स्तनपान बाबत जागतिक स्तरावर जनजागृती करण्यासाठी हा सप्ताह सुरू करण्यात आला.१९९२ पासून हा सप्ताह जगातील अनेक देशांमध्ये साजरा केला जात आहे. या अभियानामध्ये विविध देशातील सरकारी आरोग्य संस्था, स्वयंसेवी संस्था, वैद्यकीय तज्ञ, परिचारिका, अंगणवाडी सेविका, आशा, कार्यकर्त्या आणि सामाजिक संघटना सहभागी होतात.

दरवर्षी या सप्ताहासाठी विशिष्ट संकल्पना निश्चित केली जाते.त्या माध्यमातून स्तनपानास प्रोत्साहन देणे, मातांना आधार देणे, स्तनपान पूरक धोरणे विकसित करणे आणि समाजामध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे यावर भर दिला जातो. स्तनपनाचे महत्त्व आईचे दूध हे बाळाच्या वाढीसाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक योग्य प्रमाणात पुरवते. जन्मानंतर येणारे पहिले पिवळसर दूध म्हणजे कोलोस्ट्रम हे बाळासाठी अमृतासमान असते. त्यामध्ये प्रतिजैविके, रोगप्रतिकारक घटक, प्रथिने, जीवनसत्वे आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि अनेक संसर्गजन्य आजारापासून त्याचे संरक्षण होते. जन्मानंतरच्या पहिल्या एका तासात स्तनपान सुरू करणे अत्यंत आवश्यक मानले जाते. यामुळे नवजात बाळाला आवश्यक ऊर्जा मिळते आणि आई मध्येही स्तनपानाची प्रक्रिया सुरळीत सुरू होते पहिले सहा महिने बाळाला फक्त आईचे दूध देण्याची शिफारस केली जाते. या काळात पाणी, मध, गुटी किंवा इतर कोणत्याही पूरक आहाराची गरज नसते.

स्तनपानामुळे बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी होते. मेंदूचा विकास अधिक चांगल्या प्रकारे होतो.बाळाची उंची वजन आणि शारीरिक वाढ योग्य प्रकारे होते.प्रसूतीनंतर गर्भाशय लवकर पूर्वस्थितीत येण्यास मदत होते प्रसूतीनंतर होणारा रक्तस्त्राव कमी होतो. स्तनपानमुळे स्तनाच्या आणि अंडाशयाच्या कर्करोगाच्या धोका कमी होण्यास मदत होऊ शकते. तसेच टाईप -२ मधुमेह उच्च रक्तदाब आणि काही चयापच्या विषयक विकारांचा धोका कमी होण्यासही मदत मिळू शकते. आई आणि बाळ यांच्यातील भावनिक जिव्हाळा अधिक दृढ होतो.

जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ यांच्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत. जन्मानंतर पहिल्या एका तासात स्तनपान सुरू करावे.पहिले सहा महिने केवळ आईचे दूध द्यावे. सहा महिन्यानंतर पूरक आहार सुरू करून स्तनपान दोन वर्ष किंवा त्याहून अधिक काळ सुरू ठेवावे. बाटली ऐवजी स्वच्छ पद्धतीने पूरक आहार द्यावा. आईला योग्य समुपदेशन आणि कुटुंबाचा आधार मिळावा. स्तनपान बाबतचे गैरसमज आजही समाजात आढळून येतात. काहीजण पहिले पिवळसर दूध फेकून देतात प्रत्यक्षात तेच बाळासाठी सर्वाधिक पोषक असते काही माता दूध कमी पडते या भीतीने कृत्रिम दूध सुरू करतात अनेकांना बाळाला पाणी देणे आवश्यक वाटते परंतु पहिले सहा महिने आईच्या दुधातूनच बाळाला आवश्यक पाणी मिळते अशा गैरसमजांमुळे स्तनपानाचे प्रमाण कमी होते. आजच्या काळात स्तनपानास अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

कुटुंब आणि समाजाची भूमिका स्तनपान यशस्वी होण्यासाठी केवळ आईलाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाची भूमिका महत्त्वाची आहे. पती,आजी -आजोबा आणि इतर सदस्यांनी आईला मानसिक आधार पौष्टिक आहार, पुरेशी विश्रांती आणि सकारात्मक वातावरण दिल्यास स्तनपान अधिक यशस्वी होते. आरोग्य कर्मचारी डॉक्टर, परिचारिका,अंगणवाडी सेविका, आणि अशा कार्यकर्त्या यांनी योग्य मार्गदर्शन करून स्तनपान विषयीचे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे.आईचे दूध हे निसर्गाने दिलेले सर्वात मौल्यवान वरदान आहे. ते बाळाला केवळ पोषणच देत नाही तर त्याच्या निरोगी भविष्यासाठी भक्कम पाया घालते. स्तनपानामुळे माता आणि बालक दोघांचेही आरोग्य सुधारते कुटुंबाच्या आर्थिक भर कमी होतो आणि समाजात निरोगी पिढी निर्माण होते जागतिक स्तनपान सप्ताह केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून निरोगी, सक्षम आणि कुपोषण मुक्त भारत घडविण्याची एक प्रभावी चळवळ आहे.

**प्रा. डॉ. दयाश्री वि. कोकाटे**
(विभाग प्रमुख गृहअर्थशास्त्र विभाग भ.शि.पाटील महा.परतवाडा )
**डॉ. प्रिया सु.सगणे**
**प्रा. प्रीती ह. नवरे**

# उतावळी कॅनॉलचा फटका ; सांगोळा परिसरातील शेतीला तलावाचे स्वरूप

## चार वर्षांपासूनची समस्या कायम ; पंचनामे न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सांगोळा परिसरात उतावळी प्रकल्पाच्या कॅनॉलमुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. त्यामुळे सोयाबीनसह खरीप पिके पाण्याखाली गेली असून शेकडो एकर शेतीला तलावाचे स्वरूप आले आहे. सततच्या पावसामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता या समस्येमुळे दुहेरी संकट उभे ठाकले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव साकार्शा येथील उतावळी प्रकल्पाचा कॅनॉल चतारी शिवारापर्यंत तयार करण्यात आला आहे. मात्र कॅनॉलमधील पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने पाणी थेट शेतांमध्ये शिरत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. परिणामी सांगोळा परिसरातील अनेक शेतांमध्ये पाणी साचून सोयाबीनसह अन्य खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



**चार वर्षांपासून सुरूच नुकसान**

सांगोळा परिसरातील शेतकऱ्यांच्या मते, गेल्या चार वर्षांपासून उतावळी कॅनॉलमुळे पावसाचे पाणी शेतांमध्ये साचत असून दरवर्षी खरीप पिकांचे नुकसान होत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील शिर्ला नेमाणे येथील प्रकल्प कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

या प्रकारामुळे जगन्नाथ आप्पाजी कठाळकर, संतोष जाधव, जयप्रकाश डिवरे, गोविंदा तायडे, स्वप्निल जाधव, अश्विनी वहिले यांच्यासह अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधित विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून कॅनॉलमधील पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांचे पंचनामे करून त्वरित नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे की, तातडीने पंचनामे न झाल्यास आणि प्रश्न निकाली न निघाल्यास आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

> 'कॅनॉलमधील पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने गेल्या चार वर्षांपासून आमच्या शेतात पाणी साचते आणि दरवर्षी पिकांचे नुकसान होते. अनेकदा तक्रारी करूनही दखल घेतली जात नाही. तक्रारीची पोहोचही दिली जात नाही. आता हा प्रश्न मार्गी लागला नाही तर शिर्ला नेमाणे येथील प्रकल्प कार्यालयासमोर आमरण उपोषण करू.'
>
> **जयप्रकाश डिवरे,**
> नुकसानग्रस्त शेतकरी, सांगोळा

# 'नंदनवन'वरील भेटीने अकोल्याच्या राजकारणात चर्चांना उधाण

## काँग्रेसमधील राजीनाम्यानंतर डॉ. अभय पाटील यांनी घेतली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट; पुढील राजकीय भूमिकेबाबत तर्क–वितर्क


■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोल्यातील प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील काँग्रेसचे उमेदवार डॉ. अभय पाटील यांनी मुंबईतील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'नंदनवन' निवासस्थानी सदिच्छा भेट घेतल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. भेटीला अधिकृतरीत्या औपचारिक स्वरूप असल्याचे सांगितले जात असले, तरी तिच्या राजकीय परिणामांविषयी विविध स्तरांवर तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत.

काही दिवसांपूर्वीच डॉ. अभय पाटील यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील सर्व पदांचा राजीनामा दिला होता. त्यावेळी त्यांनी वैद्यकीय व्यवसाय आणि सामाजिक कार्यासाठी अधिक वेळ देण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, त्यानंतर झालेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेटीने त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. राजकीय वर्तुळात या भेटीचे विविध अर्थ लावले जात असले, तरी याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही.

दरम्यान, 'नंदनवन'वरील भेट ही केवळ सदिच्छा भेट होती की भविष्यातील राजकीय घडामोडींची नांदी, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही.

मात्र, या भेटीनंतर अकोल्याच्या राजकारणात नव्या समीकरणांच्या चर्चांना निश्चितच वेग आला असून, डॉ. अभय पाटील यांच्या पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



**'चेहरा नवा... बदल हवा!' पुन्हा चर्चेत**

लोकसभा निवडणुकीदरम्यान गाजलेली 'चेहरा नवा... बदल हवा!' ही घोषणा या भेटीनंतर पुन्हा चर्चेत आली आहे. सोशल मीडियावर या घोषणेचा उल्लेख करत विविध प्रतिक्रिया उमटत असून, डॉ. पाटील यांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत उत्सुकता वाढली आहे.

**युवक व सामाजिक क्षेत्रातील प्रभाव**

डॉ. अभय पाटील यांच्यासोबत युवकांचा मोठा वर्ग, विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते आणि तळागाळातील समर्थक असल्याचे मानले जाते. वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक उपक्रमांमधील त्यांच्या सहभागामुळे त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक हालचालीचा राजकीय समीकरणांवर परिणाम होऊ शकतो, अशी चर्चा आहे.

**चार लाखांहून अधिक मतांची भक्कम ताकद**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार म्हणून डॉ. अभय पाटील यांनी अकोला मतदारसंघातून सुमारे ४ लाख १६ हजारांहून अधिक मते मिळवत जोरदार लढत दिली होती. विजय हुकला असला, तरी या निवडणुकीत त्यांनी शहरासह ग्रामीण भागात प्रभावी जनाधार निर्माण केल्याचे मानले जाते. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक राजकीय निर्णयाकडे समर्थकांसह विरोधकांचेही लक्ष असते.

# पहाडसिंगीत मूलभूत सुविधांचा बोजवारा; डेंग्यूसदृश स्थितीची भीती

## दुर्गंधीयुक्त पाणी, अस्वच्छतेमुळे ग्रामस्थ हैराण; जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

■ प्रतिनिधी | खेट्री ■

अकोला जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावरील पातूर तालुक्यातील अतिदुर्गम पहाडसिंगी गावात अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने ग्रामस्थांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. गावातील अस्वच्छता, साचलेले सांडपाणी आणि पिण्याच्या पाण्याच्या अपुऱ्या सुविधांमुळे डेंग्यूसह संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते राहुल भीमराव गवई यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पातूरचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.



निवेदनात वार्ड क्रमांक १ व ३ मधील पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची स्वच्छता करून त्यावर लोखंडी जाळी बसविणे, विहिरींमध्ये आठवड्यातून एकदा ब्लिचिंग पावडर टाकण्याची व्यवस्था करणे, सार्वजनिक शौचालय उभारणे, अंगणवाडी व शाळेला संरक्षण भिंत बांधून रंगरंगोटी करणे, स्मशानभूमीत पेव्हर ब्लॉक बसविणे, गावात नियमित स्वच्छता मोहीम राबवून चौकाचौकांत कचराकुंड्या बसविणे, हनुमान मंदिर परिसरातील साचलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी नाली बांधणे, नाल्यांची नियमित साफसफाई करणे तसेच समाजमंदिराच्या छताची गळती व दरवाजे-खिडक्यांची दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गावातील प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवून नागरिकांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**संसर्गजन्य आजारांचा वाढता धोका; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

पहाडसिंगी हे गाव अकोला जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर व पातूर तालुक्यातील अतिदुर्गम भागात असल्याने संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी गावाकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावात अनेक ठिकाणी सांडपाणी साचून दुर्गंधी पसरत असून डासांची उत्पत्ती वाढली आहे. त्यामुळे डेंग्यूसह संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

## बनावट हेल्मेटमुळे रस्ता सुरक्षा धोक्यात

**अकोला :** रस्ते सुरक्षेशी संबंधित अलीकडील कारवाईनंतर बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या हेल्मेटचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वाहतूक पोलिस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) संयुक्त कारवाई करत संशयित बनावट हेल्मेटचा मोठा साठा जप्त केला.

# श्री मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणाचे भूमिपूजन

■ प्रतिनिधी | अकोला ■


शतकोत्तर वर्षाच्या दिशेने पाऊल ठेवत आणि ९० वर्षे पूर्ण केलेल्या सावतराम चाल परिसरातील श्री मारवाडी प्रेस गणेशोत्सव मंडळाच्या गणेशोत्सव प्रांगणाचा भूमिपूजन सोहळा रविवारी संकष्टी चतुर्थी दिनी मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला.दि १४ सप्टेंबर पासून प्रारंभ होणाऱ्या गणेशोत्सवाचे औचित्य साधत मंडळाच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.यात अध्यक्ष म्हणतात अनिल राठी कामकाज बघणार असून नूतन कार्यकारिणीत सचिव आकि.'पवन बंग,उपाध्यक्ष मनोज लड्ढा,उदय शाह,कोषाध्यक्ष संतोष राठी,सहसचिव संजय मंत्री,अंकेक्षक प्रमोद मालपाणी,प्रसादी व्यवस्था अमित भूतड़ा,अलोक भूतड़ा व भूतड़ा कैटरर्स करणार असून।कार्यकारिणी सदस्य म्हणून लूणकरण मालाणी,अनिल बंग, संजय कलंत्री, गणेश मूंदड़ा, नीरज तापड़िया,भरत तापड़िया, नकुल सोनी आपली सेवा देणार आहेत.हा.भूमिपूजन कार्यक्रम नूतन कार्यकारिणीच्या उपस्थितीत अत्यंत भक्तीभावाने पार पडला.या भूमीपूजन कार्यक्रमात नरेंद्र भाला,विश्वनाथ शर्मा,भूपेंद्र तिवारी यांनी सहभागी होऊन भूमिपूजन केले.यावेळी श्री गणेशाच्या मूर्तीनिर्मितीचे कामही सुरू करण्यात आले. प्रत्येक वर्षाप्रमाणे यंदाही मूर्तिकार सुरेश अंबेरे यांच्या कलाकुसरने मूर्ती तयार केली जाईल. प्रकाश व ध्वनीची व्यवस्था गाडगेबाबा लाइट अँड साऊंड करणार असून संपूर्ण पंडाल व सजावट डेकोरेटर्स बाबू बागडे यांचे नेतृत्वात केली जाईल.तसेच मूर्तिकार सुरेश अंबेरे यांच्या गुलजारपूरा मूर्ती निर्मिती स्थळी मंडळाचे पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत करून प्रतिमा निर्माणाचे काम प्रारंभ केले.या वर्षी गणेशोत्सवात श्री गणेशजींची रिद्धि-सिद्धि सहित भव्य प्रतिमा स्थापना केली जाणार आहे.



# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त 'लेखन प्रेरणा दिन' उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोला ■

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिशन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालयात 'लेखन प्रेरणा दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) कार्यक्रम अधिकारी डॉ. एन. एम. गुट्टे यांच्या नेतृत्वात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. वर्षा सुखदेवे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यसंपदेचा, सामाजिक कार्याचा आणि समतेच्या विचारांचा आढावा घेत विद्यार्थ्यांना वाचन, लेखन आणि समाजाप्रती उत्तरदायित्वाची प्रेरणा दिली.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या 'पृथ्वी ही कष्टकरी कामगारांच्या हातावर तरलेली आहे,' या विचाराचा उल्लेख करत श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित केले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. एन. एम. गुट्टे यांनी विद्यार्थ्यांनी भाषण, कविता वाचन, कथाकथन आणि निबंध लेखन अशा साहित्यिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. मोनिका साबू यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. एन. एम. गुट्टे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर

**अकोला :** नागरिकांच्या अडीअडचणी वेळेत सोडविण्यासाठी प्रशासन अधिकाधिक गतिमान करण्याचा शासनाचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. त्यादृष्टीने अनेक लोकाभिमुख उपक्रम व्यापक प्रमाणावर विविध विभागांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. महसूल विभागातर्फे आयोजित महाराजस्व अभियान नागरिकांना आवश्यक सेवा गतीने व पारदर्शक पद्धतीने मिळण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे केले.

महसूल विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचा शुभारंभ पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते नियोजनभवन येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २३४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११७१/२०२६ — प्रोसेस नं.९४१३/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ — दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १. धनराज रामचंद्र खिरडे २. सिताराम रामचंद्र खिरडे दोघेही रा. पातूर नंदापूर, ता. जि. अकोला. सध्या रा. गोकुलधाम अपार्टमेंट, एल. आय. सी. ऑफिस समोर, राम नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कुसूमबाई रामचंद्र खिरडे
**पत्ता :-** रा. गोकुलधाम अपार्टमेंट, एल. आय. सी. ऑफिस समोर, राम नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कुसूमबाई रामचंद्र खिरडे यांचे दि. ०५/०९/२०१२ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## प्रपत्र - १
## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

**पत्ता :**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,
पाटबंधारे वसाहत, एम.एस.ई.बी पावर हाउस समोर,
गौरक्षण रोड, अकोला- ४४४००४

ई-मेल पत्ता : vidarbhahydrodiva@gmail.com — दूरध्वनी क्रमांक: (०७२४)-२४५७९८३

### निविदा सूचना क्र. ०७ सन - २०२६-२०२७.

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब - १ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला येथून प्राप्त करता येतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे नांव | जिल्हा | कामाची अंदाजित किंमत | इसारा रक्कम | कोऱ्या निविदा दस्तावेजाची किंमत (नापरतावा) | कालावधी कामाचा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दगडपारवा ल. पा. प्रकल्प येथे स्ट्रीट लाइट व सायरन बसविण्याचे काम. | अकोला | ८४४८८९/- | ८४४९/- | १९८०/- | ४ महीने |
| २ | काटेपुर्णा प्रकल्पावर सायरन व हायमास्ट बसविण्याचे काम. | अकोला | ८४५७८४/- | ४५८/- | ११८०/- | ४ महीने |

**निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक ०३.०८. २०२६ (११.०० वाजता) ते दिनांक १०.०८.२०२६. (१७.०० वाजता)
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक :-** दिनांक १२.०८. २०२६ (१७.०० वाजता)
**निविदा उघडणे :-** दिनांक १३.०८.२०२६ (११.०० वाजता)

अ) परिशिष्ट क ५००/- रू. च्या स्टॅम्प पेपरवर भरून देणे आवश्यक आहे.
ब) निधी उपलब्धतेनुसार कामाची देयके अदा केली जातील.
खालील ठिकाणी निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला यांचे कार्यालयाचे सूचना फलक.

वि.मा.का./अम. /
जाहि. /३८३/२०२६ २०२७

**(अ. मो. डडमल)**
**कार्यकारी अभियंता**
**विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग अकोला**

# बगाजी सागर धरणाचे ३ दरवाजे उघडले



**अमरावती/प्रतिनिधीः-** सलग तीन दिवसापासून सुरू असलेल्या पावसामुळे वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील बगाजी सागर अर्थात लोअर वर्धा धरणातून पाण्याचा नियंत्रित विसर्ग सुरू करण्यात आला आहे. प्रशासनाने नदीकाठच्या गावांतील नागरिकांना आणि संबंधित विभागांना सतर्क राहून परिस्थितीवर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी २ वाजता धरणाची जलपातळी २८३.११ मीटर नोंदवण्यात आली. तर उपयुक्त जलसाठा १७३.०२ दशलक्ष घनमीटर म्हणजे ७९.७८% पर्यंत पोहोचला आहे. सध्या धरणाचे ३२ पैकी ३ दरवाजे १० सेंटीमीटरने उघडण्यात आले आहेत. त्यामधून २७८.४८ घनमीटर प्रति सेकंद वेगाने पाणी नदीत सोडले जात आहे. गेल्या २ तासांत धरणात पाण्याची सरासरी आवक ११५.०६ घनमीटर प्रति सेकंद इतकी आहे. धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकेनुसार विसर्ग वाढवला किंवा कमी केला जाऊ शकतो. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांनी काळजी घ्यावी आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.बगाजी सागर अर्थात लोअर वर्धा धरणाची पूर्ण जलभरण पातळी २८३.८० मीटर आहे. तर एकूण उपयुक्त जलसाठा क्षमता २१६.८७ दशलक्ष घनमीटर आहे.यंदा १ जून पासून आतापर्यंत ६५७ मिमी पाऊस नोंदवला गेला आहे. धरणाचे उपविभागीय अधिकारी यांनी सर्व संबंधित विभागांना अलर्ट मोडवर राहण्याचे आणि गावकऱ्यांना वेळोवेळी पाणी विसर्गाची माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत.

# भडांगे हेल्थ केअरला पहिल्याच वर्षात जागतिक ईईसीपी सोसायटीची मान्यता

## वर्षपूर्तीनिमित्त मोफत हृदय तपासणी शिबिराचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** हृदयविकारावरील शस्त्रक्रियाविरहित उपचारपद्धती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ईईसीपी (Enhanced External Counter Pulsation) उपचारसेवेच्या माध्यमातून भडांगे हेल्थ केअर येथील ईईसीपी सेंटरने यशस्वीपणे एक वर्ष पूर्ण केले आहे. या कालावधीत शेकडो हृदयविकारग्रस्त रुग्णांनी या उपचाराचा लाभ घेतला असून, उपचारानंतर आरोग्यात झालेल्या सकारात्मक बदलांबद्दल अनेक रुग्णांनी समाधान व्यक्त केले आहे.

उत्कृष्ट व गुणवत्तापूर्ण सेवेमुळे या ईईसीपी सेंटरला अवघ्या पहिल्याच वर्षात जागतिक ईईसीपी सोसायटीची मान्यता प्राप्त झाली असून नोंदणी क्रमांक २५/०८० बहाल करण्यात आला आहे. ही मान्यता केंद्राच्या दर्जेदार उपचारपद्धती आणि रुग्णसेवेप्रती असलेल्या बांधिलकीची साक्ष मानली जात आहे.

वर्षपूर्तीनिमित्त भडांगे हेल्थ केअरतर्फे विशेष मोफत हृदय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन येत्या ९ ऑगस्ट २०२६ रोजी भडांगे ईईसीपी हार्ट अँड डेंटल केअर दत्ता पॅलेस, युनियन बँकेजवळ, गांधी चौक, अमरावती येथे करण्यात आले आहे. डॉ.अभिषेक भडांगे यांच्याशी ७९७२२२२१४७ या क्रमांकावर संपर्क साधून शिबिरात संपर्क साधता येईल.




या शिबिरात हृदयविकाराच्या रुग्णांसाठी मोफत ईसीजी तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी तसेच रक्तातील साखरेची (शुगर) मोफत तपासणी करण्यात येणार आहे. नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉक्टर अभिषेक भडागे यांनी केले आहे. ईईसीपी ही हृदयाकडे रक्तपुरवठा सुधारण्यासाठी वापरली जाणारी सुरक्षित, वेदनारहित आणि शस्त्रक्रियाविरहित उपचारपद्धती आहे. या उपचारामुळे हृदयाचे कार्य अधिक सक्षम होण्यास मदत होते, छातीत होणाऱ्या वेदना कमी होतात, हृदयावरील ताण कमी होतो आणि शरीरात नवीन सूक्ष्म रक्तवाहिन्यांच्या निर्मितीस चालना मिळते. बायपास किंवा अँजिओप्लास्टीची गरज असलेल्या काही निवडक रुग्णांसाठी हा उपचार प्रभावी पर्याय ठरत असून अनेक रुग्णांना त्याचा लाभ झाला आहे.

अवघ्या एका वर्षात शेकडो रुग्णांचा विश्वास संपादन करत भडांगे हेल्थ केअरने हृदयरुग्णांसाठी आधुनिक, सुरक्षित आणि परिणामकारक उपचार सेवा उपलब्ध करून आरोग्यसेवेच्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. भविष्यातही अधिकाधिक रुग्णांना दर्जेदार उपचार सेवा देण्याचा संकल्प डॉ. अभिषेक भडांगे यांनी केला आहे.

# राजापेठ, नवाथे ,अकोली, गोपाल नगर अंडरपास जलमय

## वाहतूक ठप्प, नागरिकांचा संताप



**अमरावती/प्रतिनिधीः-** मुसळधार पावसाने शहराची वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. त्यातच शहरातील प्रमुख रेल्वे अंडरपासमध्ये गुडघ्यापर्यंत पाणी साचल्याने जनजीवन प्रभावित झाले आहे. वाहतूक ठप्प झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागले. यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला. अकोली रेल्वे अंडरपास येथील परिस्थिती सर्वात बिकट होती. २ ते ३ फूट पाणी साचल्याने दुचाकी, चारचाकी पूर्णपणे बंद पडल्या होत्या. राजापेठ रेल्वे अंडरपास मध्ये पाणी उपसण्याचे काम उशिरा सुरू झाल्याने सकाळच्या वेळेत मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. पाणी साचल्यामुळे नागरिकांना मार्ग बदलून जावे लागले. नवाथे रेल्वे अंडरपास येथेही पाणी साचल्याने नागरिकांना पर्यायी मार्गाने जावे लागले तसेच गोपालनगर रेल्वे अंडरपास मध्ये पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून जावे लागले. चांगापूर अंडरपास येथेही पाणी साचून वाहतूक विस्कळीत झाली. अंडरपास मध्ये पाणी साचल्याने अनेक रहिवासी भागांचा एकमेकांशी रस्ता संपर्क तुटल्याने शाळा, कॉलेज, कार्यालय आणि बाजारात जाणाऱ्यांची मोठी अडचण झाली. पाण्यातून वाहन काढताना अनेक दुचाकी बंद पडल्या. मनपा आणि रेल्वे प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाणी उपसण्याचे काम सुरू केले.नागरिकांनी संताप व्यक्त करत सांगितले की, ही दरवर्षी पावसाळ्यातील समस्या आहे. अंडरपासमध्ये पाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था नसल्याने थोड्या पावसातही असे चित्र निर्माण होते. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी अशी मागणी नागरिक करत आहेत.रेल्वे प्रशासनाने अंडरपासच्या दोन्ही बाजूला बॅरिकेड लावून वाहतूक थांबवली होती.



# आमदारांसह जिल्हाधिकारी यांनी केली पूरग्रस्त भागांची पाहणी

## -मुसळधार पावसाचा जोरदार फटका

**अमरावती :** धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातील धामणगाव, चांदूररेल्वे व नांदगाव खंडेश्वर या तिन्ही तालुक्यांत गुरुवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे शेती आणि घरांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पूर परिस्थितीबाबत आणि अनेक कुटुंबांना स्थलांतरित केलेल्या ठिकाणांची आमदार प्रताप अडसड यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह पाहणी केली. या संकटाचा सामना शासन आणि प्रशासन एकत्रित करीत असून नागरिकांना आवश्यक ती सर्व मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

धामणगाव रेल्वे, चांदूररेल्वे, नांदगाव खंडेश्वर या तिन्ही तालुक्यांत बुधवारी व गुरुवारी मुसळधार पावसाने हजेरी लावली. या पावसाचा सर्वाधिक फटका नांदगाव खंडेश्वर तालुक्याला बसला. अनेक गावांतील घरात पाणी शिरल्यामुळे कुटुंबांना स्थलांतरित करावे लागले. या पावसामुळे अनेक रस्ते बंद होते. दरम्यान शुक्रवारी सकाळी आमदार अडसड यांनी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धामक, धानोरा शिखरा, मंगरूळ चव्हाळा तसेच चांदूररेल्वे व धामणगाव रेल्वे तालुक्यातील पूरग्रस्त भागाचा दौरा केला. यावेळी नांदगाव खंडेश्वर तालुक्यात जिल्हाधिकारी आशिष येरेकर तळ ठोकून होते. रस्त्याचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे तसेच भविष्यात अशा आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जावे लागू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन आ. अडसड यांनी दिले. पाहणीदौऱ्यात उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, नांदगावच्या तहसीलदार अश्विनी जाधव, गटविकास अधिकारी तसेच संबंधित पूरग्रस्त गावांतील तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, कृषी अधिकारी उपस्थित होते.



**अनेक गावांचा संपर्क तुटला-** धामणगाव रेल्वेचे तहसीलदार अभय घोरपडे यांची तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाचा दौरा करीत आढावा घेतला. पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहत आहे. पुलगाव ते देवगाव मार्गावरील रायपूर कासारखेडा गावानजीक नागपूर - छत्रपती संभाजीनगर एक्सप्रेस हायवेवर खोलाड नदीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद करण्यात आली होती. त्यामुळे या मार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. विरुळ व अशोक नगरजवळील विदर्भ नदीला व सोनेगाव खर्डा येथील नदीला पूर आल्याने या गावांचा संपर्क तुटला होता. तालुक्यातील वडगाव राजदी येथील बापूराव पाटील, चिंचोली येथील विलास राऊत यांच्या घराचे पावसामुळे नुकसान झाले. मंगरुळ दस्तगीरजवळील आर्वी पेठ भागात पावसामुळे भयाण परिस्थिती निर्माण झाली होती. पुराच्या पाण्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने नुकसानग्रस्तांचे पंचनामे करण्याची प्रक्रिया प्रारंभ केली आहे.

**मेळघाटात जोरदार पाऊस-** धारणी तालुक्यात चार दिवसांपासून संततधार पाऊस येत आहे. शुक्रवारी धारणीचा आठवडी बाजार पावसामुळे भरलाच नाही. तहसीलदार प्रदीप शेवाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार तालुक्यात पुढील २४ तासांत जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. नदीकाठच्या ग्रामस्थांनी सावध राहावे, अशी सूचना देण्यात आली आहे. धारणी भागातील सावलीखेडा मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. मेळघाटातील तापी, गडगा, खंडू, खापरा, सिपना, कावरा, मधवा अलईसह सर्व नद्यांना पूर आलेले आहे.

# गुरुसिद्धी संगीत विद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**तिवसा/प्रतिनिधीः-** गुरुसिद्धी संगीत विद्यालय तिवसा येथे साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.



सर्वप्रथम संगीत विद्यालयाचे संस्थापक बलदेवराव इंगोले यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले व उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण केली. यानिमित्त एक संगीत मैफिल सुद्धा आयोजित करण्यात आली. त्यावेळी गायक मोहन इंगोले, प्रज्योत ढोबाळे,रजनी गौरखेडे , ज्योत्स्ना ढोबाळे, हार्मोनियम धार्मिक इंगोले, तबला उपदेश इंगोले यांनी आपला सहभाग नोंदवला. या सर्व कार्यक्रमाचे आयोजन संगीत विद्यालयाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.सुनील इंगोले यांनी केले होते.

# डास उत्पत्तिस्थानामध्ये गप्पी मासे सोडण्याची धडक मोहीम

**मोर्शी/प्रतिनिधीः-** उपजिल्हा रुग्णालय मोर्शी हिवताप व हत्तीरोग विभागामार्फत कायमस्वरूपी व तात्पुरत्या डासोत्पत्ती स्थानांमध्ये हिवताप, हत्तीरोग, डेंग्यू, चिकन गुनिया या किटकजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी विविध ठिकाणी गप्पी मासे सोडण्यात आले.



जैविक उपायोजनेअंतर्गत किटकजन्य आजार नियंत्रणाकरीता अळीभक्षक गप्पी माशांचा वापर करण्यात येतो. साचलेल्या पाण्यात गप्पी मासे सोडल्यास ते डासांच्या अळ्यांचे भक्षण करून डासाची घनता कमी करण्यास मदत करतात. गप्पी मासे सर्व प्रकारच्या डास अळ्यांचे भक्षण करतात. त्यामुळे हिवताप व हत्तीरोग निर्मूलन कार्यक्रमांमध्ये मदत म्हणून ही मोहीम राबविल्या जाते अशी माहिती व आरोग्य शिक्षण देण्यात आले.

ही मोहीम उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रमोद पोतदार, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी, हत्तीरोग अधिकारी डॉ.जुनेद यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

आरोग्य निरीक्षक विनय शेलुरे, प्रकाश मंगळे आरोग्य कर्मचारी प्रशांत बेहरे, संघपाल कांबळे, नंदू थोरात, अक्षय शेवाळे, ऋषिकेश दहेकर, विनोद डहाके यांनी गप्पी मासे धडक मोहीम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# बेंबळा, मिलमिली व खोलाड नदीला महापूर

## बेलोरा-धामक रस्ता खरडला, जवळा धोत्रा पुलावरील कठडे वाहून गेले

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे तालुक्यात गुरुवारी रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे येरड परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे. बेंबळा, मिलमिली आणि जवळा धोत्रा येथील खोलाड नदीला महापूर आल्याने नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. अनेक गावांचा संपर्क तुटला असून शेती, वाहतूक आणि जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे.



महापुराचा सर्वाधिक फटका बेलोरा–धामक मार्गाला बसला आहे. बेंबळा नदीच्या प्रचंड प्रवाहामुळे या रस्त्याचा मोठा भाग खरडून गेला असून अनेक ठिकाणी डांबरी थर वाहून गेला आहे. त्यामुळे रस्ता ओळखणेही कठीण झाले असून या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे. परिणामी बेलोरा, धामक, येरड व परिसरातील गावांचा संपर्क काही काळासाठी विस्कळीत झाला असून नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत आहे.

बेंबळा नदीच्या पुरामुळे नदीकाठच्या शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले आहे. अनेक एकर शेती पाण्याखाली गेली असून सोयाबीन, कापूस व इतर खरीप पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सर्वत्र पाणी साचल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. दरम्यान, जवळा–चिंधादेवी फाटा मार्गावरील ठोंबरी नाल्याच्या पुलावरून पुराचे पाणी वाहू लागल्याने हा मार्ग काही काळासाठी बंद करण्यात आला. पाण्याचा वेग अत्यंत प्रचंड असल्याने प्रशासनाने नागरिक आणि वाहनचालकांना पुलावरून प्रवास टाळण्याचे आवाहन केले. जवळा येथील एका शेतकऱ्याच्या शेतात पुराचे पाणी घुसल्याने मोठे नुकसान झाले असून स्प्रिंकलर सिंचनासाठी



वापरण्यात येणारे पाईप पुराच्या पाण्यात वाहून गेल्याची माहिती मिळाली आहे. महापुराचा आणखी एक मोठा फटका जवळा धोत्रा येथील खोलाड नदीवरील पुलाला बसला आहे. पुलावरील लोखंडी संरक्षक कठडे पुराच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेल्याने पुलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या पुलावरून वाहतूक करताना विशेष खबरदारी घेण्याची गरज असून संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्कः**
९४२२८५७१६९,
९४२२९१८५६९

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३६६/२०२६ ने.ता.११.०९.२०२६

**अर्जदार :**
१. श्रीमती रंजना अनिलराव डेहनकर, वय ५० धंदा - घरकाम
२. प्रज्वल अनिलराव डेहनकर, वय २८ धंदा - शिक्षण
३. कुणाल अनिलराव डेहनकर, वय २५ धंदा - शिक्षण
४. श्रीमती चंद्रकला नामदेव डेहनकर, वय ७८ धंदा - निरंक
सर्व रा.सावता चौक, ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक अनिल नामदेवराव डेहनकर** यांचा मृत्यू दिनांक **०५.०७.२०२६** रोजी डॉ.राजेंद्र गोडे हॉस्पीटल, घाटखेडा, अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. **ते** कायमचे ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३६६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२२.०७.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**.डी.बी.गुल्हाने**
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **श्री.शेख कयुम शेख करीम आणि शबाना अंजुम शेख कयिम** दोघे रा.बिच्छु टेकडी, कॅम्प अमरावती यांनी प्लॉ मालक कौसर फातिमा सैय्यद हारुन यांच्यामालकीच्या व ताब्यातील खालील नमुद स्थावर मालमत्ता दिनांक ३०.०७.२०२६ च्या ईसाराप्रमाणे विकत घेण्याचे ठरविले असून सदर मालमत्तेबाबत इतर व्यक्तिंची काहीही हरकत असल्यास खरेदी, गहाण, बक्षीस, हक्कसोड पत्र केले असल्यास तसेच दिवाणी व फौजदारी न्यायालयात त्यांनी प्रकरण दाखल केले असल्यास, हितसंबंध असल्यास तर त्या बाबतची हरकत त्यांनी या नोटीसच्या सात दिवसांच्याआत खाली नमुद पत्त्यावर/मोबाईल नंबरवर कळवावी. अन्यथा खरेदीनंतर त्यांचे कुठलेही अधिकार राहणार नाहीत.

**मालमत्तेचे वर्णन-**

**प्लॉट नं.१२-बी-२, शेत सर्व्हे नं.३/१ मधील ०० हेक्टर ७८ आर, एकुण क्षेत्रफळ ११९.३७ चौ.मी. मौजे गंभीरपूर, प्रगणे बडनेरा, ता.जि.अमरावती**

(अॅड.रेणुका सं.कडू)
११/१, शिवार्पण कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती
मो.७४९८४४५४९९

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,५वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०८१/२०२६
**श्रीमती निर्मला व चार -वि- निरंक**
पुढील ता.११.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Nirmala Wasudeorao Waghade, Age 69 Yrs. Occu.: Nil
2. Santosh Wasudeorao Waghade, Age 46 Yrs. Occu.: Service
3. Ghanshyam Wasudeorao Waghade, Age 44 Yrs. Occu.: Service
4. Sau.Pravina Vijay Sonwane, Aged 49 Yrs. Occu.: Household
All R/o 1 to 4 Behind Vidyut Nagar, Hardik Colony, VMV, Amravati
5. Sau.Sanjivani Rameshrao Barde, Aged 51 Yrs. Occu.: Household
R/o Sanjay Nagar, Parsodi Comar, Near Third Bus Stop, Gopal Nagar, Nagpur, Tq.Dist.Nagpur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Wasudeo Gendbaji Waghade हे दिनांक **१६.०४.२०२६** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Nirmala Wasudeorao Waghade+4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Nirmala Wasudeorao Waghade+4 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,५वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३१६/२०२६
**मनोरमा अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.१३.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Manorama Kisanrao Anilkar
Age 49 Yrs. Occu.: Household
2. Dipika Kisanrao Anilkar (Dipia Yogesh Chincholkar)
Age 34 Yrs. Occu.: Household
Both R/o Shobha Nagar, Near Boudha Vihar, VMV, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Kisanrao Namdevrao Anilkar हे दिनांक **०२.१२.२०१६** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Manorama Kisanrao Anilkar+1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Manorama Kisanrao Anilkar+1 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**

आर.एम.जे.सी. क्र.१६९/२०२६ ने.ता.११.०९.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार :**
१. उमा राजेंद्र सलामे, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.मिलिंद नगर, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
२. राजेंद्र शंकर सलामे, वय ५७ वर्षे, धंदा - शेती
दोन्ही रा.विरुळ रोंघे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **उमा राजेंद्र सलामे व ईतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे भाग ८ कलम २** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **प्रिया राजेंद्र सलामे** यांचा मृत्यू दिनांक **१८.१०.२०२५** रोजी मौजा विरुळ रोंघे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक ०१ माहे ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
चांदूर रेल्वे

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३२६**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# विकासकामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेळेला प्राधान्य-डॉ. पंकज भोयर

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्र्यांनी घेतला विकासकामांचा आढावा

**वर्धा/जनमाध्यम** जिल्ह्याच्या विकासामध्ये जिल्हा नियोजन समितीचा महत्वपूर्ण वाटा आहे. जिल्ह्यातील विकासकामांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि वेळेचे नियोजन याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. लोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या कामांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशा सूचना पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित बैठकीला पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्यासह खासदार अमर काळे, आमदार अभिजित वंजारी, आमदार सुधाकर अडबाले, आमदार अरुण लखानी, आमदार समीर कुणावार, आमदार राजेश बकाने, आमदार सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, उपवनसंरक्षक हरवीर सिंह, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जिल्हा नियोजन अधिकारी ज्ञानेश्वर खडतकर, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीस जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी मागील वर्षाचा



खर्च व यावर्षातील आतापर्यंत झालेल्या खर्चाची माहिती सादर केली. मागील वर्षी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेत ३५० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ४४ कोटी तर आदिवासी उपयोजनेत १८ कोटी ७० लाख असे एकूण ४१२ कोटी ७० लाख रुपये खर्चाचा आढावा सादर केला. सन २०२६-२७ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेत ४०५ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना ४५ कोटी तर आदिवासी उपयोजनेत २० कोटी ४ लाख असे ४७० कोटी ४ लाख रुपये नियतव्यय मंजूर असल्याचे सांगितले तसेच जुलै अखेरपर्यंतचा खर्चाचा आढावा सादर केला.

लोकप्रतिनिधींच्या पत्रांना वेळेत उत्तर मिळावे यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र व्यवस्था उभारण्याची गरज असल्याचे सांगत पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना नागरिकांच्या प्रश्नांबाबत अधिक संवेदनशील राहण्याचे आवाहन केले. ग्रामीण व आदिवासी भागातील रस्त्यांसाठी केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रस्ताव तातडीने पाठवावेत, तसेच रस्त्यांच्या कामांमध्ये गुणवत्ता आणि वेळेचे काटेकोर पालन करावे. राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी संबंधित केंद्रीय विभागांनी लोकप्रतिनिधींशी नियमित समन्वय ठेवावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी यावेळी दिले.पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी गावागावांत शुद्ध पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, भूजल पातळी टिकविण्यासाठी विशेष उपाययोजना राबवाव्यात आणि जलस्त्रोत व्यवस्थापनावर भर द्यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. जलजीवन मिशनअंतर्गत पूर्ण झालेल्या योजनांचे त्वरित कार्यान्वयन करण्यासह प्रलंबित विद्युत जोडण्या पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. रोजगार मेळावे अधिक परिणामकारक करण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या सल्ल्याने तारीख व स्थळ निश्चित करून उद्योग कंपन्यांच्या सहभागासह व्यापक आयोजन करण्याचे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले.

### शिक्षणावर भर

शिक्षण क्षेत्राचा आढावा घेताना नव्याने मंजूर झालेल्या आदर्श शाळांचा दर्जेदार विकास करण्याबरोबरच नगरपालिका शाळांची गुणवत्ताही उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे. अंगणवाडी इमारतींच्या दुरुस्ती व बांधकामांचे प्रभावी मॉनिटरिंग करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास विभागाने विशेष लक्ष द्यावे, इतर जिल्ह्यांतील आदर्श अंगणवाडी मॉडेलचा अभ्यास करून त्याची अंमलबजावणी करावी, असे पालकमंत्री यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत

शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्या. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रकरणात प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने कार्यवाही करावी. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचा अहवाल पाठविताना केवळ काही तालुक्यांपुरता मर्यादित न राहता संत्रा लागवड असलेल्या सर्व भागांचा समावेश करावा, असे कृषी विभागाला सांगण्यात आले. शेती पंपांना नियमित वीज पुरवठा होण्यासाठी ६३ केव्ही ते १०० केव्ही क्षमतेच्या वीज ट्रान्सफॉर्मर उभारणीसाठी लोकप्रतिनिधींच्या प्राधान्यक्रमानुसार आराखडा तयार करून टप्प्याटप्प्याने मंजुरी देण्यात यावी. ग्रामीण भागात पाणी पुरवठा योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात तक्रारी असल्याचे खासदार अमर काळे यांनी सांगितले. जलजीवनच्या तसेच ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे ऑडीट करण्यात यावे. स्त्री रुग्णालयासंदर्भात सर्व लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन शासन दरबारी पाठपुरावा करावा. तसेच गाव तेथे स्मशान शेड देण्यात यावे, यासंदर्भात मागणी केली.

आमदार समीर कुणावर यांनी वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळतो. यासंदर्भात प्रश्न उपस्थित करुन या संदर्भात एसओपी तयार करुन मानवीय भावनेतून अर्जाचा विचार करुन मोबदला देण्यात यावा, असे सांगितले. पिक विम्याचे मॅपींग तसेच स्मार्ट मीटर बाबत येणाऱ्या तक्रारीचे निराकरण करण्याच्या सूचना दिल्या. आमदार राजेश बकाने यांनी प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना तसेच देवळी पुलगाव विधानसभा मतदार संघातील विविध रस्त्यांच्या दुरुस्ती बाबत तसेच शिरुड प्रकल्पातील बॅक वॉटरचा प्रश्न निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. आमदार सुमीत वानखेडे यांनी व्हीआर, ओडीआर रस्ते, पुर नियंत्रणाच्या कामामध्ये होणाऱ्या खर्चाबाबत लक्ष वेधले. टेंडर प्रक्रिया न झाल्यामुळे निधी परत करण्यात येतो, याबाबत जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी आ.अभिजित वंजारी, आ.सुधाकर अडबाले आ.अरुण लखानी यांनीही जिल्ह्यातील विविध मुद्दे बैठकीत उपस्थित केले.

# स्मार्ट मीटरला कंटाळून व्यावसायिकाचा आत्मदहनाचा इशारा

## महावितरणच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

**सेलू/जनमाध्यम**




सेलू तालुक्यातील बोरी (बोरधरण) येथील व्यावसायिक तथा सोलरधारक विनोद चंपतेराव गोमासे यांनी महावितरणच्या स्मार्ट मीटरमुळे येत असलेल्या कथित भरमसाठ वीजबिलांमुळे आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप करत १५ ऑगस्ट रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. या इशाऱ्यामुळे महावितरण प्रशासनात खळबळ उडाली आहे.

गोमासे यांच्या म्हणण्यानुसार, १६ ऑक्टोबर २०२५ रोजी जुने वीज मीटर जळाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्यात आले. त्यानंतर १० किलोवॅट क्षमतेचा सोलर प्रकल्प असूनही अवाजवी वीजबिले येऊ लागली. या संदर्भात त्यांनी सेलू येथील महावितरण कार्यालयात तसेच उपकार्यकारी अभियंत्यांकडे वारंवार तक्रारी आणि लेखी निवेदने दिली. मात्र, आठ महिन्यांनंतरही समस्येचे निराकरण झाले नसल्याचा त्यांचा आरोप आहे. या प्रकरणी त्यांनी मुख्य अधीक्षक अभियंता, मुख्य कार्यकारी अभियंता, मुख्यमंत्री व ऊर्जा मंत्री, ऊर्जा राज्यमंत्री, जिल्हाधिकारी, पालकमंत्री तसेच महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही निवेदने पाठविली आहेत. २७ जुलै २०२६ रोजी दिलेल्या अंतिम अर्जात, १५ ऑगस्टपूर्वी स्मार्ट मीटर काढून साधे मीटर बसविण्यात न आल्यास स्वातंत्र्यदिनी आत्मदहन करणार, असा इशारा त्यांनी दिला असून, त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरणची राहील, असे नमूद केले आहे. दरम्यान, या प्रकरणावर महावितरणची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. आत्मदहनाचा इशारा लक्षात घेता जिल्हा प्रशासन व महावितरणचे वरिष्ठ अधिकारी तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### ३५ हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा-** शहरातील मास्टर कॉलनी परिसरात कुलूपबंद घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.राकेश सुधाकर उरकुडे (वय ३३, रा. पेटकर ले-आऊट, मास्टर कॉलनी) हे मंगळवारी सायंकाळी पत्नीसह सासरवाडीत गेले होते. शुक्रवारी सकाळी घरी परतल्यानंतर घराचा मुख्य दरवाजा उघडा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरात जाऊन पाहणी केली असता कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते.तपासणीदरम्यान कपाटात ठेवलेली सोन्याची नथ व १० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ३५ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे उघड झाले. राकेश उरकुडे यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू आहे.

### दहशत पसरविणाऱ्या आरोपीला अटक

**वर्धा-** शहरातील मिलिंदनगर परिसरात सार्वजनिक ठिकाणी हातात धारदार चाकू घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका आरोपीला शहर पोलिसांनी अटक केली. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार कारवाई करत सुनील आनंद कांबळे (वय ४५, रा. मिलिंदनगर) याला ताब्यात घेण्यात आले. आरोपीकडून प्राणघातक धारदार चाकू जप्त करण्यात आला. सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला धोका निर्माण केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून शहर पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# जिल्हा नियोजन समितीत अमर काळेंचा प्रशासनावर हल्लाबोल

## जनतेच्या प्रश्नांवर नाही चालणार टोलवाटोलवी

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा जिल्हा नियोजन समितीची बैठक शनिवारी चांगलीच गाजली. खासदार अमर काळे यांनी जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासनाला अक्षरशः धारेवर धरत अधिकाऱ्यांवर प्रश्नांचा भडिमार केला. निकृष्ट राष्ट्रीय महामार्ग, बोगस बियाणे, स्मार्ट मीटरची सक्ती, ग्रामीण आरोग्य सेवा, पाणीपुरवठा, कर्जमाफी, वन्यप्राण्यांमुळे होणारे शेतीचे नुकसान, अपूर्ण योजना आणि दिव्यांगांवरील अन्याय अशा अनेक गंभीर मुद्द्यांवर त्यांनी प्रशासनाला जाब विचारला.



बैठकीत सर्वप्रथम बोगस बियाण्यांमुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित करत, नुकसानग्रस्तांना केवळ भरपाई नव्हे तर पुनर्पेरणीसाठी मोफत दर्जेदार बियाणे व मजुरीचा खर्चही देण्याची मागणी केली. वायगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात पाणी नसल्याने रुग्णांना दाखल करता येत नसल्याचा मुद्दा मांडत, ही प्रशासनाची गंभीर निष्काळजीपणा असल्याचे त्यांनी सुनावले. हमदापूर येथील डॉक्टरांच्या निवासस्थानात सापांसह सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर असल्याने डॉक्टर जीव मुठीत धरून सेवा देत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.

राष्ट्रीय महामार्गावरील निकृष्ट दर्जाच्या कामांवर त्यांनी संताप व्यक्त करत, अनेक ठिकाणी पडलेल्या मोठ्या भेगांमुळे अपघात होऊन नागरिकांचे जीव जात असल्याचा आरोप केला. संबंधित कंत्राटदारांवर कठोर कारवाई करून उच्चस्तरीय चौकशीची मागणी त्यांनी केली. आर्वी–तळेगाव मार्गाचे १२ वर्षांपासून रखडलेले काम, ग्रामीण भागातील मोबाईल नेटवर्कची समस्या आणि बेढोणा येथील प्रदूषण करणाऱ्या क्रशरवरही त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले.

स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावर त्यांनी स्पष्ट भूमिका घेत नागरिकांच्या संमतीशिवाय मीटर बसवू नयेत, तसेच अवास्तव वीजबिलांची चौकशी करावी, अशी मागणी केली. कर्जमाफीची यादी तातडीने जाहीर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून भरपाई देणे, वन्यप्राण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना किमान ५० हजार रुपयांची मदत देणे आणि अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.

२०१२ मध्ये मंजूर झालेले जिल्हा स्त्री रुग्णालय अद्याप सुरू न झाल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. हिंगणघाटमधील कथित वैद्यकीय हलगर्जीपणामुळे झालेल्या युवकाच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी, दिव्यांगांना योग्य प्रमाणपत्रे देणे, बालसंगोपन योजनेचा निधी तातडीने वितरित करणे तसेच प्रत्येक गावात स्मशानशेड व स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली. बैठकीच्या शेवटी खासदार अमर काळे यांनी स्पष्ट इशारा दिला की, जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर कुठलीही दिरंगाई किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. प्रशासनाने कागदोपत्री कामे न दाखवता प्रत्यक्षात परिणाम दिसले पाहिजेत. त्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे जिल्हा नियोजन समितीची बैठक चांगलीच गाजली.

### जातीवाचक शिवीगाळप्रकरणी गुन्हा दाखल

**वर्धा-** शहरातील न्यायालय परिसरात एका महिला वकिलाला जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी शहर पोलिसांनी एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. धंतोली येथील रहिवासी असलेल्या आरोपी महिलेने न्यायालयाच्या आवारातील बार कौन्सिल रूममध्ये तक्रारदार महिला वकिलाचा अपमान करत जातीवाचक शब्दांचा वापर केल्याची तक्रार करण्यात आली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी संबंधित महिलेविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. या घटनेमुळे न्यायालय परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# आष्टी पोलिसांचा पाठलाग; पिकअपमधून १७ गोवंशीय जनावरांची सुटका

## ६.२७ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोन जणांवर गुन्हा

**आष्टी शहीद/जनमाध्यम** गोवंशीय जनावरांची क्रूरपणे अवैध वाहतूक करणाऱ्या पिकअप वाहनावर आष्टी पोलिसांनी धडक कारवाई करत १७ जनावरांची सुटका केली. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, वाहनासह ६ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पहाटे साडेचारच्या सुमारास वरूड–तळेगाव मार्गावरील दुगावडा बसथांब्याजवळ एमपी-१३ जीबी-३२२१ क्रमांकाच्या बोलेरो पिकअपमधून गोवंशीय जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती आष्टी पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून वाहन अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाने वाहन भरधाव वेगाने पळवून नेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून अवघ्या ५० मीटर अंतरावर वाहन ताब्यात घेतले. वाहनाची तपासणी केली असता, त्यात चार गायी, अकरा गोरे आणि दोन कालवडी अशा एकूण १७ गोवंशीय जनावरांना अत्यंत अमानुष पद्धतीने कोंबून ठेवण्यात आल्याचे आढळले. जनावरांना हालचाल करण्यासाठी जागा नव्हती. दोऱ्यांनी घट्ट बांधल्यामुळे त्यांना श्वास घेण्यासही त्रास होत असल्याचे पोलिसांनी नमूद केले. या प्रकरणी बाळू विठ्ठल गडलिंग (रा. दुगावडा) आणि सुनील नत्थुजी मते (रा. रेवराळ, ता. मौदा, जि. नागपूर) यांच्याविरुद्ध पशुक्रूरता प्रतिबंधक कायद्यासह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुटका करण्यात आलेल्या जनावरांची पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करून त्यांना गोशाळेत हलविण्यात आले. या कारवाईत जनावरांसह पाच लाख रुपये किमतीचे बोलेरो पिकअप वाहन असा एकूण ६.२७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ठाणेदार राजेश जोशी, पीएसआय निलेश भिलावे, वाहतूक पोलिस देशमुख आणि पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास पोलिस हवालदार पवन विभीषण केंद्रे करीत आहेत.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरा



**विरूळ (आ)/जनमाध्यम** विरूळ (आ) येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व प्रतिमापूजनाने झाली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे आर्वी तालुकाध्यक्ष दिलीप पोटफोडे, आर्वी नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती भारती पोटफोडे, रवि हटकर, आर्वी पंचायत समितीच्या माजी उपसभापती शोभा मनवर तसेच माजी उपसरपंच नितीन पोलकडे उपस्थित होते. मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, समाजप्रबोधन आणि सामाजिक समतेच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.सांस्कृतिक कार्यक्रमात हर्षदा विजय तेलंगे, पायल सुनील शेंडे, आऋषी निलेश वानखडे, विदिशा जगदीश वानखडे यांच्यासह चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश तेलंगे यांनी केले, तर विजय तेलंगे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जगदीश वानखडे, संजय पोटफोडे, बबन गवळी, सौरभ वानखडे, निलेश वानखडे, सुनील शेंडे, विनोद पोटफोडे, गजानन वानखडे, मारोतराव तिरळे, गोलू वानखडे, राहुल मेश्राम, मंगेश नाईक, समीर कांबळे तसेच महिला मंडळाने विशेष सहकार्य केले.

## घर कोसळले... पण ग्रामस्थ धावले

# मृत्यूच्या दाढेतून दीपकची सुटका

## मलब्याखाली दबलेल्या व्यक्तीला सुखरूप बाहेर काढण्यात यश; डबले कुटुंबाचा संसार उघड्यावर

**वायफड/ जनमाध्यम** परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे वायफड येथील तेलीपुरा चौकात एका कुटुंबावर मोठे नैसर्गिक संकट कोसळले. घराचा काही भाग अचानक कोसळून दीपक पांडुरंग डबले (वय ४८) हे मलब्याखाली दबले. मात्र ग्रामस्थांच्या प्रसंगावधान आणि तत्परतेमुळे त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आल्याने मोठी जीवितहानी टळली.

३० व ३१ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसानंतर शुक्रवारी सायंकाळी ही घटना घडली. दीपक डबले घरातील एका खोलीत बसले होते, तर कुटुंबातील इतर सदस्य दुसऱ्या खोलीत होते. अचानक घराचा एक भाग मोठ्या आवाजात कोसळला आणि दीपक यांच्या अंगावर भिंत व छताचा मलबा पडला. ते ढिगाऱ्याखाली अडकताच त्यांनी मदतीसाठी आरडाओरड केली.

आवाज ऐकताच परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. कोणतीही पर्वा न करता त्यांनी ढिगारा हटवण्यास सुरुवात केली. अथक प्रयत्नांनंतर दीपक डबले यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. कुटुंबातील इतर सदस्य त्याच खोलीत असते तर मोठी दुर्घटना घडली असती, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या दुर्घटनेत घरातील कपडे, अंथरुण-पांघरूण, अन्नधान्य तसेच संसारोपयोगी साहित्य मलब्याखाली दबून मोठे नुकसान झाले आहे. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या डबले कुटुंबाचा संसार अक्षरशः उघड्यावर आला असून, पावसाळ्यात निवारा आणि उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.या घटनेची जिल्हा प्रशासनाने तातडीने दखल घेऊन डबले कुटुंबाला आर्थिक मदत, तात्पुरता निवारा व जीवनावश्यक साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनीही या संकटग्रस्त कुटुंबाला मदतीचा हात द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्कार्फ हे विश्व मैत्री व बंधुभावाचे प्रतीक-कॅप्टन मोहन गुजरकर

## एसएसएनजे महाविद्यालयात जागतिक स्कार्फ दिन उत्साहात

**देवळी/जनमाध्यम** स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयातील रोव्हर-रेंजर युनिटच्या वतीने जागतिक स्कार्फ दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना स्काऊटचे जिल्हा संघटक नितेश झाडे यांनी स्काऊट-गाईड चळवळीतून आदर्श नागरिक घडतात. खेळातून शिक्षण, कृतीतून उपक्रम, छंदातून व्यवसाय आणि उपक्रमातून नेतृत्वकौशल्य विकसित करण्याचे कार्य ही चळवळ करत असल्याचे सांगितले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा संघटक नितेश झाडे, रोव्हर लीडर संतोष तुरक आणि रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त कॅप्टन मोहन गुजरकर उपस्थित होते. यावेळी कॅप्टन गुजरकर यांनी स्कार्फ हा केवळ परिधान करण्याचा भाग नसून विश्व मैत्री, बंधुभाव आणि सेवाभावाचे प्रतीक असल्याचे सांगितले. तसेच प्रथमोपचार, ट्रेकिंग, जंगल भ्रमंती व आपत्ती व्यवस्थापनातही स्कार्फचे महत्त्व अधोरेखित केले.यावेळी टाकाऊ वस्तूंपासून आकर्षक हस्तकला तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. नवीन रोव्हर-रेंजर सदस्यांना स्कार्फ परिधान करून स्काऊट-गाईड चळवळीत प्रवेश देण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन कोमल शितळे यांनी, तर आभार कल्याणी लिखार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वैष्णवी कन्नाके, स्नेहा मडकाम, यामिनी पारधी, जानवी झोड, आरती मरघडे, साक्षी पारिसे, सलोनी अजमिरे, यश साटोणे, कुंदन कावडे, युवराज डफरे आणि सर्व रोव्हर-रेंजर यांनी परिश्रम घेतले.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २४७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## पशुधन उद्योजकता योजनेमुळे
# दुग्धव्यवसायातून रोजगार मिळवण्याची संधी

**अमरावती/का.प्र.**
'एफडीए'च्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेमुळे तरुणांना दुग्धव्यवसायातून रोजगार मिळवण्याची मोठी संधी मिळाली आहे. या योजनेंतर्गत अल्पभांडवल असलेल्या युवकांना ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान मिळून आधुनिक पशुपालन व्यवसाय सुरु करणे शक्य होणार आहे, ज्यामुळे रोजगाराच्या नव्या संधींना चालना मिळेल. यामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि दर्जेदार शुद्ध दूध उत्पादनात आपली वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी आहे. शासनाच्या या योजनेचा लाभ घेऊन युवकांनी व शेतकऱ्यांनी दुग्धव्यवसायात उतरल्यास गुणवत्तापूर्ण दूध उत्पादन घेऊन रोजगार मिळणार आहे. पशुसंवर्धन विभागाच्या सुधारित निर्णयानुसार, शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभाच्या योजनेतून ५ दुधाळ गायी किंवा म्हशींचा गट दिला जात आहे. याअंतर्गत एकूण ११ लाख ३५ हजार रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी मिळते. अन्न व औषध प्रशासनाने भेसळीच्या विरोधात जोरदार तपासणी मोहीम उघडली आहे. त्यामुळे दुधात भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

**महिलांना ३०, दिव्यांगांना ५ टक्के आरक्षण**

सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५० टक्के अनुदान, एसटी व एसटी यांना ७५ टक्क्यांपर्यंत थेट अनुदान, महिलांसाठी ३० टक्के आणि दिव्यांगांसाठी ५ टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत.

सदर योजनेत ५ दुधाळ गायी किंवा म्हशी, गोठा शेड, तीन वर्षांचा विमा आणि आधुनिक यंत्रसामग्री मिळून ११.३५ लाख रुपयांचे प्रकल्प साहित्य दिले जाते.

**पात्रता आणि अर्ज प्रक्रिया, कुठे करायचा अर्ज ?**

पशुपालकांनी पशुसंवर्धन विभागाच्या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा. तसेच आधार कार्ड, ७/१२ उतारा, ८-अ उतारा, बँक पासबुक, अनुसूचित जाती-जमातीचे असल्यास प्रमाणपत्र, रहिवासी दाखला ही कागदपत्रे आवश्यक आहेत. सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती-जमातीतील लोकांसाठी या योजनेचा लाभ दिला जातो. यासाठी अनुदानही शासन देणार आहे. एससी-एसटी लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदान दिले जाते. दुग्ध व्यवसाय शेतीला जोडधंदा आहे. शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होत असून, उलाढालही होते.

# अंजनगाव शाखेत माऊली मल्टीस्टेट बँकेत ठेवीदारांचे लाखो रुपये अडकले
## नागरिकांमध्ये घबराट, एफआयआरची मागणी



**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
शहरातील माऊली मल्टीस्टेट को-ऑप. बँकेच्या शाखेत ठेवीदारांचे लाखो रुपये अडकल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. नाशिक येथे मुख्य शाखा असलेल्या या बँकेच्या अंजनगाव सुर्जी शाखेत अनेक सामान्य नागरिक, रोजंदारी मजूर, शेतकरी आणि छोट्या व्यावसायिकांनी आपली आयुष्यभराची पुंजी जमा केली होती. मात्र आता स्वतःचेच पैसे काढण्यासाठी गेल्यावर बँकेकडून टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर आरोप ठेवीदारांनी केला आहे.

नागरिकांनी बँकेचे दैनंदिन एजंट राजेंद्र तायडे आणि अन्य एजंट्स यांच्यामार्फत रोजंदारी, बचत खाते, मुदत ठेव आणि इतर योजनांमध्ये आपली रोजची कमाई जमा केली होती. शिक्षण, शेती आणि भविष्यातील गरजांसाठी ही बचत करण्यात आली होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून पैसे काढण्यासाठी गेल्यास बँक पैसे देण्यास नकार देत असल्याचे ठेवीदारांचे म्हणणे आहे.ठेवीदारांच्या म्हणण्यानुसार, पैसे काढण्यासाठी शाखेत गेल्यास शाखा व्यवस्थापक रोशन धोटे हे 'सध्या बँकेकडे फंड नाही, वरिष्ठ शाखेकडून फंड आल्यानंतर पैसे दिले जातील' असे उत्तर देतात. वैद्यकीय आणीबाणीसारख्या अत्यंत गरजेच्या प्रसंगी देखील १००० रुपयांचे विड्रॉल दिले जात नसल्याने नागरिक हतबल झाले आहेत.

'वरिष्ठ शाखेने पैसे पाठवल्यावर सर्व पैसे देऊ' असे सांगितले जात असले तरी, जर पैसे आलेच नाहीत तर याची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल ठेवीदार विचारत आहेत.या प्रकारामुळे 'बँक बुडणार की काय?' अशी भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली असून सहकारी बँकांवरील विश्वासाला तडा गेला आहे. अनेकांना मुलांच्या शिक्षणासाठी, शेतीच्या कामांसाठी आणि कुटुंबातील सदस्यांच्या औषधोपचारासाठी पैशांची नितांत गरज असताना बँकेकडून पैसे मिळत नसल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे.या प्रकरणाची गंभीर दखल घेत किसान ब्रिगेडचे अध्यक्ष कुलदीप मुरतकर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी या प्रकरणी संबंधित माऊली मल्टीस्टेट को-ऑप. बँक, शाखा व्यवस्थापक रोशन धोटे आणि एजंट राजेंद्र तायडे यांच्यावर तात्काळ एफआयआर दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.तसेच प्रशासनाने या प्रकरणात लक्ष घालून ठेवीदारांचे पैसे तात्काळ परत मिळवून द्यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.दरम्यान, या संदर्भात बँकेच्या वरिष्ठ व्यवस्थापनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

> बँकेच्या वरिष्ठ कार्यालयाकडून निधी उपलब्ध करून देण्यासाठी सुमारे एक ते दीड महिन्याचा कालावधी सांगण्यात आला आहे. तो कालावधी पूर्ण होताच आवश्यक निधी प्राप्त होईल आणि त्यानंतर सर्व ठेवीदारांना त्यांच्या ठेवी रकमेचे वितरण पूर्ववत सुरू करण्यात येईल. ठेवीदारांनी घाबरून जाऊ नये, बँक प्रशासन त्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.
>
> **राजेश धोटे,** शाखा व्यवस्थापक

## संक्षिप्त

### अनंत नांदूरकर यांचा कलाप्रवास आज आकाशवाणीवर



**अमरावती-**'माझा कलाप्रवास : गज़लकार, रंगकर्मी आणि निवेदक' या विषयावर प्रख्यात शायर अनंत नांदूरकर 'खलिश' यांची मुलाखत ३ते ४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता आकाशवाणीच्या अमरावती केंद्रावरून प्रसारित केली जाणार आहे. लोकप्रिय निवेदक नितीन भट यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे. 'नमस्कार अमरावती' या कार्यक्रमात ही मुलाखत प्रसारित केली जाईल. मराठी- हिंदी गज़ललेखनाचा प्रवास, कविता आणि गज़ल यातला फरक, चालीवर किंवा दिलेल्या विषयावर गीतलेखन, गज़लचे तंत्र- व्याकरण, नाट्य आणि निवेदन क्षेत्रातील वाटचाल आदी विषयांवर या मुलाखतीत अनंत नांदूरकर भाष्य करतील. कार्यक्रमाची निर्मिती आकाशवाणी अमरावती केंद्राची असून सादरकर्ते भैय्यालाल टेकाम आहेत. हा कार्यक्रम आकाशवाणी अमरावती केंद्राबरोबरच 'न्यूज ऑन एअर' या मोबाईल ॲपवर देखील ऐकता येईल. मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन अमरावती आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख भय्यालाल टेकाम आणि कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांनी केले आहे.

### प्रा.कविता बोरकर सन्मानित



**कळंब-**स्थानिक इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. कविता जगन्नाथ बोरकर (कविता रामेश्वर मुदगले) यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयातील आचार्य पदवीने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या प्रबंधाचा विषय 'ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणामध्ये महिला बचत गटाचे योगदान : विशेष संदर्भ यवतमाळ जिल्हा' हा होता. प्रा. कविता बोरकर यांनी त्यांची पीएच.डी. अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय येथील डॉ. सुभाष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केली. प्रबंधाच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यातील महिला बचत गटांनी स्थानिक स्तरावर केलेल्या योगदानाचे सामाजिक व इतर पैलूंचे सखोल विश्लेषण करण्यात आले असून, हे संशोधन ग्रामीण महिला सक्षमीकरणाच्या धोरणात्मक उपक्रमांसाठी उपयुक्त ठरेल, अशी माहिती संशोधकांनी दिली. मार्गदर्शक डॉ. सुभाष पवार, वडील जगन्नाथ बोरकर, आई वनिता बोरकर, पती रामेश्वर मुदगले, भासरे गजानन मुदगले, मुली आराध्या आणि माऊली यांच्या सहकार्य व आधाराशिवाय हे संशोधन पूर्णत्वास गेले नसते. इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर, संस्था उपाध्यक्ष डॉ. वीरा मांडवकर, उपप्राचार्य डॉ. निळकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे, डॉ. प्रशांत जवादे, डॉ. कैलाश नेमाडे यांच्यासह वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी आभार मानले आहेत.

# बडनेरा मतदारसंघात ४७,८९० 'असंग्रहित' मतदारांची नोंद
## नाव वगळण्यापूर्वी पडताळणी करण्याचे निवडणूक विभागाचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**
भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार ३७ बडनेरा विधानसभा मतदारसंघांतर्गत विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६ राबविला जात आहे. या मोहिमेत आजअखेर ४७,८९० असंग्रहित मतदार आढळले आहेत. त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात येणार आहेत. त्यामुळे पात्र मतदारांनी बीएलओकडे जाऊन तातडीने पडताळणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या मोहिमेत घरोघरी सर्वेक्षण कालावधी हा ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ असून यात गणना प्रपत्र वाटप करणे आणि गोळा करून डिजिटाईस करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे. त्यानंतर प्रारूप मतदारयादी १७ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यात बडनेरा विधानसभा मतदारसंघातील ३४५ ग्रामीण व शहरी भाग समाविष्ट आहे.

'असंग्रहित' मतदारांमध्ये मयत मतदार, कायमस्वरूपी स्थलांतरित झालेले नागरिक, अनुपस्थित मतदार आणि दुबार नोंदणी असलेले मतदार यांचा समावेश आहे. एसआयआरमधील असंग्रहित मतदारांची माहिती देण्यासाठी आज ३१ जुलै रोजी शाम चौक येथील निवडणूक कार्यालयात राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत असंग्रहित मतदारांच्या आकडेवारीबाबत माहिती देऊन त्यांना मतदारयादीतून वगळण्याच्या प्रक्रियेबाबत सूचना देण्यात आली.

मतदारयादीतील नावाबाबत आपल्या परिसरातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून असंग्रहित दर्शविलेल्या नावाची पडताळणी करून घ्यावी. जर पात्र मतदार चुकीने 'असंग्रहित' म्हणून दर्शविला गेला असेल, तर त्याचे नाव तात्काळ निवडणूक विभागात किंवा संबंधित बीएलओकडे कळवावे. जेणेकरून कोणताही पात्र मतदार वगळल्या जाणार नाही. तसेच विहित मुदतीत योग्य गणना प्रपत्र जमा न केल्यास संबंधित नाव मतदार यादीतून वगळले जाणार असल्याचे मतदार नोंदणी अधिकारी तथा महसूल उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांनी कळविले आहे.

## प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेराच्या
# ३५० विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड




**अमरावती/का.प्र.**
विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती येथील ३५० विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड करण्यात आली. ही निवड विविध शाखेतून निवड करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे,प्रा. डॉ.पूनम चौधरी,पकंज देशमुख,प्रा.विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते.

याचाच भाग म्हणून विद्यार्थी रोजगार निर्मिती व प्लेसमेंट साठी विविध कंपन्यांना निमंत्रित करण्यात येते विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येते. यावर्षी या २० बहुराष्ट्रीय कंपनीत ३५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

ही निवड विविध शाखेतून निवड करण्यात आली. महाविद्यालयला नुकताच स्वायत्त दर्जा प्राप्त झाला असून या सत्रात मोठ्या रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे. यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट प्रमुख डॉ शशिकांत थोरात, समन्व्यक प्रा. कुणाल गोहाड, डॉ . सौरभ शहा ,डॉ वृणाल पनपालिया, प्रा. लक्ष्मीकांत काळकोंडे, प्रा. राहुल वानखडे, प्रा आतिफ सईद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी ई-केवायसीची गती वाढवावी
## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश



**अमरावती/का.प्र**
जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची पहिली यादी प्रसिद्ध झाली आहे. लवकरच उर्वरीत शेतकऱ्यांची यादी येणार आहे. त्यामुळे रविवारपर्यंत जिल्ह्यातील पहिल्या यादीतील ७६ हजार ९७६ शेतकऱ्यांची ई-केवायसी गतीने पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात तालुकास्तरावरील सहायक निबंधक आणि बँकांचे प्रतिनिधी घेण्यात आला. यावेळी जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार, अग्रणी जिल्हा बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर यांनी कर्जमाफीची प्रक्रिया राबविताना बँकांनी सजगपणे काम करणे आवश्यक आहे. बँकेच्या शाखेमधून प्रत्येक कर्जदार शेतकऱ्यांना दूरध्वनी करून त्यांना कर्जमाफीची माहिती देण्यात यावी. त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात यावे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने २ लाख रूपयांची कर्जमाफी होणार आहे, याबाबत माहिती देण्यात यांचा आढावा यावी. कर्जमाफी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक हा महत्वाचा आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणी नसल्यास तातडीने ही नोंदणी करण्यास शेतकऱ्यांना सांगावे. याकामी बँकांनी प्रयत्नपूर्वक कार्य करणे अपेक्षित आहे.

कर्जमाफीच्या अनुषंगाने येत्या शनिवार आणि रविवारी बँकांचे कामकाज सुरू ठेवण्यात यावे. याकामी स्वतंत्ररित्या दोन नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. त्यांच्याकडून कर्जमाफीबद्दल योग्य मार्गदर्शन करण्यात यावे. कर्जमाफीच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांची सहमती घेताना त्यांना कर्जाच्या रकमेमध्ये फरक दिसत असला तरी उर्वरीत रक्कम बँक समायोजित करीत असल्याची माहिती देण्यात यावी. कर्जमाफीच्या प्रक्रियेत काही तक्रारी असल्यास त्या तात्काळ कळविण्यात याव्यात. त्यानुसार डाटामध्ये दुरूस्ती करण्यात यावी. जिल्ह्यात अद्यापही ७६ हजार ९७६ ई-केवायसीपैकी ४३ हजार ४३२ शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. आपले सरकार केंद्र येथे शेतकऱ्यांची ही केवायसी मोफत होणार आहे.

केंद्र चालकांनी शेतकऱ्यांकडे पैशाची मागणी केल्यास केंद्राचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार आहे. तसेच कर्जमाफीसाठी ई-केवायसीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिल्या.

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या ५४ जणांवर कारवाई



**अमरावती/का.प्र.**
ऑपरेशन कवचअंतर्गत ग्रामीण पोलिसांनी राबविलेल्या गरुड दृष्टी उपक्रमातून ग्रामीण पोलिसांचा वॉच गरुड दृष्टी या विशेष उपक्रमातून सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या ५४ जणांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. १ मे ते ३१ जुलै या कालावधीतील तीन महिन्यात या कारवाया करण्यात आल्या आहेत. सोशल मिडियाच्या विविध प्लॅटफार्मवर वादग्रस्त विधाने, गुंडगिरीचे प्रदर्शन करणारे व्हिडिओ तसेच समाजात द्वेष पसरविणारे संदेश प्रसारित करणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांनी करडी नजर ठेवली आहे. ग्रामीण पोलिसांच्या गरुड दृष्टी उपक्रमाअंतर्गत सोशल मीडियावर सातत्याने पाळत ठेवण्यात येत असून, आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जात आहे. यामध्ये गेल्या तीन महिन्यात ५४ जणांविरुद्ध विविध कायदेशीर कारवाया करण्यात आल्या आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

# बी.एस.पाटील महाविद्यालयात 'लेखन प्रेरणा दिन'



**अमरावती-** भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा. डॉ. प्रमोद गारोडे (सदस्य, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च वा तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई) यांचे प्रमुख व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा डॉ सतीश भागवत आणि प्रा डॉ रवींद्र खंडेराव विचारपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख वक्ते प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांनी आपल्या व्याख्यानात अण्णा भाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा, सामाजिक बांधिलकीचा आणि त्यांच्या साहित्यिक योगदानाचा सखोल आढावा घेतला. यावेळी प्रा. डॉ. सतीश भागवत यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त विचार व्यक्त करताना सांगितले की, 'लोकमान्य टिळक यांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा विचार देऊन भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर म्हणाले, 'महापुरुषांचे विचार हे समाजाच्या प्रगतीचे दिशादर्शक असतात. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी साहित्याच्या माध्यमातून सामाजिक समतेचा विचार रुजविला, तर लोकमान्य टिळक यांनी राष्ट्रभावनेची ज्योत प्रज्वलित केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजन मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवींद्र खंडेराव यांनी केले. यावेळी प्रा डॉ खंडेराव यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालनही त्यांनीच केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. दयाश्री कोकाटे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# चार अंगणवाड्यांतील ६६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप
## बँक ऑफ इंडिया शाखा मालखेडचा उपक्रम

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
भारतीय बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य व विश्वासार्ह बँक ऑफ इंडियाच्या मालखेड शाखेच्या वतीने सामाजिक दायित्व (णऐं) अंतर्गत मालखेड येथील चारही अंगणवाड्यांमध्ये शिकणाऱ्या ६६ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. ग्रामीण भागातही कॉन्व्हेंट शिक्षणाकडे पालकांचा वाढता कल दिसून येत असला, तरी मालखेड येथील अंगणवाड्यांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांनीही समाधान व्यक्त केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा प्रकारचे उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.यावेळी बँक ऑफ इंडिया शाखा व्यवस्थापक वैभव साबळे, अधिकारी निखिल वानखडे, शुभम नेतनस्कर,तसेच अंगणवाडी सेविका, मदतनीस, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी प्रेरणादायी संवाद



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
स्थानिक समर्थ बहुउद्देशीय संस्था संचलित ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (बी.एससी.), ट्रायडेंट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग (जी.एन.एम.), पंडित मदन मोहन तिवारी पी.बी.बी.एससी. नर्सिंग कॉलेज आणि श्री उत्तम स्वामी फिजिओथेरपी कॉलेज येथे गुरुपौर्णिमा महोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सुरुवात दीपप्रज्वलन व गुरुपूजनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत भारतीय गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना गुरुंचे जीवनातील महत्त्व, शिस्त, सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचे महत्त्व विशद केले. नगराध्यक्षा प्रा. प्रियंका निलेश विश्वकर्मा यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात मोठी स्वप्ने पाहण्याचा, सातत्याने प्रयत्न करण्याचा आणि समाजाप्रती संवेदनशील राहून आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजसेवेसाठी करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाला चारही महाविद्यालयांतील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. गुरु वंदना, मनोगते आणि प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# अमरावती जिल्ह्यात जून-जुलैत सरासरी ८८.६ टक्के पाऊस

## अंजनगाव तालुक्यात ऑगस्टमध्ये सर्वाधिक १४०.९ टक्के

### ऑगस्टच्या सुरुवातीलाच पावसाचा जोर वाढला

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यात जून-जुलै या कालावधीत सरासरीच्या ८८.६ टक्के पावसाची नोंद झाली असून, ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच अनेक तालुक्यांत चांगला पाऊस झाला आहे. २ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३१ वाजेपर्यंतच्या पर्जन्यमान अहवालानुसार, जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात आतापर्यंत ९.७ मिमी सरासरी पावसाची नोंद झाली असून, तो सरासरीच्या ५२.७ टक्के इतका आहे. जून-जुलै कालावधीत नांदगाव खंडेश्वर (१४३.२ टक्के), चांदूर रेल्वे (१२३.८ टक्के), दर्यापूर (१०५.८ टक्के) आणि अंजनगाव (१०४.७ टक्के) या तालुक्यांनी सरासरीपेक्षा अधिक



पावसाची नोंद केली. तर अचलपूर (६६.३ टक्के), चिखलदरा (७४.१ टक्के), भातकुली (७५.७ टक्के) आणि वरूड (७२.७ टक्के) येथे सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. ऑगस्ट महिन्यातील पर्जन्यमानात अंजनगाव तालुका आघाडीवर असून येथे सरासरीच्या १४०.९ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्यापाठोपाठ भातकुली (९२ टक्के), अचलपूर (८८.१ टक्के), चांदूर बाजार (८५.३ टक्के), दर्यापूर (८१.४ टक्के) आणि अमरावती (७८.७ टक्के) या तालुक्यांमध्ये समाधानकारक पाऊस झाला आहे. दुसरीकडे धामणगाव (१७.२ टक्के), नांदगाव खंडेश्वर (२५.६ टक्के) आणि चांदूर रेल्वे (२५ टक्के) येथे ऑगस्टमधील पावसाची टक्केवारी कमी राहिली आहे. दरम्यान, अमरावती विभागात जून-जुलैमध्ये १०६.२ टक्के तर ऑगस्टमध्ये आतापर्यंत ६४.४ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

# अमरावती-नागपूर महामार्गावर अपघात

## वर्ध्यातील ५० वर्षीय नागरिकाचा जागीच मृत्यू, वाहनचालक फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** काही कामानिमित्त अमरावतीत आलेल्या वर्धा जिल्ह्यातील एका ५० वर्षीय व्यक्तीचा अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर भरधाव अज्ञात वाहनाच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाला. शनिवारी (२ ऑगस्ट) रात्री सुमारे ९ ते ९.३० वाजण्याच्या दरम्यान नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळविहीर परिसरात हा अपघात घडला.

मृताची ओळख प्रवीण बाबाराव चौधरी (वय ५०, रा. आर्वी, जि. वर्धा) अशी झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चौधरी हे वैयक्तिक कामानिमित्त अमरावती येथे आले होते. रात्री पिंपळविहीर परिसरात



महामार्ग ओलांडत असताना भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय (इरविन) येथे पाठविण्यात आला. अपघात घडवून वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. 'अज्ञात वाहनाच्या धडकेत पायदळ जाणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. अपघातास ☞(पान २ वर)

# बापट चौकात वाइन शॉपसमोर लालखडीतील तरुणाची हत्या

## -शहर हादरले; आरोपींचा शोध सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बापट चौक परिसर रविवारी मध्यरात्री रक्तरंजित घटनेने हादरला. वाइन शॉपसमोर झालेल्या धारदार शस्त्राच्या हल्ल्यात लालखडी येथील शरीफ बेग रशीद बेग (वय २५) या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून



शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. माहितीनुसार, रविवारी रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास काही अज्ञात हल्लेखोरांनी शरीफ बेग यांना गाठून त्यांच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत☞(पान २ वर)

# 'स्वराज सेवा प्रतिष्ठान'ला 'स्व. सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार' प्रदान

**-ऐतिहासिक वारशाच्या जतन-संवर्धनासाठी सन्मानित**

**अमरावती/प्रतिनिधीः-** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपत महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या अमरावतीच्या 'स्वराज सेवा प्रतिष्ठान' या तरुण संस्थेला या वर्षीचा मानाचा 'स्व. सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. लोक फाउंडेशन (अमरावती), कृषी विकास प्रतिष्ठान (नागपूर) आणि स्व. सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळ (अमरावती) यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन रविवारी करण्यात



आले होते. पुरस्काराचे स्वरूप १ लाख रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे असून, भरगच्च भरलेल्या स्व. सोमेश्वर पुसतकर हॉलमध्ये टाळ्यांच्या गजर आणि उत्साही वातावरणात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अमरावतीचे 'स्वराज सेवा प्रतिष्ठान' हे शहरासह संपूर्ण विदर्भातील गडकिल्ले, जुने वाडे, विहिरी आणि ऐतिहासिक गढी यांसारख्या वास्तूंची निगा राखणे, स्वच्छता करणे व त्यांचे जतन करण्याचे महत्त्वाचे कार्य करत आहे.राजकारणापासून दूरः कोणत्याही राजकीय पाठिंब्याशिवाय किंवा झेंड्याशिवाय तरुणांचा हा समूह स्वखर्चाने ऐतिहासिक ठिकाणी जाऊन सेवा देतो. दुर्मिळ शस्त्रांचे संकलनः जुन्या काळातील शस्त्रे व ऐतिहासिक वस्तूंचे संकलन हे तरुण करतात. अनेक वस्तू ☞(पान २ वर)

# अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

## शेतकऱ्यांची शिवसेनेच्या नेतृत्वात तहसिलवर धडक

**नांदगाव खांडेश्वर/प्रतिनिधीः-** शहरासह तालुक्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पावसाने शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतात जलमय परिस्थिती निर्माण झाल्याने हजारो हेक्टर मधील उभी पिके खरडून गेली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान असल्याने पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी या मागणीचे निवेदन



शेतकऱ्यांनी शिवसेना उबाठा चे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात तहसिलदार यांना सादर केले. ३० जुलै रोजी नांदगाव शहरासह तालुक्यात मुसळधार पावसाने थैमान घातल्याने अनेक नागरीकांचे घरात पाणी शिरले. घरातील अन्न धान्य गहू, तांदूळ, दाळ इत्यादि जीवन उपयोगी साहित्यात पाणी शिरल्याने खराब झाले. अनेक घरे पडली. शहरातील अनेक दुकानात पाणी शिरल्याने अतोनात नुकसान झाले. शेतात मुसळधार पावसाचे नदि-नाल्याचे पाणी शिरल्याने अनेकांचे शेतातील विहिरी खचल्या. विद्युत पोल पडले. शेतकऱ्यांचे गोट फार्म व पोल्ट्री फार्म चे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतातील स्प्रिंकलर पाईप, नोजल इत्यादि☞(पान २ वर)

# अतिदृष्टीमुळे मंगरूळ व हरणी गावात हाहाकार

**नांदगाव खांडेश्वर/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर तालुक्यात ३० जुलै रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य अतिवृष्टीमुळे मंगरूळ चवाळा व हरणी या दोन गावातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला असून रात्र त्यांना जागून काढावी लागली. या गावात अतिवृष्टीमुळे हाहाकार उडाला. दोन्ही गावातील नागरिकांच्या घरात नदीच्या पुराचे पाणी घुसले असून पूर इतका भयंकर होता की जीव वाचविणे कठीण झाले होते. पुराच्या पाण्याने मोठ्या प्रमाणात घराची



पडझड झाली असल्याने अनेक नागरिकांचे संसार उघड्यावर आले. मंगरूळ आणि हरणी या गावाला लागूनच दोन धरणे असल्यामुळे भीतीचे वातावरण तयार झाले होते. मोठ्या प्रमाणात आलेल्या पुराने नागरिकांची जनावरे सुद्धा दगावली. गावकऱ्यांनी याप्रसंगी सावधान राहून आपतग्रस्त लोकांना इतरत्र हलविले. मंगरूळ आणि हरणी दोन्ही गावाला पुराच्या पाण्याने नदी नाल्याकाठची जमीन पूर्णपणे खरडून गेली. प्रशासनाने ज्यांची घरे पडली त्यांना तात्काळ मदत केली. खर्डून गेलेल्या शेतीचे पंचनामे करण्यात यावे व आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. आमदार प्रताप अडसड यांनी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. माजी आमदार वीरेंद्र जगताप, अभिजीत ढेपे ,बाळासाहेब राणे, सरपंच राजू पारधी ,अतुल ठाकूर, पंकज पिंपळकर, मोहित झोपाटे ,दीपक पीपलकर पोलीस पाटील यांनी घराची आणि शेतीचे झालेले नुकसान भरपाई देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे विनंती केली.

# दीक्षाभूमीच्या नूतन इमारतीवर समाजकंटकांचा घाला!

## -सरकारी मालमत्तेची तोडफोड , -दोषींवर कारवाईसाठी नगर परिषदेचे पोलिसांना पत्र

**अचलपूर/प्रतिनिधीः-** शहरातील गांधीपूल परिसरातील दीक्षाभूमी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत नव्याने उभारण्यात आलेल्या तळमजला व प्रथम मजल्याच्या इमारतीची अज्ञात समाजकंटकांनी तोडफोड केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या या सरकारी मालमत्तेची मोडतोड झाल्याने संताप व्यक्त होत असून, संबंधित दोषींना तातडीने शोधून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अचलपूर नगर परिषद प्रशासनाने सरमसपुरा पोलिसांकडे केली आहे.

नगर परिषदेकडून मिळालेल्या माहितीनुसार, सदर इमारतीचे बांधकाम कंत्राटदार अंकित महेश अग्रवाल यांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आले असून, इमारत नगर परिषदेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू होती. त्यासाठी ३१ जुलै रोजी दुपारी सुमारे साडेबारा वाजण्याच्या सुमारास कंत्राटदार



घटनास्थळी पोहोचले असता प्रवेशद्वारावरील कुलूप, कडी-कोंडा तसेच काचेच्या दरवाज्याची तोडफोड झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. हा प्रकार पाहून त्यांनी तातडीने नगर परिषद प्रशासनाला माहिती दिली.

त्यानंतर कंत्राटदाराने नगर परिषदेकडे लेखी अर्ज सादर केला. अर्जाची गंभीर दखल घेत प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठविले. संयमपाल सलीम अहमद अब्दुल रज्जाक हे प्रशासकीय अधिकारी सुनील चंद्रभान नेवाळे यांच्यासह घटनास्थळी पोहोचले असता इमारतीच्या विविध भागांची तोडफोड झाल्याचे स्पष्ट झाले. यावेळी घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला तसेच संपूर्ण घटनेचा अहवाल तयार करून तोडफोडीची छायाचित्रेही सरमसपुरा पोलिसांकडे सुपूर्द करण्यात ☞(पान २ वर)

# तिवसा हायवेवरील बंद स्ट्रीटलाईट अखेर प्रकाशमान

**नगरसेवक अनिल थुल यांच्या मागणीला यश**

**तिवसा/प्रतिनिधीः-** शहरातून गेलेल्या दोन किलोमीटर राष्ट्रीय महामार्गावरील स्ट्रीट लाईट गेल्या अनेक वर्षापासून वादळी पावसामुळे जमिनीपासून तुटून पडले होते. ज्यामुळे मुख्य बाजारपेठेत जाणाऱ्या मार्गावर काळोख अंधार पसरत होता. या राष्ट्रीय महामार्गावरील स्ट्रीट लाईट तातडीने बसवावे अशी मागणी पत्राद्वारे तिवसा नगरपंचायतचे विरोधी पक्ष नेता तथा नगरसेवक अनिल थुल व वंचित बहुजन आघाडीचे माजी महासचिव सम्येक हगवणे यांनी संबंधित विभागाकडे केली होती.



अखेर दीर्घप्रतीक्षेनंतर महामार्गावरील तीन स्ट्रीटलाईट बसविण्यात आल्याने या मागणीला यश आले आहे.

वर्धा जिल्ह्यातील तळेगाव ते अमरावती बडनेरा पर्यंत या राष्ट्रीय महामार्गाच्या देखभालीचे काम आयआरबी या कंपनीकडे आहे. पावसाळ्याला या महामार्गावर जागोजागी मोठं मोठे खड्डे पडून किरकोळ अपघाताच्या घटना घडतात. तिवसा शहरातील महामार्गावरील तीन स्ट्रीट लाईट वादळी पावसाने पडल्यामुळे अनेक वर्षापासून बंद अवस्थेत होतें. ज्यामुळे स्थानिक नागरिकांना अंधारातून ☞(पान २ वर)

# टाकरखेडा शंभूतील जिल्हा परिषद शाळेसमोरील रस्ता पाण्याखाली

**-विद्यार्थी व नागरिकांचे हाल, प्रशासनाच्या दुर्लक्षाबाबत संताप**

**टाकरखेडा शंभू/प्रतिनिधीः-** गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे टाकरखेडा शंभू परिसरातील शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून तूर, सोयाबीन आणि कापूस पिकांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्याचबरोबर गावातील जिल्हा परिषद मराठी शाळा आणि जिल्हा परिषद उर्दू शाळेसमोरील मुख्य रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली



आहे. या मार्गावरून शाळकरी विद्यार्थी, शिक्षक, पालक, खाजगी नोकरी करणारे कर्मचारी, व्यापारी, फेरीवाले तसेच टाकरखेडा शंभू–रामा साऊर मार्गावरील प्रवासी दररोज ये-जा करतात. मात्र रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचणे कठीण झाले असून अनेक दुचाकीस्वारांनाही मार्ग काढणे अशक्य झाले आहे. छोट्या वाहनांची वाहतूकही ठप्प झाली आहे.

विशेष म्हणजे, ही समस्या नवीन नसून☞(पान २ वर)

# पिसाळलेल्या गाईचा मृत्यू

## सारसी जंगल परिसरात केले दफन

**तिवसा/प्रतिनिधीः-** गेल्या तीन दिवसांपूर्वी पिसाळलेल्या एका गाई ने तिवसा येथील शिक्षक कॉलनी,रतनगिर नगर परिसरात चांगलाच हैदोस घातला होता.अनेक जण गाईच्या हल्ल्यात जखमी झाले असता नगरपंचायत टीम व काही धाडसी प्राणीमित्र एकत्रित येऊन गाईला जेरबंद करून सारसी जंगल परिसरात सोडले असता तेथेच गाईने शुक्रवारी प्राण सोडला.त्यानंतर गाईला खड्डा करून दफन करण्यात आल्याने नागरिकांनी सुटकेचा स्वास सोडला आहे.

> गाईमुळे झालेल्या घटना व नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेता आरोग्य विभागाच्या टीमला गाईला पकडून बंदोबस्त लावण्याबाबत सूचना दिल्या होत्या.त्यानुसार प्राणीमित्राच्या साहाय्याने नगरपंचायत प्रशासनाने गाईला जेरबंद करून पुढील कारवाई केली.लवकरच मोकाट जनावरांवर सुद्धा कारवाई केल्या जाईल.
>
> **- प्रतिभा गौरखेडे** ,नगराध्यक्ष, तिवसा.



तिवसा शहरात पिसाळलेली गाय समोर दिसेल त्याच्या अंगावर धावून हल्ला चढवित होती.या हल्ल्यात ५ ते ६ जण जखमी झाले होते.त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असता त्या गाईला पकडणे हे सुद्धा नगरपंचायत प्रशासनासमोर एक आव्हान होते.अश्यात गाईच्या हल्ल्यात जीवितहानीची घटना घडू नये,याकरिता तिवसा येथील प्राणीमित्र आविनाश पांडे,सामाजिक कार्यकर्ते पिंटू राऊत,प्रणव गौरखेडे यांच्यासह काही धाडसी☞(पान २ वर)